# माणूस

२१ जुलै १९७३
पन्नास पैसे



## १६ मे पुण्यातील दंगल

अनिल अवचट

श्री. ग. माजगावकर

२१ जुलै १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : आठवा

## सप्रेम नमस्कार....

८ जुलै ७३

◻ ६ जुलै १९७३ चा माणूसचा अंक वाचला. प्रा. राम बिवलकर यांनी दलित मित्र नानासाहेब टिपणीस यांनी घेतलेली मुलाखत औचित्यपूर्ण वाटली. 'सोलकढी' हे सदर खरोखरच लज्जतदार कढीसारखे वाटले.

शहरे आणि खेडी हा लेख विचारप्रवर्तक वाटला.

माणूसचे हेच स्वरूप कायम रहावे ही आशा.

**प्रा. बा. र. बोरसे**, बीड

९ जुलै, ७३

◻ आपल्या ७ जुलैच्या माणूस अंकातील 'शहरे आणि खेडी' हा श्री. अशोक चौसाळकर ह्यांचा लेख वाचला. सध्याच्या परिस्थितीबाबतचे परखड निवेदन स्पष्ट शब्दात केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. अशा प्रकारच्या लेखांना आपण 'माणूस'मध्ये स्थान दिल्याबद्दल शतशः धन्यवाद. हा लेख छापून आपण आपली परंपरा राखलीत. इतर सदरेही खूपच आकर्षक वाटली.

आपले साप्ताहिक एकमेकांवर राजकीय आरोप करण्याचे साधन होऊ नये ही सदिच्छा. त्याला आपण काहीसा पायबंद घालावयास हवा असे वाटते.

**कु. रजनी रानडे**, देवळाली

८ जुलै, ७३

◻ पुष्पा भावे या आपल्या साप्ताहिक 'माणूस'मधील 'मध्यंतर' हे सदर फार उत्कृष्टरीत्या चालवितात असेच म्हटले पाहिजे. त्यांचे चिकित्सात्मक मन व नाट्यपरीक्षण करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे.

'बेकेट' या नाटकाच्या मराठी पेहेरावाविषयी त्यांनी जुलै ७ च्या

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अंकात उपस्थित केलेले मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. चर्चमधील वातावरण निर्माण करण्यासाठी या प्रयोगात वापरण्यात आलेले पार्श्वसंगीत आपण पाश्चिमात्य धार्मिक चित्रपटात अधून-मधून ऐकतो त्याचेच रेकॉर्डिंग दिसते ते. उत्कृष्ट आहे. चर्चचे 'सेटींग' फार उत्कृष्टपणे करण्यात आले आहे. पण बिशपचा पोशाख मनाला जरा खटकला. तो दिसतो मठवाश्यांचा पोशाख.

'आर्चबिशपचे शिरोभूषण चर्चच्या आकाराची छोटी प्रतिकृति असते. प्रस्तुत नाटचप्रयोगात वापरलेली जर लावलेली उंच गांधी टोपी अर्थहीन व विद्रूप वाटत होती,' या लेखिकेच्या मताशी मी संपूर्ण सहमत आहे. ती टोपी जरा उभट, भव्य व भारदस्त असती तर अधिक वस्तुनिष्ठ ठरली असती. बिशपच्या प्रतिमेवर थोडासा अन्यायच झालेला दिसतो. संवादातून प्रतिबिंबीत झालेली बिशपची प्रतिमा, विशेषतः फ्रान्सच्या राजासमोर येऊन इंग्लंडच्या राजाने पाठविलेला खलिता वाचताना त्यातून उभी झालेली बिशपची शैक्षणिक प्रतिमा फारच निकृष्ट दर्जाची वाटली. वास्तविक पहाता मध्ययुगीन युरोपमध्ये शिक्षणाचा प्रसार जरी सगळ्या थरातून झाला नव्हता तरी त्या काळांत विशेष शिकलेला व शिकवणारा वर्ग म्हणजे ख्रिस्ती पुरोहित वर्ग अन् बिशप तर त्यातल्या त्यात उच्च स्तराचे शिक्षण घेतलेले धर्ममार्तंड. तेव्हा या नाटकात भाषेवरील प्रभुत्वाच्या बाबतीत एक विशिष्ट उंची सांभाळणे आवश्यक होते. इथे बिशपची भूमिका रंगविणारी सर्वच पात्रे थिटी पडली असे खेदाने म्हटले पाहिजे.

**रेव्ह. फा. फ्रान्सिस कोरिया,** जुहू चर्च

१० जुलै, ७३

¤ 'मौजे घाटंजी' हा लेख माणूसच्या **२६** जूनच्या अंकात आपण प्रसिद्ध केला आणि आमच्या भागातील जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडली याबद्दल धन्यवाद !

अजूनही गरीब मजूर वर्गाला धान्य मिळत नाही. आठवडी बाजारात गेल्या तीन वारांपासून ज्वारी आली नाही. कंट्रोलमधे फारच अपुरे-सडके धान्य आहे. मजुरांची उपासमार चालू आहे. पण प्रत्येक मोठ्या शेतकऱ्याचे गोदाम मात्र भरलेले आहे. मागच्या दाराने दोन रुपये किलो ज्वारी हवी तेवढी मिळते, पण सरकार इकडे लक्ष देत नाही. नायब तहसिलदार, तहसिलदार येतात. पण काहीच होत नाही. काही बोलायची सोय नाही.

**पारायण रामटेके,** पांढुर्णा

११ जुलै, ७३

¤ आपल्या दि. २३ जून, १९७३ च्या 'माणूस' अंकात 'मुक्काम डोंबिवली' या लेखात तथाकथित श्री. प्रभाकर म्हात्रे या प्रवासी लेखकाने डोंबिवली येथील दिवसाभराच्या मुक्कामात लोकांच्या तोंडून निघालेली माहिती गोळा केली व तिची शहानिशा न करता दडपून छापली. हे त्यांचे कृत्य

## डोंबिवलीमधील पहिलेवहिले कॉलेजही !

वृत्तपत्रीय संकेतांना व परंपरेला धरून नाही तर बेजबाबदार व आचरटपणाचे आहे. त्यांच्या लेखात त्यांनी डॉ. राव, श्री. मनोहर पाटील, श्री. जगन्नाथ पाटील यांची प्रथम व श्री. अचलकर यांची शवटी ते ज्या डोंबिवली नगरपालिकेचे अध्यक्ष आहेत त्या नगरपालिकेच्यासह स्तुती केली. हे सर्व जनसंघीय व नगरपालिका जनसंघाकडील आहे. म्हणून त्यांनी त्यांच्याबद्दल जनसंघीयाकडे मुक्काम केल्यामुळे चांगले ऐकले असेल. पण (जनसंघीय नसलेल्या) ज्या शिक्षणसंस्थाचालकांबद्दल नामनिर्देश न करता जे वाईट ऐकल्यामुळे त्यांचे 'सँडविच्' करून मधेच वाईट मजकूर लिहिला आहे तो श्री. ज. द. महाजन ह्या कर्तृत्ववान शिक्षणतज्ज्ञाबद्दल आहे व तसे येथील नागरिकात बोलले जात आहे. श्री. महाजन पूर्वायुष्यात रेल्वे-नोकर असतीलही पण प्राथमिक शाळा काढण्यापूर्वी सामान्य माध्यमिक शिक्षक होते व त्यांना शैक्षणिक अनुभव व दृष्टिकोन होता. त्यांनी आज महाराष्ट्र विद्यालय ही आदर्श प्राथमिक खाजगी शाळा, (व्यापार, तांत्रिक, वाङ्मय, गृहशास्त्रादी विषय शिकवणारी येथील एकमेव) धनाजी नाना चौधरी बहुउद्देशीय विद्यालय ही माध्यमिक शाळा, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ हा ट्रस्ट १० वर्षांपूर्वी स्थापन करून त्या मार्फत चालविलेली आहे. या दोन्ही शाळांमध्ये १५०० विद्यार्थी आहेत व सुमारे ८० शिक्षक व शिक्षकेतर वर्ग काम करून आपली उपजीविका करत आहेत. बहुउद्देशीय शाळेचे क्षेत्र चार एकराचे आहे व लवकरच नजीकच्या सव्वा एकराच्या खास जागेवर डोंबिवलीमधील पहिलेवहिले कॉलेज होणार आहे. सामान्य परिस्थितीमधून वर येऊन शिक्षणसंस्था काढल्या व चालवल्या आहेत याचा उल्लेख करून श्री. म्हात्रे यांनी त्यांना नकळत श्री. महाजन यांच्या कर्तृत्वशक्तीची पावती दिली आहे.

१. श्री. महाजन यांनी प्राथमिक शाळा काढून थोडीफार 'माया' जवळ केली असेल. त्यांच्या सारख्या कर्तृत्ववान माणसाने कोणत्याही धंद्यात वा क्षेत्रात डोंबिवलीमधील जनसंघीय कार्यकर्त्याप्रमाणे 'लाखो रुपये' कमवले असते. पण श्री. महाजन हे आजही सर्व माध्यमिक शिक्षकाप्रमाणे 'निष्कांचन' आहेत. कारण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळात सुरुवातीच्या २०० रुपयापासून नंतरचीही थोडीफार 'माया' पित्याप्रमाणे गुंतवून टाकली आहे ती परत फेडीच्या हेतूने नाही व त्यामुळे हे मंडळ डोंबिवलीला सर्व जुन्या ख्यातनाम संस्थांना मागे टाकून आदर्श संस्था देऊ शकले व एक कॉलेजही देऊ शकणार आहे.

२. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नामदार श्री. मधुकरराव चौधरी आहेत. त्यांचा महाराष्ट्रविद्या-

लय या श्री. महाजन यांच्या प्राथमिक शाळेशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. ज्या तेरा प्राथमिक शिक्षिकांना काढण्यात आले असे भासविण्यात आले आहे त्याची चौकशी त्यावेळचे शिक्षणमंत्री या नात्याने खात्यामार्फत करून श्री. मधुकरराव चौधरी यांनी संबंधितांना खात्याचा निर्णय परस्पर कळविलाही. डोंबिवलीमधील कोणत्याही खाजगी प्राथमिक शाळेपेक्षा श्री. महाजन यांचे महाराष्ट्र विद्यालय ही प्राथमिक शाळा आजही पूर्वीप्रमाणे जास्त वेतन देते. तर जनसंघीयांची स्वामी विवेकानंद ही प्राथमिक शाळा पदवीधर स्त्रीला प्राथमिक शिक्षिका नेमून तिची अवहेलना करते व तिला दरमहा ४० रु. पगार देऊन कोणता विवेक करते व आनंद मिळविते ?

३. सर्व संस्थांमधील शिक्षक-शिक्षिका नियमानुसार काम करून तसाच पगार घेतात. महागाईमुळ पगार पुरत नाही म्हणून रेशन वगैरेसाठी अडीअडचणीच्या वेळी त्यांना दिलेला अ‍ॅडव्हान्स पगार देतेवेळी कापून घेतला जातो. नव्या योजनेनुसार त्यांच्या बँक खात्यावर पगार जमा होईल. तरीही त्यांना माणूसकी म्हणून अ‍ॅडव्हान्स द्यावा लागेल व त्यापैकी काही रकमा बुडतीलही ! श्री. म्हात्रे यांनी अपुऱ्या माहितीच्या आधारावर फारच धाष्टर्याची बंडले फेकलेली आहेत. प्रॉव्हिडंट फंड भरणारा पगारापेक्षा कमी रक्कम घेतोचना ?

४. औद्योगिकरणामुळे शिपाई संधी मिळताच गिरणी कारखान्यात शाळेचा राजीनामा देऊन जातात कारण जास्त पगार, बोनस इ. चे आकर्षण ! शिक्षकही नव्या नियमामुळे सहा ब्रेक्स, मागची सर्व्हिस व मागच्या पगाराइतका पगार, पेन्शनसाठी ब्रेक सर्व्हिस सलग होणे इ. मुळे थोडाफार अनुभव मिळवल्यावर आपआपल्या गावी नोकरीची संधी मिळताच निघून जातात व वेळ पडल्यास नोटीस ते राजीनाम्याबरोबर खुषीने देतात. शिपाई, लेखनिक व शिक्षकवर्ग यांचे बाबतीत थोड्या बहुत प्रमाणात मुंबईच्या परिसरात हीच परिस्थिती आहे. म्हणून नोकऱ्या सोडून गेलेल्या नोकरवर्गाबद्दल श्री. महाजन यांना जबाबदार धरणे अन्यायाचे होईल.

५. श्री. महाजन यांचेजवळ लाखो रुपयाची माया करण्याची कर्तृत्व शक्ती असून ते शिक्षण क्षेत्रात पडल्यामुळे निष्कांचन कसे राहिले हे वर दिलेले आहेच; पण त्यांची कर्तृत्वशक्ती नव्या नव्या शिक्षणसंस्था काढून यशस्वी करण्यात कारणी लागली व तिचा काहींनी धसका घेतला. म्युनिसिपालिटी, नागरिक सहकारी बँक, काही शाळा, सहकारी सोसायटी याप्रमाणे डोंबिवलीत कॉलेज प्रथम काढण्याचे श्रेय घेऊन ते कॉलेज आपल्या मुठीत ठेवावे असे जनसंघीयांना हवे आहे, पण श्री. महाजन यांच्यामुळे ते शक्य नाही हे दिसल्यामुळे तसेच काही पुरुष शिक्षकांच्या पत्नींना श्री. महाजन यांनी त्यांच्याबरोबर शिक्षिका म्हणून नेमण्यास नकार दिल्यामुळे दुखावून निघून गेलेले हे असंतुष्ट लोक

त्यांच्या पक्षाला 'जगवण्यासाठी धडपड' व 'सूड घेण्यासाठी' श्री. महाजन यांचे 'चारित्र्य हनन' करणे हा शेवटचा मार्ग अनुसरत आहेत.

६. डोंबिवलीमधील नागरिकांमध्ये वरील लेखामुळे तुमच्या साप्ताहिकाचा निषेध करण्यासाठी त्याची जाहीर होळी करावी असा एक विचार प्रवाह निर्माण झाला होता पण श्री. महाजन यांनीच तो विचार मोडून काढला. तुमचे साप्ताहिक दुसरी बाजूही मनमोकळेपणाने छापते हे पाहिल्यावर श्री. महाजन यांनी योग्य तेच केले यात शंका नाही.

७. श्री. प्रभाकर म्हात्रे यांनी 'जनसंघाकडे' असलेल्या डोंबिवली नगरपालिकेची स्तुती केली आहे. जर आगाऊ जाहीर न करताही ते बाजीप्रभू चौकात आल्याचे कळाले तर १२ मिनिटात २००-३०० लोक त्यांच्याकडे या नगरपालिकेविषयीच्या व्यथा सांगण्यासाठी निश्चित घेराव घालतील कारण त्यांच्यासारखा ऐकून जसे तसे लिहिणारा मिळणे मुष्कील! यातच काय ते ओळखा.

**पां. ज्ञा. कानिटकर,** डोंबिवली

१३ जुलै, ७३

□ मुक्काम डोंबिवली ह्या सदराबद्दल राम भिसे व सहकारी (७ जुलै) व रामचंद्र इनामदार (१४ जुलै) ह्यांची ना. चौधरीच्या धनाजी नाना हायस्कूल व महाजन मास्तर ह्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची बाजू घेणारी पत्रे वाचली. ही दोन्ही पत्रे वाचून काही प्रश्न अनुत्तरित रहातातच.

१ : शाळेतील १३ शिक्षिका इनामदारांमार्फत ना. चौधरींना भेटल्या व त्यांनी मंत्री छाप पद्धतीने त्यांना सौजन्याने वागविले ही गोष्ट खरी! पण त्या पुढची गोष्ट इनामदार खुबीने सांगावयाचे विसरतात. ती ही की त्या १३ च्या १३ शिक्षिकांना महिन्या दोन महिन्याच्या अंतराने कामावरून काढून टाकले गेले. आणि आता वर तोंड काढून हे लोक शिक्षकांनी आपले कर्तव्य कसे बजवावे ह्याचे समर्थन करत आहेत! ना. मंत्र्यांना भेटण्यापर्यंत त्या शिक्षिकांची मजल जाते म्हणजे त्यांच्या तयारीत काही अर्थ आहे हे उघड आहे. पण त्याचा खुलासा स्पष्टपणे हे पालक इनामदार का करत नाहीत?

२ : ह्या शाळेत शिदोरे नावाच्या ज्या शिक्षिका होत्या त्यांचे व ठाण्याचे गोखले नावाचे कलेक्टर ह्यांचे नाते होते. हेडमास्तर महाजननी ह्या शिक्षिकेमार्फत गोड बोलून शाळेची महत्त्वाची कामे उरकून घेतली. पण श्री. गोखले ह्यांची जेव्हा बदली होऊन महाजनांची कामे अडू लागली तेव्हा शिदोरे बाईंचे दिवस फिरले. त्यांना आता रोज मेमो येऊ लागले. आणि परिणामी त्यांना शाळा सोडावी लागली. शाळा अजून त्यांचे १२०० रुपये देणे आहे.

३ : हीच गोष्ट बोरकर नावाच्या शिक्षिकेची. त्यांच्या पगारातून शाळेला ठेव म्हणून सक्तीने महिना १०० रु.

पृष्ठ ६३ वर

# गुरुजींनंतरचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

सुधीर बेडेकर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि सरसंघचालक गोळवलकर गुरुजी या दोन गोष्टी गेली कित्येक वर्षे एकमेकांपासून वेगळ्या काढताच येत नसत. डॉ. हेडगेवार यांच्यानंतर गुरुजींनीच आपले परीश्रम, संघटनाकौशल्य आणि एकाग्र निष्ठा ओतून संघ जोपासला आणि वाढवला. त्यांच्या निधनानंतर संघाचा, त्याच्या कार्याचा आणि भविष्याचा वेगळा विचार होऊ लागल्याचे दिसते आहे.

दोन वेगवेगळ्या ठिकाणहून मांडले गेलेले विचार पहाण्यासारखे आहेत. 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांनी १६ जूनच्या अंकात संघाच्या पुढील ध्येयधोरणाला दिशा दाखवणारा एक लेख लिहिला आहे. श्री. श्री. ग. एकेकाळी संघाचे कार्यकर्ते होते. त्यांना संघाची विचारप्रणाली, रचना आणि कार्य यांची चांगली माहिती आहे. संघाची शक्ती कशात आहे आणि दुबळेपण कशात आहे हेही ते जाणतात. अत्यंत सुसंघटित, शिस्तबद्ध असा निष्ठेच्या कार्यकर्त्यांचा एक संच ही संघाची ताकद आहे—सर्वोदय वगैरे संघटना किंवा बहुतेक राजकीय पक्ष यांच्यामध्ये नेमके हेच दिसत नाही. अशावेळी मजबूत संघटना ही एक शक्ती आहे हे खरेच. पण नुसती संघटना असून पुढे काय ? आज देशापुढे जे प्रश्न आहेत, समाजाचे मुळापासून परिवर्तन घडवण्याचे काम आहे त्याचे काय ? त्याकरता परिवर्तनाला सुसंगत असे विचार, निश्चित कार्यक्रम व त्यानुसार कृती ह्या गोष्टी संघाकडे आहेत काय ? तसे नाही असे श्री. गं.ना जाणवते आहे. कारण ते जगात आज काय चालले आहे हे उघड्या डोळ्यांनी पहात आहेत. कृषिप्रधान चीनने स्वतःच्या देशाच्या उन्नतीकरता चालवलेल्या भव्य प्रयोगाचे महत्त्व त्यांना कळले आहे. स्वावलंबनाचे महत्व कळले आहे आणि सर्वात मुख्य म्हणजे प्रत्यक्ष जनसमूह जागे होऊन सामूहिकपणे समाज बदलत असतात हा धडा त्यांनी घेतला आहे. जनसमूह उठवण्याकरता व प्रगतीचा शास्त्रशुद्ध कार्यक्रम राबवण्या-

करता जे लागते ते संघामध्ये नाही हा दुबळेपणा त्यांना स्पष्ट दिसतो आहे.

आणि म्हणून त्यांनी खालीलप्रमाणे उपाय सांगितलेला आहे. सत्तेपासून पूर्ण अलिप्त राहून, निष्काम वृत्तीने समाज-परिवर्तन करणारा एक यतीवर्ग ही संघाची बैठक आहे. गांधीजींनी जेव्हा काँग्रेसचे लोकसेवादलात रूपांतर करावे अशी कल्पना मांडली ती हीच होती. पण गांधीवादी सत्तेच्या मागे लागले व हे स्वप्न साकार झाले नाही. हे अपयश धुवून काढून, जगासमोर दंडहीन समाज-क्रांतीचा एक नवाच प्रयोग ' उभा करण्याची ऐतिहासिक संधी संघाला आहे असे ते म्हणतात. संघटना, समाज-परिवर्तनाच्या दिशेने कृती आणि राज-सत्तेपासून अलिप्तता ही त्रिसूत्री संघाने मानावी हा याचा अर्थ आहे. त्याला ते संघ व गांधीवाद यांचा मेळ घालणे म्हणतात.

## नव्या सरसंघचालकांचे भाषण

१३ जुलैच्या प्रज्वलंत साप्ताहिकात नवे सरसंघचालक प. पू. बाळासाहेब देवरस यांचे १५०० संघकार्यकर्त्यांसमोर केलेल्या भाषणाचा वृत्तांत आहे. ते म्हणतात की, १. लोकांच्या टीकेमुळे संघकार्यकर्त्यांनी वस्तुनिष्ठ आत्म-परिक्षण करायला लागले पाहिजे. २. संघाने सामाजिक समस्या सोडवण्या-बाबत भरीव कार्य करून जनतेच्या संघाकडून असलेल्या अपेक्षा पुऱ्या केल्या पाहिजेत. ३. राजसत्तेशी संघर्ष घेणे संघाला मान्य नाही. ' कारण कोणत्याही पक्षाचे शासन असले तरी शेवटी ते राज्य आपलेच आहे अशी आमची धारणा आहे. ' आम्ही फक्त वाईटा-विरूद्ध प्रतिकार करण्याची शक्ती समाजात आणू बघतो.

यावरून हे स्पष्ट आहे की श्री. गं. नी सांगितलेला मार्ग संघाच्या नव्या नेतृत्वाला पूर्णपणे मान्य आहे! फरक फक्त तपशिलाचा पडला तर पडेल. मग खरोखरच संघ ' दंडहीन समाज क्रांती 'चा भव्य प्रयोग करू शकेल काय ?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्याआधी गोष्ट: संघचालकांनी केलेला दावा व श्री. गं. नी संघाला सत्तेपासून अलिप्त-तेचे जे प्रशस्तीपत्रक दिले आहे ते योग्य आहे काय ? जनसंघाची शामाप्रसादां-करवी स्थापना, त्यांना पुरवले जाणारे कार्यकर्ते, संघाचे स्वयंसेवक निवडणुका व इतर राजकीय कृतींमध्ये घेत असलेला भाग ही मग कशाकरता ? श्री. गं. नीच याचे उत्तर दिले आहे! ' सत्ता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हाती घेण्यापेक्षा सत्तेवर संस्कारसंपन्न व्यक्ती व गट आणून ' आपण आर्य व चाणक्याप्रमाणे निवृत्त व्हावे असा गुरुजींचा कल होता व स्वयसेवकांना तसेच शिकविले जाते असे त्यांनी लिहिले आहे. याचा अर्थ संघाला सत्तेत रस नाही असा होतो का ? आपल्या मतांची व धोरणांची माणसे व गट सत्तेवर यावीत असेच हे धोरण नाही का ?

तेव्हा संघ सत्तेपासून अलिप्त नाही. फक्त त्यांनी निवडणुकांमधून मते मिळ-

**पृष्ठ ६० वर**

मुक्काम पुणे

# लोकशाही, राष्ट्रवाद आणि स्वच्छ कारभार !

## महापौरांची मुलाखत

महापौर म्हणजे जो प्रत्येक समारंभाला हटकून उपस्थित राहतो पण जो कुठेही गेला नाही तरी काहीही बिघडत नाही असा प्राणी. पुण्याच्या बहुतेक सर्व महापौरांनी महापौरपदाची ही परंपरा कसोशीने पाळली होती.

पण निळुभाऊंनी मात्र ही परंपरा मोडली, (बाकी या समाजवादी मंडळींना परंपरा मोडण्याचा फार नाद— परंपरा ही मोडलीच पाहिजे, ती चांगली का वाईट हा भाग क्षुल्लक. परंपरा हा शब्द ते न मोडता वापरतात हेच नशीब !)

निळुभाऊ मोजक्या आणि आवश्यक त्या ठिकाणीच गेले.

महापौरपदाची निळुभाऊंची मुदत संपत आली. श्रीमंत माजगावकरानी आज्ञा केली, 'मुलाखत घेऊन येणे.' ('माणूस'च्या ऑफिसचा जुना वाडा, बाहेर उभा असलेला रखवालदार, जुन्या पद्धतीच्या नक्षीदार खिडक्या, डोक्यावर लटकणारी हंड्या-झुंबरं, आणि कपाटांत चटकन् नजरेत भरणारी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांची पुस्तके पाहिल्यावर माजगावकरांना 'श्रीयुत' म्हणायला जीभ कचरते ! )

निळुभाऊंच्याविषयी अनेक विविध गोष्टी ऐकल्या होत्या. हा गृहस्थ म्हणे अगदी वेळेवर येतो, उद्धटपणा व तुसडेपणाने वागत नाही इ. इ. त्यामुळे 'उरी अस्वस्थता वागवत' वेळेआधी अर्धा तास आधीच कॉर्पोरेशनमध्ये दाखल झालो. कॉर्पोरेशन या शब्दाभोवती एक सुस्तपणाचे, आळशीपणाचे वेगळे वलय आहे. प्रत्येक शब्दाला एक स्वभाव असतो. भारतातील पार्लमेंटमधील मारामाऱ्या, आदळआपट माहीत असूनसुद्धा अजून 'पार्लमेंट' म्हटले की उगीचच काहीतरी लोकशाहीचे मंदिर वगैरे आठवायला लागते. 'कॉर्पोरेशन' (खरे म्हणजे 'कारपोरेशन') म्हटले की ही इमारत उगीचच आढ्याला पाय कायम लोळत आहे अशी वाटते ! झपझप चालणे, हळू आवाजात बोलणे, वेळच्या वेळी काम करणे या गोष्टींना कॉर्पोरेशनच्या कायद्यात बंदी आहे की काय कोण जाणे. बाहेरची सुंदर बाग बघत माणूस एकदा का आत गेला की सर्व चैतन्य, उत्साह गमावूनच बाहेर यावा. महापौरांच्या ऑफिसपाशी गेलो. बरीच कॉर्पोरेटर मंडळी कुठलीशी मीटिंग संपवून जात होती. सबंध कॉरिडारमध्ये अनेकजण ओळख मागण्यासाठी, भेटण्यासाठी, आपापली कामे व्हावीत म्हणून उभे होते. गरीब, अज्ञानी माणसं—कॉर्पोरेशनची काहीच माहिती नसलेली—

इकडून तिकडे टोलविली जात होती—लाचारी या शब्दाला राहण्यासाठी या लोकांच्या चेहऱ्याखेरीज दुसरी जागा मिळाली नसावी.

मुलाखतीची वेळ टळून १० मिनिटं झाली तरी निळुभाऊ आले नव्हते. शेवटी त्यांच्या सेक्रेटरींना सांगून ' योग्य ती व्यवस्था केली गेली. '

महापौरांच्या ऑफिसमध्ये वाट पहात बसलो. खाली लाल गालीचा मऊ मऊ खुर्च्या, कोच, हवेशीर खोली आतापर्यंत होऊन गेलेल्या सर्व महापौरांचे गाऊन घालून काढलेले रंगीत फोटो भिंतीवर लावलेले—एका कोपऱ्यात आचार्य अत्र्यांचा स्मितहास्य करीत असलेला अर्धपुतळा—समोरच्या भिंतीवर लो. टिळक, महात्मा गांधी पंडित नेहरू, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर असे ठरीव सेक्युलर फोटो होते. निळुभाऊ काँग्रेसचे नव्हते त्यामुळे इंदिरा गांधींचा फोटो मात्र दिसत नव्हता.

पुणे महानगरपालिकेचे कॅलेंडर वाऱ्याने फडफडत होते. महानगरपालिकेचे कॅलेंडर तरी वेळच्या वेळी व बरोबर तारखा दाखवत असेल अशी आशा आहे !

' सॉरी, उशीर झाला. माणसे जमा होतात, प्रत्येकाशी थोडे तरी बोलावेच लागते ना...

निळुभाऊ पुटपुटत घाईघाईने आत आले.

महापौरपद हे नुसते शोभेचे पद आहे, कॉर्पोरेशनमधील ' वादळी सभा ' चालविण्यापलिकडे त्यांना काहीही अधिकार नाहीत. निळुभाऊंनी याबाबत काही खटपट केली का ते माहीत नव्हते.

' आमची सबंध भारतातील महापौरांची एक कॉन्फरन्स आहे तिची खटपट चालू आहे. पण सरकार लक्ष देत नाही ' निळुभाऊ भराभर बोलत होते. मध्येच शिपायाने पाण्याचा ग्लास आणून ठेवला.

' निळुभाऊ, महापौर या अधिकारात तुम्ही काही विशेष केले का ? अशी एखादी Achievement सांगता का, जी तुम्ही महापौर असल्यामुळेच पदरात पडली ?

दुष्काळनिधीचे निळुभाऊंचे काम प्रसिद्ध आहे. पण ते त्यांचे स्वत:चे पर्सनल आहे. मला ते नको होते.

' अहो, मी फार फार तर सूचना करू शकतो आणि तशा मी केल्या आहेत. शिवाय रोज मी दोन दोन तास लोकांना भेटून त्यांच्या अडचणी शक्य तितक्या दुर केल्या. आणि खरे म्हणजे लोकांचे म्हणणे सहानुभूतीने ऐकले तरी त्यांचे दु:ख हलके होते. निळुभाऊंचे भराभर बोलणे सुरू झाले.

पण कॉर्पोरेशनचा कारभार सुधारण्याचे...

' कॉर्पोरेशनचा कारभार म्हणजे नुसता गोंधळ आहे—माझे बोलणे तोडत निळुभाऊ म्हणाले, ' इथलं अधिकारी दोन दोन तास ऑफिसमध्ये नसतात. सगळ्या ' साइट्स् 'वर जाऊन यायला अर्धा—पाऊण तास पुरतो, पण हे लोक दोन दोन तास बाहेर असतात. मला वाटते यांची कामाची वेळ आता-

दुपारी दीड ते पाच अशीच ठेवावी म्हणजे लोकांना ताटकळत थांबायला तरी नको'

इतक्यात एक माणूस कसला तरी अर्ज घेऊन आला—निळुभाऊंनी त्याला शंभर रुपये द्यायची व्यवस्था केली. नंतर एक फोन वाजला.

या 'ब्रेक'चा फायदा घेऊन मी जातीय दंगलीच्या विषयाचे पिल्लू सोडून दिले—'नेमका दोष कुणाचा ते सांगा—'

'मी विशाल सह्याद्रीत जातीय दंगलीवर एक लेख लिहिला आहे—',


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन


(म्हणजे प्रश्नाला टोलवा टोलवी सुरू झाली!) त्यात मी प्रश्नावर सोल्यूशन सुद्धा सांगितले आहे—आणि आता डायग्नोसिस करून काय उपयोग?'

'पण जातीय तणाव वाढतोय याची कुणकुण तुम्हाला लागली असेलच ना—' मी माझे घोडे दामटतच होतो.

'होती ना. पण दोन मायनॉरिटीज्-मध्ये तो तणाव होता म्हणजे बौद्ध आणि...हे (म्हणजे मुस्लिम बरे का पण ते स्पष्टपणे म्हणायचे नसते!) त्यामुळे ते प्रकरण इतक्या विकोपाला जाईल असे वाटले नाही.'

निळुभाऊ ब्राह्मण. अगदी चित्पावन. त्यांना जात कुठे आडवी आली का याची उत्सुकता होती. मागे आचार्य अत्र्यांना हा त्रास झाला होता. पण निळुभाऊ मात्र सुदैवी आहेत. त्यांना ब्राह्मण म्हणून व्यक्तिगत त्रास झाला नाही.

झोपडपट्टीबाबत आपण सर्व महापौरांची एक मिटिंग बोलावणार आहोत असे निळुभाऊंनी जाहीर केले होते—त्याचे पुढे काहीच झाले नाही. म्हणून धडपड करीत गाडी झोपडपट्टीवर आणली.

: झोपडपट्टी हलवणे कठीण आहे. लाख, सव्वालाख लोकांना कुठे हलवायचे?

झोपडपट्टीतच सुधारणा करायची म्हटले तरी त्या लोकांना या सुधारणा समजावून सांगण्यासाठी माणसे ठेवायला लागतील. ग्रामसेवकासारखा झोपडपट्टी सेवक ठेवला तर त्याचा उपयोग होईल.

: पण दिल्लीत तर जनसंघाने खूपच प्रगती केली आहे.

: दिल्लीची गोष्ट वेगळी पडते. त्यांना फायनान्सचा वगैरे प्रश्न येत नाही.

बराच वेळ झाला होता, शिपाई सूचक फेऱ्या मारत होता.

निळुभाऊ समाजवादी. त्यामुळे मुलाखतीत एकदातरी 'समाजवादी समाजरचना' ही Phrase वापरायची आणि समाजवादाचा उद्‌घोष करून निळुभाऊंना खूष करायचे असे ठरवले होते. पण समाजवादी तत्वज्ञान वगैरे मी बोलू लागताच निळुभाऊ उसळून म्हणाले.

'हा समाजवाद वगैरे नुसता गोंधळ आहे. समाजवादी पक्षच बरखास्त करून टाकला पाहिजे. मी मधु लिमये वगैरे लोकांच्या मागे लागलोय की आपण हा पक्ष बरखास्त करू. फक्त लोकशाही, राष्ट्रवाद आणि चोख कारभार या तीन गोष्टींवर निवडणूक लढवली तरी ५०–६० टक्के मते मिळतील.

समाजवाद म्हणजे काय ते ठोस शब्दात सांगितले पाहिजे – (वा, स्पष्ट शब्दात काय ते सांगितल्यावर त्यात गंमत ती काय राहिली !) नुसते गरिबी हटाव म्हणून काय उपयोग? अशी बडबड करून इथली गरीबी कधीच हटणार नाही.

अरेच्चा, म्हणजे निळुभाऊंनी माझाच 'मामा' केला की, बरे झाले मी समाजवादाची स्तुती केली नाही.

बाहेर लोकांची गडबड व गर्दी वाढत होती. मी निळुभाऊंना नमस्कार करून उठलो. दारापाशी कित्येक माणसे उभी होती. शिपाई त्यांना रांगेत उभे राहायला सांगत होता. निळभाऊंना भेटल्यावर आपले दुःख कमी होईल, अडचण दूर होईल, निदान धीराचे दोन शब्द तरी कानी पडतील या आशेने ही माणसे आली होती. आणि निळुभाऊंनी याबाबतीत कोणाची कधीच निराश केलेली नाही.

**–माणूस प्रतिनिधी**

---

◻ अतिआखूड स्कर्टस्, पारदर्शक कपडे, बेसुमार लांब केस या गोष्टींना कोरियन सरकारने बंदी घातली आहे. ही बंदी नुसती औपचारिक नाही. परवाच कु. पार्क चोंग-सुक नावाच्या वीस वर्षांच्या तरुणीला मर्यादाभंग केल्याच्या अपराधावरून दोन दिवस तुरुंगाची हवा खावी लागली. तिने म्हणे मांड्या झाकण्यासाठी जो स्कर्ट घातला होता तो गुडघ्यांपासून वीस सेंटिमीटर्स वर होता.

म्हणजे तो कमरेपासून किती खाली असेल याचा हिशेब ज्याचा त्यानेच करावा हे बरे.

---

# खताचा गोंधळ पालघर, वसई

पंढरीनाथ चौधरी

दर वर्षी खताचा गोंधळ ठाणे जिल्ह्यात चालू असतो, कधी वेळेवर खत मिळत नाही, तर कधी त्याचा राजरोस-पणे काळाबाजार होत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे नेहमीच हाल होत असतात.

या वर्षी खताचा गोंधळ पालघर तालुक्यात झाला आहे, गेल्या वर्षी अवर्षणामुळे भाताचे पीक येऊ शकले नाही. पावसाअभावी सर्वत्र भयानक परिस्थिती निर्माण झाली. पालघर तालुक्यात एकाच गावची आणेवारी ६ आण्यावर लागली, बाकी सर्व गावे सहा आण्याखाली. कोठे २ आणे ते ४ आणे पीक आले होते.

यावर्षी सुरुवातीला मृग नक्षात्राचा पाऊस झाला शेतकरी खुषीत आले. त्यांनी पेरण्या केल्या सुरवातीला पेरण्या करण्याइतका पाऊस उत्तम पडला पेरण्या झाल्या व १५ दिवस पावसाने दडी मारली. कडक उन्हामुळे भाताची रोपे करपू लागली पुन्हा गेल्या वर्षा-प्रमाणे अवर्षण पडणार की काय अशी भीती सर्वांना ग्रासू लागली. रोपे जगविणे शेतकऱ्याला जिकिरीचे झाले. झारीने पाणी घालून काही शेतकऱ्यांनी रोपे जगविण्यासाठी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १५ दिवसानंतर पावसाला पुन्हा सुरुवात झाली. शेतकऱ्यांचे कोमजलेले चेहरे भाताच्या रोपाप्रमाणे पुन्हा टवटवीत झाले. आता रोपांच्या वाढीसाठी शेतकऱ्यांना खताची जरूरी होती. पालघर तालुक्यात खरेदी विक्री संघ आहे. या संघाने दोन वॅगन युरिया खत आणले होते. खताची ६० हजार रुपयांची हुंडी मुंबईच्या एका वडया व्यापाऱ्याच्या पेढीवर सोडविण्यात आली. खत मात्र खरेदी विक्री संघाच्या गोदामात येऊन पडण्याऐवजी ते पालघरच्या हिरालाल नावाच्या एका वडया व्यापाऱ्याच्या गोदामात जाऊन पडले, सोसायटयांकडे खताची मागणी वाढू लागली. परंतु खतच उपलब्ध नाही मग शेतकऱ्यांना कोठून मिळणार! ५० किलो ग्रॅमच्या युरिया खताच्या एका पोत्यास सरकारी भाव ४९ रु. ७५ पैसे. पुरे ५० रुपये नाहीत. परतु खाजगी व्यापारी तेच खताचे पोते ६० ते ७० रुपयाप्रमाणे विकतात. सोसायटीकडे खत नाही. शेतातील भाताच्या रोपांना खताची जरूरी आहे. काळचा बाजारात मात्र खत उपलब्ध आहे. वास्तविक पालघर तालुका खरेदी विक्री संघाच्या व्यवस्थापक पदावर तालुका पंचायत समितीचे सभापतीच आहेत. असे असताना खरेदी विक्री संघाने मागविलेल्या खताच्या दोन वाघिणी या खाजगी व्यापाऱ्याच्या गोदामामध्ये कशा गेल्या

असा प्रश्न पालघर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये उपस्थित झाला आहे. सहकारी सोसायट्यांमार्फत वेळेवर खत पुरवठा पुरेशा प्रमाणात न झाल्या कारणाने व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणीचा गैरफायदा घेऊन, खताला जादा भाव घेऊन त्यांची पिळवणूक केली आहे.

पालघर तालुक्यातील शेतकऱ्यांची ही कहाणी परंतु वसई तालुक्यात आलेल्या खताचे वाटप सदोष पद्धतीमुळे जंगलपट्टीमधील अनेक शेतकऱ्यांना पोचू शकले नाही. शिखली येथे सहकारी सोसायटीचे गोदाम असताना त्या सोसायटीला डावलून बी. डी. ओ. श्री. नारखेडे यांनी खताचा साठा एका खाजगी इसमाच्या घरात व मराठी शाळेच्या एका खोलीत साठवून ठेवल्यामुळे शाळेत येणाऱ्या लहान मुलांना, वर्गाबाहेर बसावे लागत होते. पाऊस पडत असताना मुले वर्गाबाहेर ओटीवर बसून असत व पावसात भिजत, परंतु माजी उपसभापतींची गेलेली पत सावरण्यासाठी बी. डी. ओ.नी हा नसता उद्योग केला असे लोक म्हणत आहेत. खत वाटपाबाबत जिल्हा शेतकी अधिकाऱ्याने एक बैठक वसई येथे घेतली असता याबाबत चर्चा झाली. त्यावेळी बी. डी. ओ. श्री. नारखेडे यांनी सोसायटीच्या गोदामात खत न ठेवता ते एका खाजगी इसमाकडे ठेवल्याबद्दल चूक जरी मान्य केली तरी ती चूक अद्याप त्यांनी दुरुस्त केलेली नाही व पावसाळ्यात मात्र शाळेतील मुलांना पाण्यापावसात भिजत राहावे लागते. ● ● ●

---

¤ स्कॉटलंडमधील एका पाईनवृक्षावर मोठा कडक पहारा बसविण्यात आला होता. झाडाभोवती काटेरी तारांचे कुंपण घातले होते; त्यातून विद्युतप्रवाह खेळवला होता; शिवाय नऊ पहारेकरी चोवीस तास लक्ष ठेऊन होते. झाडावर ऑस्प्रे किंवा फिश हॉक नरमादीने घरटे केले होते. हा पक्षी अतिदुर्मिळ होत चालल्याने त्याची अंडी जपण्यासाठी ब्रिटिश रॉयल सोसायटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ बर्डस् या संस्थेने त्या झाडाची आणि घरट्याची अशी सख्त देखभाल चालवली होती. – संस्थेच्या या दूरदृष्टीच्या प्रयत्नाला यश आल्याची वार्ता आहे. निदान एक पिलू तरी जन्मले आहे; आणखी काही जन्मतील अशी शक्यता आहे.

# सो ल क ढी

## चिनी प्रेक्षक

चीन हा माझ्या अभ्यासाचा विषय नाही. ज्या विषयाची आपल्याला माहिती नाही त्या विषयाबद्दल बोलता-लिहिताना, तो आपल्या अभ्यासाचा विषय नाही, असे प्रौढाईने सांगण्याची साहित्यिक सवय मी स्वतःला लाऊन घेतली आहे. त्यामुळे इतर काही विषय आपल्या अभ्यासाचे आहेत, ही गोष्ट कशी छान खुबीखुबीने सूचित होते. असो. चीनबद्दल मला काही माहिती नाही, एवढे आपण तूर्त लक्षात घ्यावे. काही माहिती नसल्यामुळे चीन ही यक्षभूमी असली पाहिजे अशी माझी समजूत होती.

या यक्षभूमीबद्दल काही महिन्यांपूर्वी एक बातमी मी वाचली. तिच्याप्रमाणे चीनमध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याची मनाई सरकारने केली होती; आणि पाठोपाठ सारा देश कसा लख्ख झाला होता. चिनी सरकारची ही ताकद पाहून मी चाट झालो होतो. भारताला चिनी राज्यपद्धतीशिवाय तरणोपाय नाही, असे मत मी गुपचुप बनवून ठेवले होते.

इतक्यात एक वेगळीच गोष्ट माझ्या कानावर आली. 'स्पेक्टेटर' या नियतकालिकाचा नृत्यसमीक्षक रॉबिन यंग नुकताच एक महिना चीनमध्ये राहून आला. तो सांगतो: मैफिल किंवा कार्यक्रम चालू असताना चिनी प्रेक्षक आपसात सारखे बोलत असतात; विशेष आवडलेल्या गोष्टींचे मोठमोठ्याने कौतुक करतात. त्याशिवाय मधूनमधून घसा साफ करणे आणि घशातला ऐवज प्रेक्षागृहातल्या जमिनीवर अनुरूप नादासह उतरवणे, हे त्यांचे काम व्यवस्थित चालले असते.

हे ऐकल्यापासून, भारताला भारतीय राज्यपद्धतीच तारणार आहे, असे माझे मत मी जाहीरपणे सांगायला सुरुवात केली आहे ! ⌑

## ऑक्सफर्ड शब्दकोश-पुरवणी

इंग्रजी ही जगातली एक थोर भाषा आहे ही गोष्ट, संस्कृताभिमानी मंडळी सोडली तर बाकीच्यांना सहज पटेल असे वाटते. मला तर संस्कृत आणि इंग्रजी दोन्ही भाषा सारख्याच येत असल्यामुळे, म्हणजेच येत नसल्यामुळे दोन्ही थोरच वाटतात. त्यातही संस्कृत देववाणी असल्यामुळे लिहायबोलायचा प्रसंग येत नाही. इंग्रजीला मात्र कधीमधी तोंड द्यावे लागते; आणि मग आपले नाव 'उकिडवे' किंवा तत्सम काहीतरी आहे असे मला वाटत राहते.

या इंग्रजीशी आम्ही इतकी वर्षे झटापट करतो आहोत; पण ती बया काही केल्या वश होत नाही. खरे म्हणजे गणपतीअथर्वशीर्ष आणि पॉकेट ऑक्सफर्ड डिक्शनरी एकदमच घरात आली आमच्या. अथर्वशीर्ष पाठ झाले; विसरले. डिक्शनरीचे मात्र अजून काही जमले नाही. तसे जमवून देण्याचा चंग आमच्या उपाध्ये मास्तरांनी बांधला होता. डिक्शनरीवर त्यांची भारी भक्ती. त्यात पुन्हा शुद्ध उच्चारांचे वेड. वर्षभर त्यांनी आमची छळणूक केली; पण आमच्या वातड इंग्रजीने त्यांना काही दाद दिली नाही. ' द ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी 'बद्दलचा आदर मात्र ' गीता-रहस्या 'च्या बरोबरीने क़ायम राहिला.

या आदरणीय ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीच्या त्रिखंडात्मक पुरवणी-बद्दलची माहिती नुकतीच वाचली. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने अशी एक पुरवणी, मागे १९३३ साली, काढली होती. पण गेल्या चाळीस वर्षात अक्षरश: हजारो शब्द इंग्रजी भाषेत जमा झाले आहे; आणि त्यांची रीतसर व्यवस्था या बृहत्कोशात लावणे अगत्याचे होते. त्या दृष्टीने साहेब कामाला लागला. साहेब कामाला लागल्यावर काम करत असल्यामुळे पुरवणीचा पहिला खंड त्याने तत्परतेने पुरा केला. त्यात 'ए' ते 'जी' आद्याक्षरांचे १८००० शब्द आहेत. पुरवणीच्या तिन्ही खंडात मिळून ५०००० शब्द संग्रहीत होतील असा अंदाज आहे.

साहेबाच्या या पुरवणीकोशात जगातल्या सगळ्या भाषातील 'इंग्रजी' शब्दांना यथोचित स्थान मिळाले आहे. भारतीय भाषांतील कितीतरी शब्द येथे पाहायला मिळतात.उदाहरणार्थ, घेराव. १९६७ साली प्रथम हा शब्द प्रचारात आला; आणि आता तो ऑक्सफर्ड शब्दकोषात जाऊन बसला. बक्षीस, बिहारी, भजन, दु:ख, घाट, घराणा या शब्दांची तशीच अनेक भारतीय खाद्य-पेय नावांची वर्णी कोशात लागली आहे. 'चहा' आपल्या अनेक लिखितरूपांसह मौजूद आहे इथे.

'ललित' मासिकाच्या ताज्या अंकात आपल्या वाचनाविषयी थोडेसे सांगणाऱ्या विनोबांनी लिहिले आहे: ऑक्सफर्ड डिक्शनरी मी आरंभापासून आतापर्यंत वाचून काढली आहे. कोण शहाणा डिक्शनरी वाचील?... खरे आहे. मात्र शहाणे डिक्शनरी वाचत नसले तरी ते डिक्शनरी आणि तिची पुरवणीसुद्धा तयार जरूर करतात. ● ●

---

लिबियामध्ये सध्या सांस्कृतिक क्रांतीचे वारे वाहते आहे. लिबियाची राजधानी असलेल्या ट्रिपोलीतील नागरिक समितीच्या मते ब्रह्मचारी मंडळी सुखी कौटुंबिक जीवनाला धोकादायक आहेत. त्यामुळे नागरी वस्ती आणि व्यापारी विभाग सोडून ब्रह्मचर्यांनी निघून जावे, असा फतवा या समितीने काढला आहे. ब्रह्मचारी मंडळी खुशीने निघून न गेल्यास त्यांना सक्तीने घालवण्यात येईल, असा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

---

# दंगल

# १६ मे

# पुणे

## अनिल अवचट

पुण्यात सोळा मे ते तेवीस मे हिंदुमुसलमान दंगल झाली. त्याला आता तीन महिने झाले. अजून दंगलीची आठवण झाली की आश्चर्य वाटते. या पुण्यात विचारवंतांची कमतरता नाही. प्रबोधनाची या शहरात परंपरा आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळासारखी पुरोगामी चळवळ येथेच सुरू झाली आणि रुजली. एसेम जोशींसारखी हिंसकतेला विरोध करून, शांततामय आंदोलने करणारी मोठमोठी माणसेही येथे आहेत. हिंदु-मुसलमान प्रश्नापेक्षा तीव्र स्वरूपाचे आणि सर्व सामान्य लोकांचे जीवन भणंग करणारे अनेक प्रश्न आज समाज-जीवन ग्रासून टाकीत आहेत. पुण्यात नसला तरी महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ पडलेला आहे.

हे सर्व असून, ह्या सगळ्या गोष्टी, सर्व नेतृत्व, त्यांचे विचार यांना बाजूला सारून पुण्यासारख्या एखाद्या शहरात एक दंगल उसळते काय आणि नेहमी-सारखी एखाददोन दिवसात आटोपण्या-ऐवजी चार-सहा दिवस पुन्हा पुन्हा कढ येऊन रेंगाळते काय, ही गोष्ट विलक्षण वाटते.

दंगलीच्या आधी पेपरमध्ये कोपऱ्यात कुठेतरी येऊन गेलेल्या अर्धा एक इंची बातम्यांच्या कॉलमाआड एवढी प्रचंड खळबळ दडली असेल असे वाटले नव्हते. एका बौद्ध वरातीवर दुसऱ्या जमातीने सोडावॉटरच्या बाटल्या फेकल्या. वरात उधळली गेली. ही अशीच एक छोटीशी बातमी. किंवा पैगंबर जयंती मिरवणुकी-वर दोघा तरुणांनी ॲसिड बाटल्या

फेकल्या. दोन दिवसांनी त्या हिंदू तरुणांना अटक, अशी एक बातमी. तसेच, छाया टॉकीजसमोर दोन गटात मारामारी. एक जखमी, हल्लेखोर फरारी, अशीही एक बातमी.

किंवा ऐकलेल्या गोष्टी होत्या की ज्यांचे महत्व त्यावेळी जाणवले नव्हते. खेड शिवापूरला काही मुस्लिम नेत्यांची गुप्त बैठक झाली. स्वसंरक्षणार्थ प्रत्येकाने घरात, मशिदीत शस्त्रसाठा करावा असे ठरले. (ह्या तामिरे मिल्लतचा औरंगाबाद दंगलीपासूनचा थिसिस आहे.) ह्या मिटींगची बातमी आणि हकीगत समजताच पुण्याच्या पोलीस कमिशनरने मुस्लिम नेत्यांना बोलावून, इथे कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी आमची आहे. तुम्ही साठे केलेत तर परिणाम चांगले होणार नाहीत, अशी त्यांना समज दिली.

याचा विपर्यास करून, तुम्ही शस्त्रे साठवलीत तर मी पुण्याची भिवंडी करून टाकीन असा दम कमिशनरांनी आम्हाला दिला, अशी तक्रार मुस्लिम मंडळींनी इथल्या दिल्लीधिष्ठीत काँग्रेसनेत्यांकडे केली. त्यावर त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. त्यांनी याबाबतीत जपून वागण्याचा इशारा पोलिसखात्याला दिला. त्यामुळे कमिशनरांच्या कृतीवर बरीचशी बंधने पडल्यासारखे झाले.

प्रत्यक्ष दंगलीच्या काळात नामदेव पवारचे नाव सर्वांच्या तोंडी होते. ह्याने शिवजयंतीच्या मिरवणुकीतल्या फ्लोटमध्ये शिवाजीचे काम केले होते. मुसलमानांनी डूख धरून नंतर त्याचा अंगठा तोडला, असे प्रत्येकजण बोलत होता. त्यावरून दंगल उसळली असा एकंदर सूर असे.

दंगलीच्यामागे हिंदु-मुसलमान प्रश्नाचे राजकीय कारण तर मोठ्याप्रमाणात आहेच. यात दुमत नाहीच. पण सामान्य लोकांच्या पातळीवर हा प्रश्न येताना केवळ प्रचलित राजकीय स्वरूपातच येत नसावा. त्याला आणखीही बऱ्याच बाजू असाव्यात, असे वाटले. म्हणून दंगल शमल्यावर त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तो असा—

या सगळ्या प्रकरणाच्या कारणांची नजिकच्या काळातली सुरुवात बौद्ध लग्न वरातीपासून होते. म्हणून त्याची चौकशी केली. पंधरा एप्रिलची ती रात्र, दुसऱ्या दिवशी पैगंबर जयंती. चौकात मौलाना वसीउद्दीन यांचे वाज (प्रवचन) चालले होते. तिकडून ही वरात आली. वाज पाहून बँडवाल्यांनी बँड थांबवला, यावर रागावून वरातीतल्या एका मातंग तरुणाने बँडवाल्याच्या तोंडात ठेवून दिली. बँड पुन्हा चालू. काही वेळाने वाज ऐकणारे लोक जमून बाचाबाची सुरू झाली. उभयपक्षी दगडफेक. हॉटेलात घुसून बाटल्या लुटून त्यांचीही फेक, असे प्रकार झाले. सर्वत्र पळापळ झाली. पोलीस आले. त्यांनी नवरानवरीला पुढे काढून दिले. पुढच्या चौकातून वरात पूर्ववत चालू लागली.

त्याच्या दुसऱ्या दिवशी पैगंबर जयंतीची मिरवणूक निघाली. तिच्यावर लक्ष्मीरोडवरच्या सतरंजीवाला चौकात

दोन अॅसिड बाटल्या फेकल्या गेल्या.

चार दिवसांनी शिवसेनेची सवाद्य मिरवणूक निघाली. दोन दिवसांनी बाळ ठाकरे पुण्यात येणार होते हे निमित्त. मक्का, मदिना, जुम्मा, तांबोळी या मशिदीवरून सगळे वाजत गाजत गेले. कागदात गुलाल बांधून बोळे मशिदीवर फेकण्यात आले. मक्का मशिदीवरचे घड्याळ फोडण्यात आले. ट्यूबलाईट फोडली. दगड आणि चपला आत फेकण्यात आल्या. मिरवणुकीत एक मुसलमान पात्र असे. इतर भोवती फेर धरून 'बोल, वंदेमातरम् म्हणतोस की नाही ?' तो नाही म्हणताच मागचा माणूस त्याच्या ढुंगणात तलवार खुपसल्यासारखी करे. यावर मुसलमान पात्र 'या अल्ला, या अल्ला' असे ओरडे. त्यावर बाजूची मंडळी 'तेरे मुँहमे × ×' असे म्हणत.

त्यानंतर पंधरा दिवस मधे जाऊन चार मेला शिवजयंती आली. पुन्हा सवाद्य मिरवणूक. घोषणाबाजी, गुलाल उधळणे या पलिकड फारसे झाले नाही. कारण ती सर्वपक्षीय होती. मिरवणुकीचे आपापल्या भागात मुस्लिम पुढाऱ्यांनी स्वागतही केले होते.

नंतर चारच दिवसांनी, आठ मेला, नामदेव पवाराचा प्रसंग घडला. हा प्रसंग जरा तपशीलातून पहायचा ठरवले. एरवी त्यांच्यामध्ये कोणती भांडणे होती का याचीही चौकशी करावी म्हणून तिथे गेलो.

¤

शहर आणि कँपच्या सीमेवर छाया टॉकीज. सर्वत्र दाट वकाल वस्ती. समोर पत्र्याची चाळ नावाची झोपडपट्टी. बाजूला दिलखुश हॉटेल. ह्या हॉटेलात सर्व ग्रुप्स बसत असतात.

नामदेव पवार हा वीज बोर्डाच्या पॉवर हाऊस मधला लाईनमन. तिशी-पस्तीशीचे वय. पहिलवानी रग. बाकदार नाक. रंग काळा. जातीने मातंग. नामदेव हा आळीतल्या एका गटाचा दादा. व्याजाने पैसे देण्याचा याचा धंदा. रुपयाला चार आणे व्याज. म्हणजे दरसाल दर शेकडा तीनशे रुपये. पैशाच्या व्यवहारावरून इतरांशी सतत भांडणे.

यासिनखान हा बॉडी बिल्डर. बॉडी बिल्डिंगमधला 'महाराष्ट्र श्री.' दोन-चार महिन्यापूर्वी पतियाळातल्या अखिल भारतीय स्पर्धेत दुसरा. वडील पी. एम्. टी.त. आईचा व्याजाचा धंदा. यासिन स्वत: फारसा दादागिरीत नसे. पण त्याच्याभोवतीची माणसे परंपरागत गुन्हेगार. त्याचा मामा बादशहा. हा जुना मोठा दादा. भोकरवाडीत कुणाचा खून केला म्हणून पंधरा वर्षे शिक्षा भोगून नुकताच बाहेर आलाय, रेहमान, सरदार हे दुसरे मामा. त्यांची ख्याती असलीच. ह्या सर्वांचे एकत्रच उठणे-बसणे असते.

मातंग ग्रूपपैकी एकाची हकीगत अशी—तो जातीने मातंगच. पण बाप सैयद नावाचा जुना दादा. आता हाही दादाच. (त्या भागात अशी उदाहरणे बरीच.) अशा त्या माणसाने एका मुसलमान दारुड्या आणि जुगारी

माणसाला पैसे उसने दिले आणि त्या-बदल्यात त्याची मुलगी वापरू लागला. त्याच्या मित्रांसह त्याने एकदा तिला लोणावळ्यालाही नेली होती. त्या मुली-बरोबर स्वतःचे नग्न फोटो काढून तो यासिन आणि इतर मुसलमानांना ते दाखवून खिजवू लागला. ही मुलगी यासिनची दूरची नातेवाईक.

अंगठा तुटला ती आठ मेची गोष्ट.

त्या दिवशी रात्री त्या हॉटेलात एक दुसऱ्याला थेडग्या म्हणाला आणि दुसरा त्याला लांडा म्हणाला यावरून मारा-मारी झाली. हॉटेल मालकाने दोघांनाही चौकीवर पोहोचवले. नामदेव पवारला त्याचे दोस्त कामावरून रात्री बारा वाजता रिक्षा करून घेऊन आले. तो उतरताच यासिनने मागून तलवारीचा घाव मानेवर घातला. घाव बसतो आहे हे नामदेवच्या लक्षात येताच त्याने हात मानेभोवती धरला. आंगठा पूर्णपणे तुटला. मानेवर आठ-दहा इंच लांबीची ज़खम झाली. तसाच तो चालत जाऊन ससूनला ॲडमिट झाला.

तेवढ्यात पोलीस आले. पण जोर-दार दगडफेक करून यासिनच्या मित्रांनी यासिनला पळून जायची संधी दिली. आजतागायत तो फरारीच आहे. त्याची आई म्हणते, यासिन आठ तारखेला तिथे नव्हताच. भावाशी भांडण झाले म्हणून सहा तारखेलाच रागावून घर सोडून निघून गेला. यावर पोलिसांचे म्हणणे असे की यासिनला त्यारात्री तलवार घेऊन जाताना बऱ्याच जणांनी पाहिले आहे.

यासिनच्या मित्राला विचारले, साध्या मारामारीत तलवार कशी आणली ? तो म्हणाला, नामदेव त्या-रात्री मारामारीत होताच. आम्ही भारी पडू लागलो तेव्हा पलिकडच्या चौकात एक शिवसेनेचा ग्रूप आहे, त्यांना तो बोलवायला गेला. तयारी पाहिजे म्हणून आम्ही तलवार आणली. पण तो ग्रूप यांच्या मदतीला आलाच नाही.

नामदेव पवारचे घर पाहिले. पत्र्याच्या चाळीतल्या एका छोट्या खोलीत दोन प्रचंड गोदरेज स्टील कपाटे. मांडण्यांवर भांड्यांचे दुकान वाटावे इतकी भांडी, नामदेवने हात सोडून दाखवला. आंगठ्याच्या जागी काहीच नव्हते.

¤

प्रत्यक्ष दंगलीचा दिवस. १६ मे.

आदल्या दिवशी मुंबई-बंद फसला होता. पुण्यात तसेच होणार असा अंदाज होता. बंदमध्ये शिवसेना नव्हती. बंद-वाल्यांचा सकाळी मोर्चा निघून कलेक्टर कचेरीवर जाणार होता. कॉंग्रेसचा बंदला अर्थातच विरोध. पदाधिकाऱ्यांनी आपापली दुकाने उघडी ठेवावीत असा पक्षाचा आदेश होता. त्याप्रमाणे बबन किराड, बबन पडवळ, शिवाजीराव ढेरे, मिर्झा हिरौली या लोकांनी दुकाने उघडीही ठेवली होती. इतरांना ते सांगायला गेले पण यांचे कोणी ऐकले नाही.

सकाळी मंडईजवळ बंदसाठी गेलेल्या जनसंघवाल्यांची मंडईवाल्यांशी थोडी

चकमक झाली पण लगेच निवळली. नाना पेठेत बबन पडवळच्या दुकानापुढे लोक जाताच त्यांनीही दुकान बंद केले.

मोर्चा मोठा होता. लक्ष्मी रोडने सकाळी अकरा वाजता अल्पना टॉकीजवरून गेला. मोर्चाचे शेवटचे टोक अल्पनाच्या पुढच्या चौकात असेल तो इकडे पंधरा ते बावीसच्या दरम्यान वयाच्या मुलांचा एक छोटा मोर्चा अल्पनासमोरच्या टकार गल्लीत शिरला. मशिदीवर दगडफेक केली. आणि पुण्याची दंगल सुरू झाली.

¤

टकार गल्लीत अंड्याची बरीच दुकाने आहेत. ही मुले एक दुकान बंद करावे म्हणून तिथे गेली आणि दगडफेक सुरू झाली. जाताना मशिदीवरही दगडफेक झाली. आतूनही दगड फेकीने उत्तर आले. मुलांना नंतर तिन्ही बाजूंनी कुमक मिळाली. दगडफेकीने मशिदीच्या आवारातल्या रिक्षाची मोडतोड झाली. जमावाने मशिदीबाहेरचे हॉटेल आणि तीन-चार दुकानेही जाळली.

ही प्रचलित हकीगत.

समोरचा अंडेवाला म्हणाला, माझे दुकान उघडे नव्हते. त्या पोरांनी वरच्या गजातून दगड मारले. त्यामुळे तसबिरी वगैरे फुटल्या. दुकान उघडे असते तर अंडी जाग्यावर राहिलीच नसती.

मशिदीच्या मुशवल्ली साबने (ट्रस्टीने) सांगितले, दगडफेक अचानक सुरू झाली. आम्ही बाहेर जाऊन त्यांना परतवले. एवढ्यात पोलीस आले आणि त्यांनी आम्हाला मशिदीत जायला सांगितले. आम्ही आत जाताच बाहेर जमावाने दुकाने जाळली. पोलिसांचे ऐकले आणि असे झाले.

मशिदीसमोर नागझरी हा सांडपाण्याचा ओढा वाहतो. त्याच्या काठावर, मशिदीच्या समोर चांभार लोकांची वस्ती आहे. तिथल्या ग्रुपचे मशिदीबाहेरच्या मलबारी मुसलमानाच्या हॉटेलात नेहमी उठणे बसणे असते.

सात मेला काही चांभार तरुणांनी बिल न देता त्या हॉटेलात खाल्ले. त्यावरून मलबाऱ्याला – त्याने विचारल्याच्या निमित्ताने–ठोकून काढले गेले.

चौदा मेच्या रात्री एक हिंदू वरात त्या मशिदीवरून जात असता त्यांनी बँड बंद केला. ही कट्ट्यावरची कंपनी पुढे आली आणि बँडवाल्यांना 'बँड बंद का केला? चालू करा' असे म्हणू लागली. वरातीच्या मालकाने पुढे येऊन या पोरांना विचारले, 'वरात कोणाची, तुमची का आमची? आम्हाला वाजवायचे नसेल तर तुम्ही हटकणारे कोण?' त्यावरून तिथे बरीच तक्रार झाली.

आणि सोळा मेचा हा प्रकार

टकार गल्लीत निदान दोन भिन्नधर्मीय गट आहेत. त्यांच्यात तेढही आहे. गुरुवार पेठेत एका भागात तेवढी तेढ असायला संख्याही नाही. एरवीच्या दंगलीत तिथे फारसे काही झालेलेही नाही असे असता कोपऱ्यावरच्या एका पानवाल्या बाईचे दुकान का लुटले याचे

कुतूहल वाटले म्हणून गेलो.

¤

तिचे नाव हसमतबाई.

कोपऱ्यावर हिचे पानाचे दुकान. रहायला जवळच. तिने सांगितले, त्या दिवशी दुकान बंद करून बसले असता एकदम गडबड झाली. आमच्या वाड्यात लोक शिरायला लागले. त्यांना आमच्या वाड्यातल्याच मराठ्यांनी अडवले. इथे मुसलमान रहात असले तरी आम्ही पण रहात आहोत, असे सांगून पिटाळले.

ते पुढे गेले तोच दुकान फोडल्याचा आवाज. मी दारात येऊन पाहते तो माझ्याच दुकानातले लोटे रस्त्यावर फेकलेले. माझ्यासमोर एकजण माझा स्टीलचा काटा घेऊन चालला होता, पण त्याला अडवणार कोण?

एकाने सांगितले, मी धावत गेलो. तेव्हा एकाने माझ्या दिशेने काचेची बरणी भिरकावली, मी मागे झालो. सबंध चौकात आरशाच्या, बरणीच्या काचा, सुपाऱ्या, जर्दा पुड्या, पैसे, सुटी नाणी पडली होती. जमेल तेवढा माल, पैसे लोक उचलीत होते.

हसमतबाई म्हणाली, त्यांनी माझे जुन्या काळचे कुलूप दगड घालून फोडले. एकेक पितळी लोटा बावीस रुपयाचा होता. खालची पितळी चक्कर चार रुपयाची. काशाचा मोठा ट्रे गेला. आरसे तर तसे मिळायचेही नाहीत. बरण्या एक्कावन रुपये डझन झाल्यात.

मी विचारले, हे लुटणारे आळीतले लोक होते का?

बाई म्हणाली, नाही. मी सगळ्यांना ओळखते. ते लोक मागच्या आळीचे होते.

यांच्या पुढचा भाग तिच्या आवाक्याबाहेरचा होता. म्हणून–त्या भागात एक पहिलवान राहतो, त्याला भेटलो. त्याला त्याच्या आळीत यावेळी दंगल नको होती. सेक्यूलर विचारापोटी नाही तर त्याच्या बऱ्याचशा भूमिगत व्यवसायांना दंगलीत त्रास होतो म्हणून. गेल्या पासष्टच्या दंगलीत त्याला पुण्याहून काही काळ तडीपार केले होते. यावेळी त्याने काही गडबड केली तर पोलिसांनी उचललेच असते.

या पहिलवानाच्या मागच्या आळीत दुसरे एक दादा राहतात. त्यांचे मंडईत आणि काँग्रेस राजकारणात फार वजन आहे. यांच्यात आणि पहिलवानात नेहमी मोठेपणासाठी स्पर्धा असल्याने पहिलवान यावेळी शांत आहे असे पाहून त्याचे नाक कापण्यासाठी मागच्या आळीतली पोरे दुपारी तीनला आली आणि काम उरकून तीन-वीसला गेलीही होती, पुढे पहिलवानाच्या लोकांनी अधिक काही होऊ नये म्हणून दक्षता घेतली तरी 'प्रतिष्ठा' जायची ती गेलीच.

पहिलवान म्हणाला, आम्हाला काय मुसलमानांचा राग येत नाही का? पण हे करून काय मिळणार? तो काय शिवाजीमहाराजांसारखा किल्ला सर करायचाय का बुरूज पाडायचाय?

¤

या दंगलीत बलवार आळी, धनगर आळी, भोई आळी, काची गल्ली, तांब-

टाची वस्ती अशी नावे ऐकू यायची. एरव्हीच्या दंगलीत मंडई भागातील मराठा मंडळींचे नाव प्रामुख्याने ऐकू यायचे ते या वेळेस गायब होते. आणि ही लहानसहान जातवाली मंडळीच जोरात होती. ही घटनाही नवीन वाटली म्हणून अशा भागात गेलो.

बलवार हे घोड्याच्या टांग्याचा धंदा करणारे लोक. गुरुवार पेठेत त्यांची आळीच आहे. ते परदेशी जातीपैकी असून स्वतःस क्षत्रीय रजपूत समजतात. यांच्यापैकी एका पहिलवानाचे कोपऱ्यावर हॉटेल आहे.

आळीतल्या बलवार मुलांनी आळीतल्या मशिदीच्या बाहेरच्या बाजूचे सलून फोडले होते. त्या सलूनमध्ये गेलो. मुसलमान न्हावी उभा होता. पोरसवदा होता. कधी मान वर करून न पाहील असा. त्याचे दुकान म्हणजे वर पत्र्याची एक छोटी खोली, फोटोग्राफरच्या डार्करूमसारखी आतील सर्व बाजूंनी काळी. न्हावी म्हणाला, कुठे टेकू नका, काळे लागेल. एका अर्धवट वाचलेल्या डेस्कातून त्याने आगीतून वाचलेल्या वस्तू दाखवल्या. काळे ठिक्कर पडलेले वस्तऱ्याचे पाते, त्याची अर्धवट जळालेली गुठळ्या गुठळ्याची मूठ. एक काळी कातरी. दोन फवारा मारायच्या काळ्या पडलेल्या नळ्या. आरशांचा चक्काचूर. खुर्च्या, टेबले, वायरिंग, कपाटे यांचा सर्वच सर्व कोळसा.

न्हावी म्हणाला, या वरच्या पत्र्यांचाही आता उपयोग नाही. कारण एकदा तापून लाल झालेल्या पत्र्याने पाऊस खाल्ला की त्याला गंजून भोके पडतात.

न्हाव्याला विचारले, तुमचे कोणाबरोबर भांडण होते का ? तो म्हणाला, अजिबात नाही. ही सर्व मुले माझी गिऱ्हाईके होती. ती मशिद जाळायला आली. पण मशिद आहे दगडविटांची. ती जळेना. तेव्हा त्यांना माझे दुकान सापडले जाळायला.

गवरे गल्लीत धनगर समाज राहतो. स्वतःला क्षत्रीय धनगर समाज म्हणवतो. हे लोक म्हणजे हिंदू खाटिक. मुसलमानांशी धंद्यात स्पर्धा ओघानेच.

यांच्या गल्लीत एक तीन मजली घर. प्रत्येक मजल्यावर प्रत्येक खोलीत रॉकेल टाकून पेटवले गेले. एक मोटारच्या बॅटरीचे दुकानही जाळले आणि लुटले आहे. एक्साईड बॅटऱ्यांच्या जळलेल्या खोक्यांचा खच अजून त्या चौकात पडलेला आहे.

नंतर कोमटी लोकांची वस्ती. त्यांनीही हात धुवून घेतला.

कसबा पेठेत भोई आणि तांबट या दोन मोठ्या जाती. यांची एकमेकात सतत भांडणे आणि वैर. भोई हे मच्छिमारीचा परंपरेने व्यवसाय करणारे. नदीकाठी वस्ती. हातभट्टीच्या व्यवसायात यांच्यातले काही लोक फार प्रसिद्ध. सध्या एकंदर हातभट्टीचे प्रस्थ कमी म्हणून यांचाही भाव कमी.

या उलट तांबट. हे जानवी घालतात. देवज्ञ ब्राह्मणांच्या दर्जाचे समजतात. लग्नातले विधी ब्राह्मणांसारखे. फक्त मांसाहारी.

तांबट-भोई वादात मुसलमानांबरो-

बर मधल्यामध्ये काही हिंदूंचेही नुकसान झाले. भोयांनी एका गुजराथी पंखेवाल्याचे दुकान फोडले. कारण त्याचा पुतण्या हा तांबट मंडळींचा दोस्त.

चांडक नावाच्या व्यापाऱ्याचेही दुकान फुटले.

तिकडे नागझरी काठी एका मुसलमानाचा हातभट्टीचा प्रसिद्ध अड्डा आहे. रोज संध्याकाळी तिथे यात्रेसारखी गर्दी जमते.त्याचा भागीदार एक भोई जातीचा शेट आहे. त्या दोघांनी प्रत्येकी एक अँबॅसिडर आणि सहा मजली घर बांधले आहे. दंगलग्रस्तांना मदत म्हणून मुसलमान शेटने सहा पोती गहू पाठवला. त्याचे निमित्त झाले आणि काही भोई मंडळी त्याचे घर जाळायला निघाली. तेव्हा त्याचे चुकले, माफ करा असे म्हणत त्याचा तो भोई भागीदार मध्ये पडला. त्याला लोक म्हणाले, शेट, तुम्हाला पाहिजे कशाला हा लांडा ? तुम्ही स्वतः धंदा चालवा. मग तीन अँबॅसिडर ठेवल्या तरी हरकत नाही.

¤

दंगलीत इतर छोटया जातींबरोबर दलित समाजही मोठ्या संख्येने उतरला होता. टकार गल्लीतला चांभार समाज आपण आधी पाहिलाच. इस्लामपुरा ते छाया टॉकीज या भागातला मातंग समाजही मोठ्या प्रमाणावर होता. अपवाद फक्त कँपातल्या भीमपुऱ्यातल्या नवबौद्ध समाजाचा. इस्लामपुऱ्यात गेलो.

इस्लामपुरा ते छाया टॉकीज या भागात मातंग समाज फार जोरात होता. एकतर आंगठा तुटलेला नामदेव पवार हा जातीने मातंग आणि वरातीवर हल्ला झाला त्यातही बरेच मातंग. एरव्ही सुधारकी परंपरेत बसणारे एक वृद्ध मातंग नेते मुसलमानांना म्हणत होते, तुम्ही आमचा आंगठा तोडलात, आम्ही तुमची मान छाटून टाकू. त्या भागात मुसलमान हे मालक आणि मातंग-बौद्ध हे मजूर हेही नाते आहेच. त्याचीही भर पडली. ह्या आधीच्या घटना घडत असताना तिकडे नव्याने स्थापन झालेली शिवसेना त्याला योग्य ते वळण देत होतीच. शिवाजी जसे मावळ्यांमधे स्फुरण निर्माण करी तसे हे करीत.

एरवी मातंग समाज समाजवादी पक्षाच्या प्रभावाखाली असतो. पण यावेळी त्यांचेही कोणी ऐकेना.

¤

या दंगलीत मुसलमान सहसा दुसरीकडे कुठे चालून गेले नाहीत. त्यांना तशी संधी मिळाली नाही. एका मुसलमानाने सांगितले, शिवजयंतीलाच काहीतरी होईल असे वाटले होते. पण तेव्हा झाले नाही. बंदची हूल त्यांनी आम्हाला दिली आणि दंगल झाली. एरवी आम्ही एवढा बेसावध मार खाल्ला नसता.

तरी मोमिनपुरा या मुस्लिमांच्या वस्तीत आणि कँपातल्या गायकसाई मशिदी नजिक मुसलमानांनी स्वतःला सावरून प्रतिकार आणि आक्रमण दोन्ही दाखवलेले आढळले. म्हणून त्या दोन्ही भागात नेमके काय घडले ते

पहायला गेलो.
□

मोमिनपुरा ही मुसलमानांची दाट वस्ती. मक्का आणि पिजारी या मशिदी याच रस्त्यावर.

इथली दोन्ही मुसलमान आणि हिंदू माणसे मूळ आंध्रातली नारायणपेठ गावची विणकर. तिकडे कामधंदा चालेना म्हणून काही वर्षांपूर्वी इकडे येऊन स्थायिक झालेले. हिंदूत साळी, त्यात सकुलसाळी,पद्मशाली इ. पोटजाती. दोन्ही जमातीत गेल्या पिढीत संबंध चांगले. भाषा एक, धंदा एक म्हणून. आता ती पिढी म्हातारी झाली. तरुणांचे विचार बदलले. सदतीसच्या दंग्यात इथे काहीच झाले नव्हते. पासष्टमध्ये विशेष नव्हते. यावेळी मात्र खूपच.

पलिकडे चाँदतारा चौक. पण हिंदू तरुणांनी तिथे लाल बहादूर शास्त्री मंडळ काढले आणि चौकालाही अग्रहाने लाल बहादूर शास्त्री चौक म्हणू लागले. प्रतिक्रिया म्हणून मुसलमान तरुणांनी झाकिर हुसेन मंडळ काढून मेयरांना दुष्काळनिधी स्वीकारायला बोलावून मान्यतेचे शिक्का मोर्तबही केले.

एका हिंदूने मुस्लिम मुलीला पळवून नेले आणि एका मुसलमानाने हिंदू मुलगी ठेवली त्यावरून परस्परात तेढ आहे.

दंगलीला सुरुवात दुपारी बारानंतर झाली.

दुकान बंद करायला गेलेल्या मारुती मानकर या तरुणास मुस्लिमांनी भोसकले. त्यावरून बाहेरून हिंदूंची दगडफेक आणि इकडून मुस्लिमांचा सशस्त्र जमाव अशी लढाई सुरू झाली. मुस्लिमांच्या हातात जंबिये, सुरे, गुप्त्या, गज, ट्रकच्या स्प्रिंगचे पाटे, तलवारी, खाटकांचे कोयते असली शस्त्रे होती. ते जमावाने फिरून दहशत घालीत. त्यांच्या प्रतिकारामुळे हिंदू सबंध दंगलकर त्यांच्या वस्तीत येऊ शकले नाहीत. ते बाजूबाजूने दगडफेक करीत. मुसलमानांनी चाँदतारा चौकातली तीनचार हिंदूंची दुकाने–एक धोब्याचे, एक किराणा, एक आणखी कसलेतरी– जाळली. (पण धोब्याच्या दुकानातले कपडे मात्र मुस्लिमांचेच जास्त होते) कोपऱ्यावरचे एक उडपी हॉटेलही जाळले गेले. त्या भागातल्या गोळीबारात शिवदास नागपुरे नावाचा रिक्षा ड्रायव्हर ठार झाला.

ज्याला भोसकले त्या मारुती मानकरची चौकशी केली. हा वखारीतला गाडीवान. तब्येतीने चांगला. ढोल उत्तम वाजवी. लहान मुलांच्यात जास्त रमे. त्यांना लेझिम शिकवून त्यांनी जयबजरंग बाल मंडळ काढून त्यातर्फे ताफा तयार केला. सर्व प्रकारच्या मिरवणुकांच्या सुपाऱ्या यांना यायच्या. शिवसेनेच्या मिरवणुकीत हे होतेच. मशिदीसमोर बराच वेळ वाजवणे ही यजमानांची ऑर्डरच असल्याने बजरंगवाली मंडळी तसे करीत. म्हणून मुसलमानांचा यांच्यावर पहिल्यापासून राग. बंदच्या दिवशी एका मुसलमानाचे दुकान बंद करायला गेला. त्या

पृष्ठ ४१ वर

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित

### आमची अस्मिता

परवा लोकसत्तेत एक बातमी वाचली. 'राष्ट्राला उत्तम नेत्यांची गरज असते तशी उत्तम खेळाडूंची देखील गरज असते.' हे वाचताच मला मागच्या आठवणी उफाळून आल्या.

त्या दिवशी मी तिच्याकडे गेले होते, खूप आग्रह होता तिचा म्हणून. एरवी तीच माझ्याकडे अनेकदा येत असते. निरनिराळ्या विषयांवर गप्पा करीत असते. दोन मुलांची आई असली तरी विद्यार्थीदशेतील ज्ञानलालसा अजून विरली नाही तिची. दर्जेदार ग्रंथ वाचणं हा तिचा व्यासंग आहे. कविता रचणे हा तिचा छंद आहे. वक्तृत्व आणि वादविवाद तिला अभिप्रेत आहे. खळखळून हसण्याने भोवतालचा परिसर निनादून टाकणे हे तिच्या व्यक्तिमत्वाचं वैशिष्टच आहे. एखादेवेळी अशीच ती एकदम येते वाऱ्यासारखी, आणि हास्याचे मोती उधळून निघून जाते. मला तिचे ते अल्पसान्निध्य सुखावह वाटते, एवढे खरे !

सांगायचे म्हणजे तिच्या आग्रहावरून मी तिच्याकडे त्या दिवशी गेले होते. गप्पा रंगल्या. 'काय वाचन सुरू आहे सध्या ?' मी विचारले.

ती म्हणाली, 'हें नुकतेच संपवलं वाचून' अन् माझ्यापुढे एक जाडजूड ग्रंथ ठेवला. आणि पुढे म्हणाली—'आता सुधाताई अत्र्यांचं आत्मचरित्र घेतलेय वाचायला.'

माझ्या समोरच्या पुस्तकावर ठळक अक्षरं होती—

'अस्मिता महाराष्ट्राची.' आत नामवंत लेखकांची नामावळी पाहिली.

'पुस्तक उत्तम असणार यात शंकाच नाही. कोणाकोणाचे लेख आवडले ग तुला ?'

'पुस्तकं छान आहे. पण त्यात एक मोठ्ठी उणीव भासली मला. मी संपादकांना पत्र लिहिणार आहे एक लवकरच.'

'उणीव कसली भासली एवढ्या मोठ्या ग्रंथात ?' मी कुतुहलाने विचारले.

ती म्हणाली— 'त्याचे असे आहे, अ-महाराष्ट्रीय लोकांसमोर महाराष्ट्राची image तीन प्रकारची आहे. १ : क्रांतिकारक म्हणजे टिळक-गोखल्यांचा महाराष्ट्र. २ : खुनी — म्हणजे गोडसेचा महाराष्ट्र. आणि ३ : खेळाडू — म्हणजे वाडेकर, सोलकर, गावस्कर आदींचा महाराष्ट्र. परंतु 'अस्मिता महाराष्ट्राची' ह्या पुस्तकात नं. ३ च्या image चा प्रकर्षाने अभाव आढळला मला.'

तिच्या या भाष्यावर मी विस्मित झाले.

नंतर पुन्हा विषय बदलले. रविंद्रांच्या काव्याची तिने तांब्यांच्या कवितेशी तुलना केली आणि तांबेसुद्धा रविंद्रा-इतकेच श्रेष्ठ दर्जाचे कवी होते हे ठासून सांगितलं. कलाकाराच्या कलेवर Criticism सामान्य रसिक हाच उत्तम तऱ्हेने करू शकतो असे आपले मत मला ऐकवले. एवढेच नव्हे, ते पटवूनही सांगितले. म्हणाली—

art-critic किंवा artist रास्त टीका करू शकत नाहीत कारण art-critic च्या बुद्धिचं disection झालेले असते आणि artist च्या मनात competition ची भावना असते.

आणि अशा अनेक गप्पा झाल्या. हे सगळे चालले होते तरी अस्मिता महाराष्ट्राची हा ग्रंथ उणीवेने भरला असल्याचे तिचे विश्लेषण माझ्या मनात घर करून राहिले. परवा लोकसत्तेतल्या बातमीने मला पुन्हा त्या सर्व प्रसंगाची आठवण करून दिली. देशाला उत्तम नेत्यांइतकीच उत्तम खेळाडूंचीही गरज असते हे खरे असेल तर आमची 'खिलाडू' अस्मिता एवढ्या मोठ्या ग्रंथामधून का बरे वगळली जावी ? ●

## एका धर्मशाळेची जन्मशताब्दी

हॅरिसन रोडवर ट्रॅफिक जाम आढळणार नाही असा क्षण कलकत्ता शहराच्या नशिबात विरळाच. शहरात असतील तेवढ्या सगळ्या प्रकारच्या वाहनांना ह्याच रस्त्यावरून जाण्याची अवदसा आठवत असते. त्यातच पायी चालणाऱ्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे असते. सगळ्या वाहनांना चुकवून रस्ता ओलांडण्यात लहान बालकांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सगळे तरबेज असतात. आपल्या अंगावरून कोणतेही वाहन


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

**पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.**

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

जाऊ शकणार नाही याची त्यांना पक्की खात्री असते. अन् तेवढ्या आत्मविश्वासानेच ते सारे एखाद्या मैदानातून चालत जावे तसे वाहनांच्या समोरून चालत जातात, नि मजेत रस्ता ओलांडतात, त्यामुळे साहजिकच वाहनांची गती सारखी कमी-जास्त होत असते.

एके दिवशी हॅरिसन रोडवरच्या ट्रॅफिक जामला तोंड देण्याचे दिव्य मला करावे लागले. म्हणजे मी ज्या ट्रॅममध्ये बसले होते ती इंचाइंचाने सरकत होती नि गचकन उभी राहून आवंढे गिळत होती. ह्या वेगाने मार्ग काढता काढता दोन तास व्यर्थ जाणार हे स्पष्ट दिसत होते. अशीच एक ट्रॅम अडून उभी होती. रस्ता मोकळा व्हायला अर्धा तास सहज लागला असता. मी दुकानांचे बोर्ड वाचू लागले. एकाएकी एका मोठ्या इमारतीकडे लक्ष गेले. ती एक धर्मशाळा होती. फाटकाच्या एका बाजूच्या खांबावर १८७३ हे आकडे खोदलेले दिसले. माझ्या मनात आले आज १९७३ आहे. म्हणजे ह्या धर्मशाळेला तब्बल शंभर वर्षे झाली की !

ट्रॅम हलायचे लक्षण दिसेना. डोक्यात कसलीतरी कल्पना आली अन् मी चटकन खाली उतरले. सरळ त्या धर्मशाळेत घुसले.

'इथे खोली मिळेल का राहायला ?' मी विचारले. लाल कपड्याने शिवलेल्या चोपड्या समोर घेऊन बसलेल्या मॅनेजरने चष्म्याच्या काचेवरून माझ्याकडे पाहिले.

'मिळेल खोली. कुठून आलात तुम्ही ?'

'इथूनच. म्हणजे कलकत्त्याहूनच.'

'मग नाही मिळणार !'

'बरे, एक ग्लासभर पाणी तरी ?'

त्याने घंटी वाजवून चपराशाला बोलावले. एक ग्लास पाणी आण म्हणून त्याला सांगितले.

'काहो, ही धर्मशाळा केव्हापासून आहे इथे ?' मी सहज चौकशी केली.

'कोण जाणे ! मी स्वतः गेली तीस वर्षे इथे आहे एवढे खरे.' हे त्याचे रुक्ष उत्तर.

'मी सांगते. बाहेरच्या फाटकावर १८७३ ही अक्षरे कोरली आहेत. म्हणजे शंभर वर्षे झालीत ह्या धर्मशाळेला. तेव्हा तुम्ही जन्मशताब्दी का नाही साजरी करीत ह्या धर्मशाळेची ? अहो, आजकाल जन्मशताब्दीचे फॅड निघालेय. सारखी कोणाची ना कोणाची जन्मशताब्दी असते. 'तुम्ही धर्मशाळेची जन्मशताब्दी साजरी करा. ?'

'ती कशी करायची ?'

'अशीच. लोक गोळा करायचे. मंत्र्याला बोलवायचे. हार घालायचा. भाषण करायला सांगायचे. त्यांच्या चहाफराळाची सोय करायची. मंत्र्यांनाही काहीतरी कार्यक्रम हवेत ना ? नुसते बसून बसून ते कंटाळतात.'

'अहो, पण मंत्री कशाला येईल इथे ? अन् धर्मशाळेवर तो काय बोलणार ? धर्मशाळेत कधी राहिला असेल तो तर ना ?

'हो, तेही बरोबर आहे. तुम्ही मग असं करा. धर्मशाळेत राहणारा एखादा प्रवासीच बोलवा. आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त काळ ज्याने धर्मशाळेत घालवला आहे असा प्रवासी अधिक योग्य. स्वतःला आलेले धर्मशाळेतील बरेवाईट अनुभव तो सांगेल. लोकांची करमणूक होईल. अन् आपली धर्मशाळा अधिक सुव्यवस्थित कशी ठेवता येईल याबद्दल तुम्हालाही सूचना मिळतील.'

त्याला हे पटले असावे, धर्मशाळेत जास्त काळ घालवलेला प्रवासी शोधायच्या तयारीला आता लागतोच म्हणाला. एवढा चोंबडेपणा करून मी तेथून सटकले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मघाशी माझी ट्रॅम जिथल्या तिथेच उभी होती. पण आता ट्रॅफिक क्लिअर होऊ लागल्यामुळे ती पुढे सरकण्याच्या आविर्भावात होती. तोच मी चपळाईने आत चढून बसले. ट्रॅफिक जामचा फार मोठा फायदा म्हणजे इकडे तिकडे नाके खुपसता येतात. ●

## हे असंच चालायचं !

तशी आम्हा बंगवासीयांना राईचा पर्वत करायची पिढ्यान्‌पिढ्या सवयच आहे. कुठेतरी खट् वाजते, एवढीशी बोलाचाली होते अन् पाहता पाहता रणांगण माजते. परवा असेच तर झाले.

एक पायी चालणारा तरुण नि एक पोलीस ह्यांची ठीक हावरा पुलावर टक्कर झाली. पोलीस अधिकाऱ्याने आपला अपमान केला, शिवीगाळ केली म्हणून चालणारा तरुण गरम झाला, आग पाखडू लागला. अशा वेळी साथीदार मिळायला वेळ नसतो लागत. जाणारे येणारे स्वतःची कामे विसरून 'गंडगोल' मध्ये स्वखुशीने सामील होतात. जणू आपल्यावरच प्रसंग कोसळला आहे एवढ्या आत्मीयतेने कुणा एकाची बाजू घेतात. प्रकरण पूर्ण मिटेपर्यंत तेथून हलत नाहीत. हे बंगाली स्वभावाचे एक वैशिष्टच. ह्यामुळेच


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत : चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

कोणत्याही एवढ्याशा घटनेला लोक मोठ्या संख्येने साक्षीदार असतात. प्रस्तुत प्रसंगात असेच झाले.

चार-सहा जणांनी मिळून पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला केला. त्याच्या मदतीला इतर पोलीस आले. त्यांनी टिअर गॅस सोडला. लोक पांगवायचा प्रयत्न फक्त झाला. यश आले नाही. पाहता पाहता पुलावर वीस हजार लोकांचा जमाव दिसू लागला. जाणारी येणारी वाहने नाइलाजास्तव जिथल्या तिथे चित्रासारखी उभी राहिली. इकडे हे प्रकरण जास्तच चिघळले. मग काही लोक म्हणाले—ठीक आहे. हे भांडण तोडायला गृहमंत्री अन् मुख्यमंत्री यांनाच येऊ द्या इथे. तोवर आम्ही इथून हटणार नाही.

आता भांडणे आणि दंगली ठिक-ठिकाणीच होतात. पण 'मंत्र्यांना बोलावून आणा' अशी मागणी क्वचितच कुठे होत असेल. शिवाय ह्या पोलीस अधिकाऱ्याला नोकरीवरून काढून टाकावे ही दुसरी घोषणाही तयारच होती. प्रकरण आटोक्यात येत नव्हते. हळूहळू मोठमोठे पोलीस अधिकारी, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, डी. आय. जी. वगैरे तेथे येऊन हजर झाले. पण 'मंत्र्यांना बोलवा' हा एकच आवाज लोकांच्या जमवाने उंच उठवला. शेवटी गृहमंत्री सुब्रत मुखर्जींना निरोप गेला. मग ते आपल्या कारमधून हावरा पुला-कडे निघाले. गाडी येताना दिसताच लोकांनी तिच्याभोवती गराडा घातला. ड्रायव्हरला एक-दोन ठोसे लगावले. गाडीचा Slag-staff तोडून टाकला. कारण असे की, गाडीत गृहमंत्री आहेत हे त्यांना माहीतच नव्हते. मंत्री झाले तरी सगळेच लोक त्यांना ओळखत असतील असे थोडेच आहे? पण दुसरे काही महाभाग मंत्र्यांना ओळखणारे निघाले आणि एकदाची लोकहल्ल्यातून त्यांची सुटका झाली. मग प्रत्यक्ष रणां-गणात त्यांचे पाऊल पडले. त्यांनी काहीतरी किमया केली नि थोड्याच वेळात सारे कसे शांत शांत झाले.

पण ह्या सगळ्यांचे अवांतर परिणाम किती भयंकर झाले? दोन्ही बाजूंच्या वाहनांना तिष्ठत उभे राहवे लागले. एकुलता एक पूल असल्यामुळे दुसरा उपायच नव्हता. ह्याचा परिणाम म्हणून आजूबाजूच्या रस्त्यांनादेखील ट्रॅफिक जामचे परिणाम भोवले. एवढेच नव्हे, त्या तीन तासांच्या अवधीत निघणाऱ्या गाड्या पकडण्यासाठी सामान डोक्यावर घेऊन स्टेशनपर्यंत पायी रपेट करण्याची पाळी प्रवासाला निघालेल्या लोकांवर बेतली. अनेकांना महत्त्वाची कामे करणे अशक्य झाले.

हे असे नेहमीच होत असते. हे नवे नाही. त्यात एक भर मात्र पडलीय्. क्षुल्लक भांडणे तोडायला मंत्र्यांना कामे टाकून घटनास्थळी जाण्याची पाळी येऊ लागलीय्. आत्मप्रतिष्ठेचा इतका जबर-दस्त पगडा आमच्यावर आहे की त्यासाठी आम्ही सर्व प्रकारचे नुकसान सोसायला तयार असतो. कारण अजून तरी आम्हाला वेळेचे मूल्य कळलेले नाही. ते कळेल तेव्हा का ो. तोवर हे असेच चालायचे! हे असेच चालायचे!!

● ● ●

हाय, मोगलाई ! भाग तिसरा : इजलास

# तीन : पडद्यातील गुपित

सिनिक्

करीम चपराश्याने माझ्या पुढ्यात काही कागद आणून ठेवले. मूळ प्रत कोणती आणि नक्कल कोणती हे त्याने कागद माझ्यापुढे पसरून ठेवताना दाखवले आणि मी कुठे सही करावयाची त्या ठिकाणी पेन्सिलीने बारीक खुणा केल्या. त्याने हे सारे रीतसर केले तरी सही करावयास माझा हात पुढे सरसावेना. मन धजावेना. कारण ज्या व्यक्तींची ती कागदपत्रे होती त्यांना मी कधी पाहिले नव्हते. त्यांना ओळखत नव्हतो. ज्यांना मी ओळखत होतो त्यांनी त्यांची ओळख दिली नव्हती. अशा स्थितीत त्या कागदावर मी सही कशी करावी ? नुसती सहीच करावयाची नव्हती तर संबंधित व्यक्तींना मी चांगला जाणत असून त्यांनी माझ्या समोर अंगठा लावला किंवा हस्ताक्षरी केली अशी खात्री देणाऱ्या निवेदनावर माझे शिक्कामोर्तब व्हायचे होते. असं काही झालं नसताना मी सही करणं योग्य ठरलं नसतं. बरोबर नव्हतं. मला प्रामाणिकपणाचे वाटत नव्हते...

करीम आर्जवानं सांगत होता, 'सरकार, यह दोनो बेवा औरते हैं–' असं करीमनं सांगताच मी करीमकडे नजर वर करून पाहिलं. करीमच्या ते लक्षात आलं पण बोध झाला नाही त्याला. माझ्या नजरेला नजर देणं उद्धटपणाचं झालं असतं हे त्याला माहीत होतं. पण त्याची नजर आळीपाळीने अन् चोरटेपणानं मला पाहत होती. मी सही का करत नाही हे हेरत होती. यापूर्वी असं कधी झालं नव्हतं. त्यानं कागद आणले की मी त्याच्याबर विश्वास ठेवून सही करत असे. आज मात्र मी सही करायची नाही असं ठरवलं आणि तो उगाच का उभा आहे म्हणून पुन्हा त्याच्याकडे पाहिले. मी सही करत नाही आणि करणार नाही हे त्याच्याही लक्षात आलं पण का करत नाही याचा होरा मात्र त्याला बांधता येत नव्हता. आजपर्यंत सरकारची आपल्यावर मर्जी होती, ती याक्षणी एकदम नाहीशी होण्यासारखी आपल्याकडून काय चूक झाली या भावनेनं

तो अस्वस्थ झाला. त्याला आजची माझी वर केलेली नजर अपरिचित होती. अगम्य होती...

--आणि खरेच माझे करीमकडे पाहणे साशंक होते. आपल्याशी अतिशय आज्ञाधारकपणे वागणाऱ्या या चपराश्यावर आपण सर्वस्वी विश्वास ठेवणे बरोबर नाही. हा वाटतो तेवढा सरळ मुळात असेल काय ? किती झाले तरी जुन्या रझाकारी प्रचाराचा आणि मोगलाई शासनाचा त्यांच्या मनावरचा पगडा एकदम नाहीसा कसा होणार ? काही झाले तरी अशा माणसांच्या प्रामाणिकपणाची दिशा धर्मनिष्ठच असणार. नवी राजवट आणि तिच्यातील नव्या विचाराचे नवे अधिकारी यांच्याबद्दल यांना खरीखुरी आस्था कशी वाटणार ? ज्या राजवटीने जन्मजात आणि जातिपूत मिरासदाऱ्यांची शेकडो वर्षांची परंपरा मोडून काढली आणि त्याची घडी विस्कटून टाकली ती राजवट यांना श्रद्धेय कशी वाटणार? उलट आतून जळफळाटलेली मने धोका आणि दगा देण्याकरता केव्हाही टपलेलीच असणार. असे नसते तर मजकडून आतापर्यंत ज्या विधवांच्या पेन्शनीच्या कागदावर करीमने सह्या घेतल्या त्या मुळी गेली तीन वर्षे अस्तित्वात नाहीत हे कसे सिद्ध झाले असते ?

— माझ्या डोळ्यापुढे सरकारी आदेश लखलखत होता. त्यात सर्व सरकारी अधिकाऱ्यांना सावधगिरीच्या सूचना देण्यात आल्या होत्या की, काही विधवांच्या पेन्शनीच्या कागदावर ज्या सह्या करण्यात आल्या होत्या त्या विधवांना मरून तीन वर्षे झाली तरी पेन्शनी घेण्यात येत होत्या. तरी यापुढे खात्री करून घेतल्याशिवाय सही करू नये. माझ्या नजरेत हे सारे होते. मनात सारखे खटकत होते की, या करीमने माझ्याशी बेइमानी करावी ? परंतु दुसरे मन म्हणत होते की, कदाचित करीमचीच फसवणूक झाली असेल तर? ते कसे शक्य होते ? कारण त्यांना स्वजातीय अधिकारी मिळत नव्हते काय ? त्यातही मजसारख्या नव्या अधिकाऱ्याच्याऐवजी जुने अधिकारी या कामाकरता सहज मिळत नव्हते काय ?

मी करीमला म्हटले, 'दर वेळेस तू कागद आणतोस आणि मी सही करतो. तू कधी या कागद आणणाऱ्यांना स्वतः पाहिले आहेस ?'

कोण आणि कशी माणसे आहेत हे पारखून घेतलेल्या माझ्या प्रश्नांनी करीम गोंधळला. जीभ चावल्यासारखी केली. अपराधीपणाची छटा त्याच्या चेहऱ्यावर आली. तो चाचरत म्हणाला 'सरकार, हे लोक रिक्षातून येतात. पडदा असतो. जनान्याचा मामला असतो. बेवा औरत म्हणताच नजरेपुढे त्यांची मजबूरी येते. रेहम वाटतो. अशा वेळेस वाटते की, जी खुद्द परेशान व अनाथ आहे आणि जिचा पुरसाने हाल कुणी नाही तिला जमली तर मदतच करावी—'

'पण काही लोकांनी याचं भांडवल केलं आहे. राजरोसपणे फसगत चालू

आहे हे तुला ठाऊक आहे काय ? अशा बायका ज्या पूर्वीच पैगंबरवासी झाल्या त्यांच्या नावाने केवळ अशा सर्टिफिकेटच्या आधारे पेन्शनी वसूल करण्यात आल्या हे तुला माहित आहे काय ?–'

–करीमच्या नम्र चेहऱ्यावरची कळाच गेली. असं काही झालं असेल याची त्याला मुळीच कल्पना नव्हती हे उघड होते. लगेच त्याचा चेहरा उजळला. सद्सद्विवेक बुद्धीनं निवाडा दिल्यागत तो बोलला 'सरकार कसम अल्ला की, मी बुद्धचा काही केलं असं आपल्यास वाटत असेल तर आपण द्याल ती शिक्षा मी भोगावयास तयार आहे' मी प्रकरण जास्त लांबवण्यात किंवा ताणण्यात फार अर्थ नाही म्हणून त्याला त्या दोन विधवांचे कागद परत देत म्हटले 'तू स्वतःची खात्री करून घेतल्याखेरीज कागद स्वीकारू नकोस. मीही त्या त्या व्यक्तींनी माझ्यापुढे अंगठा लावल्या किंवा सही केल्याशिवाय तसदीक करणार नाही, मग त्या जनानांतल्या असो की, कुणाच्या पट्टराण्या असोत–'

मला वाटलं की, त्यानंतर आता कुणी मजकडे या कामाकरता येणार नाही. करीमला पण समज दिली होती कसं वागायचं त्याची. म्हणजे त्याच्याकडे कुणी दगदग करणार नाही. परंतु झालं ते उलटच. दोन तासांनी करीम तेच कागद घेऊन इजलासमध्ये आला आणि म्हणाला 'या दोन्ही बायका हयात आहेत याची मी खात्री करून घेतली आहे सरकार. त्या खऱ्याच मजबूर आहेत. खाविंद गेल्यापासून त्यांची हालत फार बुरी आहे. सात-आठ महिने झाले. आता तर लोक उसने देत नाहीत आणि उधारीवर माल मिळत नाही अशी आफत आहे त्यांची–' करीमने कशी खात्री केली याच्या खोलात न जाता मी ठरवले की हे काम आपण अंगावर घ्यायचे नाही. मी मुळीच मऊ न पडता म्हटले 'अरे, पण इतर तुमच्या जातीची जुनी माणसे आहेत त्यांच्याकडे का जात नाही ?– मीच बरा सापडलो या कामाकरता,– शिवाय या बायकांना जनान्यांतून पडदा वर करून माझ्यापुढे यावे लागेल ते निराळेच. ही सगळी कटकट तुमच्या माणसाकडे गेल्यास टळेल'–

'तोच तर सवाल आहे सरकार– या दोन स्त्रिया म्हणजे ६० वर्षे आणि ६५ वर्षे वयाच्या दोन मृत म्हाताऱ्यांची अनुक्रमे चौथी आणि तिसरी बेगम होय.' या तरण्याबांड स्त्रियांना एक एक पोर झाले आणि ते म्हातारे मेले. चांगल्या घरच्या या मुली अनाथ झाल्या. मरद जिवंत होते तेव्हा आरामात राहिल्या. दहा दहा वर्षे यांनी चांगला संसार केला. या कुठल्या याचा पत्ता नाही लागत. त्याना विचारलं तर रडतात आणि काहीच सांगत नाहीत. म्हाताऱ्यांच्या बायका आणि त्याही त्यानी कुठून तरी पैसे खर्चून आणल्या अशा अफवा शादीनंतर पसरल्या. नक्कीच बदफैली असतील अशी अपेक्षा होती. परंतु या कधी पडद्याबाहेर आल्या नाहीत. घरच्या चार दिवालीबाहेर



**मी त्यांना खुणेने कुठे अंगठा उठवावयाचा ते सांगितले**

मकाब वर केला नाही. लाज–अब्रू संभाळून राहिल्या. यांचे यजमान गेल्या-वरही त्या चळल्या नाहीत. आमच्या वस्तीतच राहतात. माझी बेगम तर सांगत होती की, काही दिवसापासून चूल पेटवायची भ्रांत आहे. सरकार त्या या खात्यातील इतर अधिकाऱ्यांच्यां-कडे जावयास विचकतात. अगदी थोड्या दिवसात आपली अखलाखी आदमी म्हणून शोहरत झाली आहे. नवरा मेल्यावर आज पहिल्यांदा आपल्यापुढे नकाब वर करतील आणि समक्ष अंगठा लावतील. आपण पाहा, खात्री करून घ्या आणि मगच तसदीक करा. मी गलत सांगणार नाही–'

करीम गेला. त्या दोन विधवा आत आल्या. त्यांनी नकाब वर केला. दिसा-यला सुरेख दिसणाऱ्या त्या स्त्रिया

कमालीच्या कष्टी आणि सचिंत होत्या. पंचवीस-तीसच्या दरम्यान त्यांचे वय असावे. फार बावरलेल्या आणि धास्ती घेतलेल्या त्यांच्या नजरा भासल्या. सडपातळ बांध्याच्या त्या बायका रंगाने काळेपणाकडे झुकणाऱ्या होत्या. कदाचित खाण्या-पिण्याची योग्य सोय झाल्यास आणखीन आकर्षक दिसल्या असत्या. मला तर त्याक्षणी, त्या लाख-लाख एकर मालकीचे जमीनदार ज्या तेलंगणात होते तेथील खालच्या थरातील वाटल्या.

मी काही बोलत नाही हे पाहून त्या आणखीन घाबरल्यासारख्या झाल्या. मी त्यांना खुणेने कुठे आंगठा लावावयाचा ते सांगितले. त्या हाताला शाई लावून अंगठा लावणार तोच मी त्यांना विचारले, 'प्रथम तुमची नावे सांगा—' गोहरबी आणि अमीरबी असं त्या अडखळत म्हणाल्या. त्यांना नीट उर्दू येत नाही असा माझा समज झाला तरी त्यांनी सांगितलेली स्वतःची नावे कागदोपत्री लिहलेलीच होती. मी सही करून कागद त्यांच्या हातात देताना मला त्यांचे हात गोंदलेले असावेत असे वाटले. काय गोंदलं आहे हे पाहण्याचा मोहही झाला. पण उपाय नव्हता. कारण ते फारसं आवश्यक नव्हतं. औचित्याला सोडून झालं असतं. त्यात मी कागद त्यांना देताच त्या वाकून मला सलाम करत, आपला नकाब तोंडावर आणत पण मजकडे पाठ न करता दारापर्यंत गेल्या. वळल्या आणि दृष्टीआड झाल्या. माझ्या परीने मी काळजी घेऊन सही केली होती. अर्थाअर्थी आपला काय संबंध? उगाच विचार करून काय उपयोग? जगात काय काय घडत असते ते सारे थोडेच पूर्णपणे कळते? माझ्या पुरता मी त्या प्रकरणाचा शेवट करता करता आत येऊन उभ्या असलेल्या करीमला म्हणालो, 'करीम, तुमच्या लोकांत बेवांना लग्न करता येतं. पुरुषांनासुद्धा एक सोडून अधिक बायका करण्याची परवानगी आहे. त्यात या बायका तरुण, दिसायला चांगल्या आहेत. आतापर्यंत नेक राहिल्या आहेत. त्या पुन्हा निका का लावत नाहीत?'

'साहेब कोण तयार होतं लग्न करायला? जेव्हा सगळं विनायास लाभत होतं तेव्हा मजा मारायला काय जात होतं? एक जमाना असा होता की, सर्व चालत होतं. ज्याची हुकुमत होती तो मन मानेल ते करी. आज तर एक बेगम संभाळणं कठीण. हा, एक मात्र खरं की, आजही मुफत चैन करावयास तयारी असलेले यार आहेत. ऐश करायचा पण जबाबदारी नको अशी माणसं वाढू लागली आहेत—'

'करीम, तुला सध्याच्या बेगमपासून मुले वाचत नाहीत. डॉक्टरनी यापुढे ती होणार नाहीत असंही सांगितलं आहे, तेव्हा तूच का विवाह करत नाहीस—'

'सरकार, एक तर मी आहे या स्थितीत समाधानी आहे. दुसरं असं की, अल्लामियाच्या मनात असेल तर तो याच बेगमची कूस भरेल. माझा या डॉक्टरवर, सुधारणेवर आणि होत

असलेल्या बदलावर विश्वास नाही–' असं बोलत असतानाच करीमच्या लक्षात आलं की, माझा पाईप पेटत नाही. लगबगीने तो पुढे आला आणि त्याने काडी पेटवली.

●

## चार : आधुनिक यक्ष

मी ऑफीसात रिक्षातून उतरताच करीम धावत येई आणि हातातली बॅग घेऊन तत्परतेने मागे फिरे आणि दारावरचा पडदा सारून उभा राही. आजही तसेच झाले. परंतु काहीतरी सांगावयास करीम अधीर असल्याचे दिसले. मी खुर्चीवर देह विसावला तोच तो बोलला 'सरकार, कुतुबुद्दीनसाहब का फोन आया था. आपकी याद कर रहे थे. कहते थे की, मुमकीन हो तो फौरन तशरिफ लायिए–'

कुतुबुद्दीन हा मी नोकरीत जोडलेला माझा दोस्त होता. दुसऱ्या खात्याचा होता. एकदा एक्झीबिशन क्लबमध्ये माझी त्याच्याशी कुणीतरी ओळख करून दिली. मला उर्दू शेर ओ शायरीत दिलचस्पी आहे हे प्रत्ययास येताच तो जवळ आला. 'जो जिन्दा दिल है वह हमेशा जवान रहते हैं' असं मी त्याला म्हणताच 'क्या खूब कहा!' उद्गारला आणि आमची वेव्ह लेंग्थ जुळली. घसट वाढली. वरचेवर भेटी होऊ लागल्या. भेटल्याशिवाय एक आठवडाही रिता जात नव्हता. काव्य आणि निसर्ग, शराब आणि मेहफिल, हम प्याला आणि निवाला यात सदा रंगणारा आणि रंगवणारा रस्सीला प्राणी म्हणजे कुतुबुद्दीन....

–एकदा असेच ढग दाटून आले. गार वारे सुटले. तापलेल्या जमीनीवर काही तुषारांचा शिडकावा झाला. मातट वास नाकांत शिरला आणि अंगनअंग रोमांचले. चित्तवृत्ती बिथरत–चेकाळत असताना माझ्या इजलासमध्ये शिरत कुतुबुद्दीन म्हणाला 'अरे यार, मनहूसके वैसे अन्दर क्या बैठे हो? जरा बाहेर देखो क्या आलम हैं, भिगेभिगे अंबर जरूर खास फिजा लेकर आये हैं,– नक्कीच, मस्त ओलेतीच्या जुल्फातून हा सावळा रंग आणि धुंद वारा चोरून पळाले आहेत हे अबर. पळताना अनवधान झाल्याने त्यानी पळवलेली ही मदभरी जन्नत आपल्यावर थोडी बरसली आहे. अरे, उठो, ऐसा लम्हा फिर न आएगा–' आणि त्याने मला बाहेर काढले. काढता काढता म्हणत होता.

'आये कुछ अब्र शराब आये
उस बाद आये जो आजाब आये–'

–जिदगीत त्याच्यासारखा रस घेणारा वेहोष मौला माझ्या पाहण्यात दुसरा नाही. राजकारण, समाजकारण, नीतिमूल्ये, धर्म, मानवजात आणि तिचे

भवितव्य याबद्दलच्या चर्चेपासून स्वतःला तो सतत दूर ठेवत असे. म्हणे 'बस, इनसे बचा, तो सबसे बचा!' त्याच्या बरोबरचा क्षणन् क्षण रंगीन बनत असे. कुणाचा हेवा नाही व कशाची फिकीर नाही. दुसऱ्याचे उणे-दुणे काढणे किंवा स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करणे नाही. म्हणायचा " कपाळावर आठ्या आणणे म्हणजे किस्मतची लकीर वाकडी करणे–' स्वतःहून उमर कलंकित करणे. त्याच्याबरोबर असताना नीती अनीतीच्या पलीकडेच जगण्याची वेस आहे आणि तेथून परतू नये असे वाटायचे. तो भेटला नाही तर चुटपुट लागे...

–यावेळेसही असेच झाले. गेला एक आठवडा माझी त्याची भेट झाली नव्हती. करीमने त्याचा निरोप सांगीतल्यावर मला स्वस्थ बसवेना. असा निरोप ठेवणे आणि अशी अधिरता हे त्याच्या स्वभावात नव्हते. मानवी नात्याचे विलसन स्वयंस्फूर्तीने होते तेव्हाच त्यात आत 'ज्ञान' असते. स्वयंस्फूर्ती करपायची नसल्यास माणसाने आपला 'दिल' जपला पाहिजे. तो म्हणायचा 'जिन्दगी जिन्दः दिली का नाम है'–म्हणून त्याने आज ज्याअर्थी निरोप ठेवला होता त्याअर्थी काहीतरी विशेष झाले असले पाहिजे हे उघड होते. मी लगेच त्याच्याकडे गेलो.

–त्याच्या इजलासवर जणु गंभीर केस चालल्यासारखे इतर चारपाच अधिकारी सुतकी चेहरा करून बसले होते. कुतुबुद्दीन त्यात आणि त्याना अपवाद होता तरी त्याच्या चेहऱ्यावर नेहमीचा तजेला नव्हता. मी जाताच तो म्हणाला ' प्रथम आपल्याला इथं तडकाफडकी बोलवण्यात जी तकलीफ दिली आहे त्याबद्दल माफी मागतो–' त्या सर्वांचं काम असं होतं की, त्यावर मी उपाय सूचवू शकलो नसतो. परंतु तेथील प्रत्येकाला अंतर्यामी वाटत होतं की, जे होऊ घातलं आहे ते होऊ नये, त्यांच्या त्या विचारसरणीला अनुलक्षून मजसारख्या वेगळ्या वातावरणातून आलेल्या भिन्न व्यक्तीला जर वाटले असते की, जे होणार आहे ते बरोबर नाही तर त्याना दिलासा मिळणार होता. लोकशाहीत काही वेळा भयंकर चुका होतात याची ठोस साक्ष मग त्यांच्या दृष्टीने तयार होणार होती. कुणी सांगावे, कदाचित, असे बरेच आवाज एक सूरात लागले असते तर जे होणार ते टळणे अशक्य नव्हते...

मी लढ्यातून आलेला आणि नोकरीत शिरलेला. त्यांच्या दृष्टीने राजकारणातच राहिलो असतो तर निवडला गेलो असतो आणि मंत्रीही झालो असतो. वरपर्यंत सगळे मला जाणत होते. मानत होते. त्यामुळे सर्वांची अपेक्षा होती की, प्रथम जे होऊ घातले आहे ते अटळ आहे किंवा काय याचा वरच्या गोटातून कानोसा घ्यावा. खात्री करून घ्यावी, बातमीच्या खरे खोटेपणाविषयी अटळ आहे असा निर्णय दिल्लीश्वरांनी घेतलेला असेल तर तो निर्णय फिरवण्यात माझ्या परीने होता होईल ते सहाय्य त्यांना करावे...



'अरे यार, जरा बाहर देखो. क्या आलम है!

—झाले होते असे की, हैद्राबाद संस्थानचे त्रिभाजन व्हायची कुणकुण लागली होती. जो जो पक्का हैद्राबादी होता. त्यांची यामुळे बुनियादच हादरली होती. एक राजकीय बदल झालेलाच त्यांनी अजून पचवला नव्हता, तोच हा दुसरा बदल त्यांच्या दृष्टीने 'आफत' बनून आला. कुणी म्हणत होते की, उरलीसुरली बरकत जाणार. हैद्राबादची शान जाणार. दखनवी अदब राहणार नाही. चिल्लर लोकांचा सुकाळ होणार' दुसरे कुणी म्हणाले, 'कुणाला बम्बई राज्यात तर कुणाला म्हैसूर राज्यात जावे लागणार. म्हणजे आजपर्यंत इतर राज्यातली माणसे आनंदाकरता या राज्यात यायची. आता आम्हाला

आनंद सोडून जावे लागणार– ' तिसरा म्हणाला, 'भारताचे वजिरे आलम पं. नेहरू पण त्रिभाजनाच्या विरुद्ध आहेत असं ऐकतो. ते हैद्राबादी अदब व दखनवी संस्कृतीचे मुताऽऽस्सिर आहेत–' हैद्राबादी अदब व दखनवी संस्कृतीचा उल्लेख होताच कुतुबुद्दीनचा इजलास तेथील उपस्थितांच्या उजळलेल्या चेहऱ्याने उल्हासला. जगातली इतर ठिकाणे तुलना करता कशी मामुली आणि बे-रौनक आहेत याची वर्णने सुरू झाली. 'अरे, बम्बईच्या लोकांनी कित्येक वर्षांत तूप पाहिले नाही.मोठ्या हॉटेलातही शुद्ध वनस्पती. तोजा गोश्त तर तिथे कधी मिळत नाही. माणूस माणसाला ओळखत नाही. हजारोंनी माणसे रस्त्यावरच झोपतात–' 'हे तर काहीच नाही. मी तर ऐकलं की, तिथे बायकांना 'शर्म व दया' नाही. लोकांना नको तिथे आझादी आणि बंधने. ऐकलं की, सरकारी माणसांनी कधी कुणाजवळ किती वेळा झोपायचे हे पण गश्तीप्रमाणे ठरले आहे. कमाल आहे नाही ? जिथे ऐष नाही, शराब नाही, तिथे माणसे कशाकरता जगत असतील ?'

'मस्करीची वेळ नाही. जरा गंभीर व्हा. प्रसंग बाका आहे. हैद्राबादेत आपण माणूस म्हणून जवळ आलो, हैद्राबाद रियासत आणि शहरात बदल झाले पण येथील संस्कृतीला कुणाला बदलता आले नाही. सर्वांचं चांगलं एकत्र येऊन त्याचं रसायन झालं-त्यामुळे अगदी थोड्या मिळकतीत माणसं आरामात राहत, झोपत होती, जगत व जगवत होती. वेळ मिळताच आणि वेळ काढून एकमेकांची चौकशी करत होती. एकमेकांचं भलं चाहत होती, साधत होती. धर्मातीत भारतीय संघराज्याचे आदर्श नागरीक येथेच कुणाला झाले तरी गवसले असते. अशा या संस्कृतीवर गंडांतर आले तर याचा विचार करू. ही संस्कृती कशी वाचवता येईल आणि पुढे सुरक्षित राहील याची काही संभाव्य योजना आखता येते का पाहू, त्याकरता काही चळवळ करणे जरूर असल्यास तीही करू–'

–मी माझी आतापर्यंतची श्रोत्याची भूमिका सोडून म्हटले, 'चळवळ करून उपयोगाचे नाही. हैद्राबादी अदब – दखनवी संस्कृती टिकवण्याचे प्रयत्न करावयास हरकत नाही.' मी पुढे हेही स्पष्ट केले की, राज्य हैद्राबादचे विभाजन फार तर लांबणीवर पडेल पण ते टळणे अशक्य, कुतुबुद्दीन फारसा बोलत नव्हता. त्याच्याकडे जमलेले अधिकारी एकेक करत परत आपल्या कामावर गेले. ते गेल्यावर मी कुतुबुद्दीनकडे पाहत म्हटले, 'मला आपण प्रथमच काळजीत दिसता–'

'बात अशी आहे की, मला या लोकांच्यासारखी फिक नाही. मी परेशान आहे ते निराळ्याच कारणाकरता–'

'कोणते असे कारण की, जे आपण इतर सहकारी असताना बोलू शकला नाही–'

'तसं काही लपवून ठेवण्यासारखं

नाही, पण प्रदर्शन करण्यासारखंही नाही. आपल्याला माहीत आहेच की माझं लग्न होऊन एक वर्षही पूर्ण झालं नाही. मी सध्या अशा अवस्थेत आहे की, बेगमला सोडून एक दिवस मी राहू शकत नाही. अशी अवस्था असली तरी मला त्याची काळजी नाही. संवयीने महिनेच काय, एक वर्षही सोडून राहील. परंतु मला भीती वाटते ती याची की आता जे दोन जीव एक होण्याची 'शाने इलाही' चाललेली आहे तिच्यात खंड पडू नये. हा धागा एवढा नाजूक की, एकदा तुटला तर पुन्हा सांधता येत नाही, जोडता येत नाही. जोडला तर गाठ रुतत राहते. पहिल्यांदा देह जातो, नंतर मन जाते. नाद विरतो. इन्सानी जाते. जानवरी येते. प्रत्येकाच्या जीवनात हा काळ मंगल, मोलाचा आणि मुख्य होय. मिलनाचा क्षण न् क्षण सोन्याचा जेव्हा होत जातो तो हा काळ. बहार घेऊन आलेली बेगम बेछूट जवानीच्या गळ्यात गळा घालते. बहार आणि जवानी या ओळखता येऊ नयेत अशा एकमेकात मिसळतात आणि एक होत राहतात. कणाकणातून आणि नसा-नसातून. हीच जिंदगी असते. एकदा घालवून बसलो तर परत मिळणार नाही. जिथे बहार आणि जवानी यांचे सूर जमतात, जगण्यावरून जगवण्याकडे हळुवार फुंकर घालून आयुष्यक्रमाचे वळण बदलतात आणि प्रत्येक क्षण विभक्त-अविभक्त अशी उघडझाप करत अद्वैताचे पोषण करणारा साक्षात्कार देत असतो आणि अशी तार लागते की, जीवन सुंदरच वाटत राहते, असं माझं आहे आणि ही लागलेली तार तुटली तर–'

–' तर ' मला अजूनही पूर्ण करता आले नाही ! माझ्या मनात मात्र सारखं येत होतं की, असाच एकदा कालिदासाला कुबेरांच्या नगरीत तड-फडणारा एक यक्ष दिसला होता....

# समाप्त

# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किंमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे

पृष्ठे सुमारे ३५० । किंमत सुमारे वीस रुपये

'माणूस'मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये पुस्तकरुपाने प्रसिद्ध होत आहे.

---

★ १०० रुपयांची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

★ सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळींच दिले जाईल. या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने ठराविक नोंदणी होताच ही ठेवयोजना स्थगित होईल.

★ ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणूस'ची वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.

★ पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.

★ पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.

★ ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.

★ रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# दंगल

पृष्ठ २४ वरून

भरात त्याने दारावर लाथ मारली. लागलीच बाजूने आलेल्या दोघांनी त्याला चाकू मारलाच.

¤

कँप भागात कधीच दंगल होत नाही. पासष्टच्या वेळीही इकडे शांत होते. वातावरण कॉस्मापॉलिटन. पंचवीस टक्के मुस्लिम, पंचवीस टक्के बौद्ध. लष्कराच्या सेवेसाठी तिकडे जाऊन राहिलेल्या शिंपी, धोबी, न्हावी इ. जाती दहा-बारा टक्के. तेवढेच ख्रिश्चन. पारशी, सिंधी, मारवाडी ह्या व्यापारी जातीही थोड्या प्रमाणात. त्यामुळे जातीय तणाव फारसे नसायचेच.

पण अलीकडे सेंटरस्ट्रीटवरच्या (विशेषतः मारवाडी) व्यापाऱ्यांनी जनसंघाला उचलून धरले आहे. एरवीच्या संघटना काँग्रेसच्या भोगिलाल शेटने निवडणुकीत धारियांविरुद्ध म्हाळगींना मदत केली होती. भोगिलाल शेटची खेमचंद दयाळजी ही फर्म. यांच्याकडे सर्व पुण्याची डालडाची एजन्सी आहे. एकाने सांगितले, धारियांनी त्यांच्या विजयाच्या सभेत भोगिलालना जाहीर दम दिला होता की, आता यापुढे दिवाळीच्या वेळी डालडा कसा गडप होतो ते मी पाहतो. नंतर दोन-तीन दिवाळ्या गेल्या तरी धारियांनी त्यांच्याकडे पाहिले नाही.

या सर्व व्यापाऱ्यांमध्ये हिरोली हा एकमेव मुसलमान व्यापारी. त्याचा धंदा खूपच जोरात. काँग्रेसचा शहर सेक्रेटरी. अशा खूप कारणांनी इतरांबरोबर त्याचे जमत नव्हते.

कँपात सोळा तारखेच्या संध्याकाळपर्यंत काही नव्हते. संध्याकाळी तिथल्या एका मुसलमान पहिलवानाचा भाऊ नाना पेठेतून जखमी होऊन आला. त्याबरोबर याने मीटिंग घेऊन गायकसाई मशिदीपासून मुस्लिमांचा सशस्त्र मोर्चा काढला. दीन, दीन या घोषणा. हातात जंबिये, सुरे, चाकू, तुरळक तलवारी. एक फेरी मारून तो परत गेला.

वातावरण बदलले. तेवढ्यात दुर्गा मंदीर फोडल्याची, देवीची विटंबना केल्याची अफवा पसरली. (प्रत्यक्षात साधा दगडसुद्धा देवळावर आला नव्हता.) सेंटरस्ट्रीटवरचे हिरोलीचे दुकान हे सोयीचे ठिकाण लक्ष्य बनले. जमावात शिंपी, धोबी इ. अशा जाती पुढे. त्यातही स्वतःस क्षत्रिय म्हणविणारे भावसार तर आणखीनच पुढे. यात बौद्ध असते तर जास्तच प्रकार झाला असता.

हिरोलीच्या दुकानावर मामुली दगडफेक झाली. त्यावर हिरोलीने गच्चीवरून इतक्या दगड-बाटल्या फेकल्या, की त्यामुळे प्रकरण चिघळले. असा एक प्रवाद. काहींचे म्हणणे असे की खाली चाललेल्या पेटवापेटवीने त्याला प्रतिकार करावा लागला. नंतर पोलिसांनी हिरोलीच्या घराची झडती घेतली तर फरशी, विटांचे व्यवस्थित

साईझमधले तुकडे, रॉकेल, ॲसिड आणि इतर शस्त्रे इतकी सापडली की सामान दोन बैलगाडया भरून झाले. हिरोलीला अटक झाली. त्याच्यावर खुनाचा आरोपही ठेवण्यात आला आहे.

हिरोलीने वरून ओतलेल्या ॲसिड-मुळे कुलदीप पाठक नावाचा तरुण भाजून मेला अशी आजतागायत पेपरांची बातमी आहे. पण तसा डॉक्टरी रिपोर्ट नाही. पोलिसांच्या चार्जशीट-मधेही नाही. तो रॉकेलने पेटून भाजल्याने मरण पावला. पण आमच्या वर्तमानपत्रांनी हे ॲसिड कुठून आणले ते समजत नाही.

दुसरी एक गोष्ट. कुलदीपबरोबरच तिथे परदेशी नावाचा तरुणही मेला. पण त्याचा उल्लेख कोणी करीत नाही. तो खेमचंद दयाळजी फर्मच्या भोगिलाल शेटचा ड्रायव्हर होता.

पोलिसांचे म्हणणे असे की, हिरोलीने वरून रॉकेल आणि पेटता बोळा टाकला. विरुद्ध बाजूचे म्हणणे असे की कुलदीप दुकान पेटवत असता स्वतः रॉकेल ओतत होता. त्यात तो भिजला आणि पेटून मेला.

या दोन्हीतले खरेखोटे आता कोर्टच ठरवणार.

पुढे संबंधित कार्यकर्त्यांनी कुलदीपचे फोटो पोस्टरवर टाकून खाली धर्मवीर कुलदीप असे छापून तिकडे पोस्टर्स लावली. त्या चौकालाही ते लोक कुलदीप चौक असे म्हणू लागले आहेत. कुलदीपला आधी ओळखणाऱ्या लोकांना या प्रकाराची फारच गंमत वाटत आहे.

दंगलीत सामान्य मुसलमान किती असुरक्षित असतो आणि त्याचे जीवन हे मरणाच्या काठावर सदैव कसे उभे असते याचे उदाहरण म्हणजे सलाउद्दीन. हा पूना कॉलेजचा शिपाई. दंगलीत घर सुरक्षित नाही म्हणून पूना कॉलेजात आश्रयाला निघाला. बायका, मुले आणि एक मित्र बरोबर घेऊन नाना चावडी चौकातून चालला असता तिकडून जमाव आला. याच्या हातातली ट्रंक पाहून त्यातल्या लोकांनी याला हटकले. ट्रंक उघडून दाखवीपर्यंत एकाने हाता-तल्या चाकूने त्याला भोकसले. मित्राने वाट काढून बायका-मुलांना सुरक्षित नेले. ◻

पुण्यातल्या मोलेदिना हायस्कूल आणि अँग्लो उर्दू हायस्कूल इथे मुस्लिम निर्वासित येऊन उतरले होते. तिथे मुस्लिम लीगचे कार्यकर्ते काम करताना दिसत होते. इतर कोणी मदत आणली तरी ते स्वतः वाटीत. युक्रांदच्या डॉ. अरुण लिमयांनी बरीच औषधे जमवून तिथे मदत करायला गेले तर एक लीगचा कार्यकर्ता डॉक्टरांना म्हणाला, तुम्ही औषधे आमच्याकडे द्या. आम्ही वाटतो. आम्हाला अमुक अमुक औषधे पाहिजे आहेत. त्याची ही लिस्ट घ्या. आणि आणून द्या. लिमयांनी आग्रह धरला की औषधे आम्ही आणली आम्हीच वाटणार. ती मंडळी खळखळ करू लागली. त्यांना न जुमानता लिमये आणि इतर मंडळींनी औषधोपचार केले. त्या लोकांचे पत्तेही आणले. त्यापैकी कित्येक स्त्रियांचा दंगलीच्या धक्क्याने

मानसिक ब्रेक डाऊन झालेला त्यांना आढळला.

दंगलीत मुसलमानांच्या घरावर जमाव आला व आतून दगडफेक जोरात झाली तर जमाव थोपला जाई. कित्येक मुसलमानांनी घरातल्या फरशा उखडून त्यांचे तुकडे करून मारले. काहींनी तर मधली पार्टीशनची भिंत पाडून त्याच्या विटांच्या तुकड्यांची फेक केली. एकदा घरात जमावातले लोक शिरले की संपलेच; म्हणून खाली दारातच त्यांना थोपवावे लागे.

एका मुसलमानाने सांगितले, मी दंगलीच्या दिवशी भीतीने आसऱ्याला दुसरीकडे पळालो. इकडे घर लुटले गेले. सर्व सामान धुवून नेले. परत आलो तो मालकाने खोलीला स्वत:चे कुलूप लावलेले. त्याला आयता ताबा मिळाला. मला तर कळले, लुटालुटीला प्रोत्साहन त्यानेच दिले. आता फैसला करायला आळीतल्या कार्पोरेटरकडे चाललो आहे. कोर्टकचेऱ्या करायची आपली काही ताकद नाही.

मी विचारले, तुम्ही पेठेतल्या शांतता कमिटीला का भेटत नाहीत? तो म्हणाला, शांतता कमिटी आहेच कोठे? पासष्टच्या वेळी लगेच शांतता कमिटी स्थापन होऊन बरेचसे प्रश्नही सुटले. यावेळेस सगळेच थंड. दंगल लवकर विझावी असे वाटतच नाही की काय?

त्याचे घर पाहून आलो. मालक घरी नव्हता.

हे जसे हिंदू-मुसलमानांमध्ये झाले, तसे एक मुसलमान-मुसलमानातलेही उदाहरण मिळाले. छाया टॉकीजसमोर दाऊद नावाच्या माणसाने आपले पान-पट्टीचे दुकान शेख महंमद नावाच्या माणसाला चार रुपये रोजाने चालवायला दिले. दंगलीत ते लुटले गेले. शेख महंमदचा तीनशे रुपयाचा माल गेला. दुकान जागीच राहिले. पण दीडशे रुपये सरकारी मदत मात्र दाऊदने मिळविली. शेखमहंमद हात चोळीत बसला.

◻

दंगल उफाळल्यावर राजकीय, सामाजिक नेत्यांनी ती थांबवण्याचा आपापल्या परीने, आपापल्या हेतूंसाठी प्रयत्न केला. महापौर निळूभाऊ, एस. एम. जोशी, मोहन धारिया यांची नावे नेहमी यायची. बाबा आढाव, भाई वैद्य, अरूण लिमये, वसंत थोरात आदी तरुण मंडळींची नावे त्यांच्याबरोबर असायची. शरद पवार हे गृहखात्याचे राज्यमंत्री. त्यांनीही पुण्यातच आपला मुक्काम ठोकला होता.

एक म्हणजे कॉर्पोरेशनच्या निवडणुका तोंडावर आलेल्या. तशात ही दंगल. त्यामुळे इच्छुक उमेदवार मंडळींची फारच पंचाईत. विशेषत: काँग्रेसवाल्यांची. हिंदू म्हणायचे, यांनीच मुसलमानांना लाडावून ठेवले. म्हणून हे शेफारलेत. मुसलमान म्हणायचे, हे काँग्रेसवाले बदमाश आहेत. वरकरणी प्रेम दाखवतात. पण मनांतून ह्यांना आम्हाला ठोकायचेच आहे.

कसब्यात दोन मुले काही गडबड करून पळून गेली. एस्. आर. पी. वाले

यांच्या मागे लागले. त्या मुलांनी एका वाड्यात शिरून आतून दरवाजा बंद करून घेतला. एस्. आर. पी. वाले घरापुढच्या टॅक्सीच्या टपावर चढून गॅलरीतून घरात घुसले. त्या घरात लग्नाचे वऱ्हाड होते. त्यांनी दिसेल त्याला, बायका-मुले, वृद्ध कोणी न सोडता भरपूर मारले. त्यामुळे तिथले वातावरण तंग झाले. मोहन धारिया त्या भागात येताच लोकांनी त्यांना धक्का बुक्की केली. समाजवादी कॉर्पोरेटर रामभाऊ वडके यांनी लोकांना आवरले. धारिया धोक्यात म्हणून इन्स्पेक्टरने हवेत गोळीबार केला.

गंज पेठेत एस. आर. पी. वाल्यांनी झोपडपट्टीत शिरून स्त्रियांना मारहाण केली. म्हणून कॉर्पोरेटर चिल्लाळ यांच्या पत्नीच्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी पोलिसचौकीला घेराव घातला. इन्स्पेक्टर काळ्यांची बदली करा अशी मागणी होती. महापौर निळुभाऊ लिमये यांना फोन आला. त्यावेळी निळुभाऊ, शरद पवार (यावेळी शरद पवार निळुभाऊंकडे उतरले होते), रामभाऊ वडके, धारिया ही मंडळी शहरातून नुकतीच राऊंड घेऊन दुपारी तीन वाजता जेवत होती. निळुभाऊ निघाले. शरद पवारांना अन्य काम होते. धारिया येतो म्हणाले म्हणून त्यांनाही बरोबर घेतले. गंजपेठेत एव्हाना मोठा जमाव जमला होता. हे गाडीतून उतरताच लोकांनी तक्रारी सुरू केल्या. आ. शिवाजीराव ढेरे आणि इतर काँग्रेस कॉर्पोरेटर्स तिथे आले. जमावाने काँग्रेसवाल्यांना येवढी धक्काबुक्की केली की ढेरे मागच्यामागे (अक्षरश:) पळाले. लोक त्यांच्या मागे जाऊ लागले तो वडके, निळुभाऊंनी त्यांना अडवले. ढेरे एका दुकानात जाऊन दार लावून बसले.

इकडे जमाव आवरेना तेव्हा निळुभाऊंनी स्वत:ला जाळून घेईन अशी धमकी दिली. तेव्हा जमाव शांत झाला. निळुभाऊंचे भाषण झाल्यावर धारिया म्हणाले, मी बोलतो. इतरांनी सांगितले, जमावाची मन:स्थिती ठीक नाही. बोलू नका. पण धारिया बोलले. लोकांनी आरडाओरडा चालू केला. इन्स्पे. काळेला काढा असा घोषा लावला. धारियांनी जवळच्या पोलीस अधिकाऱ्याला कन्सल्ट करून सुहास्य वदनाने काळ्यांची बदली करण्यात आली आहे, अशी घोषणा केली. लोकांनी जल्लोष केला.

नंतर पोलीस कमिशनर कदमबांड्यांनी काळ्यांची बदली तर राहोच, पण उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना पदक देऊन धारियांचा मान राखला.

धारियांच्याबाबत अशी धक्काबुक्की आणखीही काही ठिकाणी झाली. पण धारियांचे हे वैशिष्ठ्य, धक्का बुक्की माहीत असूनही ते प्रत्येकी ठिकाणी जात.

आगामी नगरपित्यांच्या दंगलीतल्या हालचाली गमतीशीर होत्या. गंज पेठेतील एका पेहेलवानास यावेळी उभे राहायचे आहे. पहिले एकदोन दिवस बाहेर पडायची छाती नव्हती. त्यावेळी इतरांनीच शांतता प्रस्थापित केली. पुढे

शांतता कमिटी स्थापन झाल्यावर हा पुढे आला. शांतता समितीने काढलेल्या मोर्चात ह्याला बघताच लोक चिडले आणि तिथल्या लोकप्रिय समाजवादी नगरपित्याला म्हणाले, की ह्याला का तुम्ही घेतलेत? जीव धोक्यात घात्लाय तुम्ही आणि मिरवायला हा, हे कसे चालू देता?

रविवारात एका नगरपित्यासमोर एका मुस्लिम मटकेवाल्याचा अड्डा आहे. हा नगरपिता या अड्डेवाल्याशी चांगले ठेवून असतो. तिथे मुस्लिम मतेही जास्त आहेत. पण या दोघात वितुष्ट यावे म्हणून मुद्दाम त्याच्या घरावरून जमाव न्यायचा आणि त्या मुस्लिम दादाच्या घरावर दगडफेक करायची असे गनिमीकावा तंत्र यावेळी वापरले गेले. ☐

दंगल शांत करण्यात एसेम जोशी यांचे प्रयत्न विशेष. त्यातला एक प्रसंग. रास्ता पेठेत मनुषा मशिदीसमोर एक मोठा जमाव जमून मशिदीची झडती घेण्याची भाषा करीत होता. एसेम जोशी, बाबा आढाव यांनी जमावाला समजावले. मी पोलिसांना मशिदीची झडती घ्यायला लावली आहे असे सांगितले. त्यांनी कमिशनरांना फोन केला. त्यांनी शरद पवारांना विचारून झडतीची तयारी दाखवली. मग एसेमने प्रत्येक बाजूचे दोन प्रतिनिधी, पोलीस बरोबर घेऊन झडती घेतली. काही सापडेना. एक बाई अशा रात्री बराच वेळ धुणे धते यावरून संशय येऊन पाहतात तो तिच्या बादलीच्या पिळ्याखाली अॅसिडच्या बाटल्या. पंचनामा झाला. बाहेर सभा झाली. आढावांचे भाषण झाले. एसेमचे सुरू झाले. मधाचा मसलमानांचा एक प्रतिनिधी स्टेजजवळ होता. तो मशिदीकड परत जात होता. कोणी सरदारजीने त्याला नसते हटकले. त्यावर घाबरून लगेच तो 'बचाओ, बचाओ' म्हणून ओरडला. थोडासा गोंधळ झाला. पोलीस मशिदीसमोर लायनीत उभे होते. त्यांना वाटले दंगल म्हणून त्यांनी अश्रुधराची नळकांडी फेकली. लोकांना वाटले मशिदीतूनच काही येतेय. मग इकडूनही दगडफेक. तिकडून पोलिसांचा गोळीबार. एसेम पोलिसांच्या दिशेने 'थांबा, थांबा. गोळीबार करू नका' म्हणत धावले. पोलिसांच्या फ्लॅशलाईटमध्ये एसेम दिसले म्हणून खाडीलकर इन्स्पेक्टरांनी गोळीबार थांबवला.

अश्रूधूर सोडला तेव्हा डोळ्यांची चुरचुर थांबावी म्हणून एका मुलाने एसेमना बजूच्या घरातून पाणी आणून दिले. एसेम पाणी लावत आहे तोच समोरच्या दोन फुटावरच्या मुलाला पायाला गोळी लागली. एसेमना त्यावेळी ते समजलेसुद्धा नाही.

अश्रुधूराचा त्रास होऊ नये म्हणून युक्रांदच्या डॉ. अरुण लिमयांनी एसेमना आपल्या अॅबॅसडर गाडीत बसायचे सुचवले. तेवढ्यात एसेम दुसरीकडे धावले. इकडे गाडीच्या मागच्या काचेतून एक गोळी जाऊन पुढच्या काचेतून बाहेरही पडली होती. ☐

पुण्यातल्या पेपर्सनीही या दंगलीत उत्कृष्ट कामगिरी बजावली. लोकांना आश्चर्याचे धक्के देण्याचे त्यांचे तंत्र विलक्षण होते. वर्तमानपत्रात वाचावे आणि त्या स्थळी जावे तो हकीगत दुसरीच निघे. आमची बरीचशी बातमीदार मंडळी तर इतकी जीव ओतून काम करीत की बातमी तयार करताना स्वतःची मते त्यात इतकी सहजतेने मिसळून जात की बस्स. अशी एकतानता अन्यत्र सापडणे कठीणच. इकडे मशीद न म्हणता प्रार्थनामंदीर म्हणायचे. कारण सरकारी सूचना. दंगलीला उत्तेजन नको म्हणून. पण तेवढे सोडले तर इतर सर्व बातमी देणे, अफवांचा बेमालूम उपयोग करणे, हे सर्रास चालले होते. घरात धुणी वाळत घालायच्या दोन काठ्या आणि घरातली कांदा कापायची सुरी सापडली तरी 'शस्त्रास्त्रांचा प्रचंड साठा जप्त' अशी शीर्षके पेपरमध्ये यायची. अशी विनोदबुद्धी.

¤

ही दंगल होती त्यापेक्षा अधिक गाजली. पन्नासएक कुटुंबे बेघर झाली. पन्नासएक लहान दुकाने फुटली. भोसकाभोसकीचे प्रकार दहावीस घडले. एरवीच्या अहमदाबाद, रांची, जबलपूरपुढे हे काहीच नव्हे. पण तरीही एका राजकीय योगायोगामुळे ही जास्त गाजली असावी.

केंद्रीय गृहमंत्री उमाशंकर दीक्षीत मुंबईला एका लग्नासाठी आले होते. त्याचवेळी पुण्यात दंगल सुरू झाली. उद्या कोणी लोकसभेत विचारले की दंगलीच्यापासून शंभर मैलांवर तुम्ही होता, आणि तिथे गेला का नाहीत, तर पंचाईत होईल म्हणून त्यांनी पुण्याला यायचे ठरवले. वसंतराव नाईकांना फोन केला. प्लेनची व्यवस्था करून ते स्वतः बरोबर निघाले. कँपात आणि एकदोन ठिकाणी जाऊन आले. सर्किट हाऊसवर राष्ट्रीय एकात्मतेबरोबर प्रेस कॉन्फरन्स् घेतली. एसेम्, निळुभाऊंबरोबर चर्चा केली. आणि दोनतीन तासांत मुंबईला परतही गेले.

झाले. ही एकदम अखिल भारतीय बातमी झाली. लोकांनी तर उमाशंकर भेटीतून कित्येक राजकीय अर्थही काढले. दंगल भारतभर गाजताच सगळ्या राजकीय पक्षाचे नेतेही धावले. इथे एवढी दंगल झाली तरी तुम्ही कोठे होता, असे उद्या कोणी विचारायला नको. नानाजी देशमुख आले. जॉर्ज फर्नांडीस आले. स्वतंत्र पक्षाचे मधू मेहता आले. बनातवाला आले. शिवसेनेचे मुंबईचे महापौर सुधीर जोशी आले. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे दोन निरीक्षही आले. धारिया, खाडिलकर तर घरचेच. या पाहुण्यामंडळींचा कार्यक्रमही ठरलेला असायचा. यायचे. आपल्या पक्षाचे दोनचार नगरपिते किंवा कार्यकर्ते बरोबर घ्यायचे. पाहणी करायची. जाताना एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन गायब व्हायचे. त्यातल्या कित्येकांची खऱ्या दंगलग्रस्त भागात जायची तयारी नसे. मग अशी मंडळी एकदा दंगल होऊन लगेच विझलेल्या कँपातल्या

सेंटर स्ट्रीटला भेट देऊन गायब होत पोलीस तर या अश्रू पुसणाऱ्या पुढाऱ्यांपायी फार हैराण झाले होते तितके दंगलीपायी सुद्धा झाले नसतील.

दंगलीत पोलिसांची फारच धावपळ झाली. दोन्ही गटाचे लोक आरोप करीत की पोलीस पक्षपाती आहेत. काही तडकाफडकी निर्णय घ्यावेत तर हा पडला राजकारणी मामला.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला भेटलो. त्यांनी सांगितले, गेले चार महिने या कम्युनल भानगडीपायी आमचे डोके पिकून गेले आहे. दोन कम्युनिटीतल्या माणसांचे नळावरून भांडण झाले तरी डायरेक्ट वर रिपोर्ट करा अशा आम्ही आमच्या माणसांना इन्स्ट्रक्शन्स दिल्या आहेत. जानेवारीत तर पतंगाच्या काटाकाटीवरून भांडणे व्हायची. एक हिंदू आणि दुसरा मुसलमान निघाला की पंचाईत व्हायची. हातातली कामे सोडून त्यांचे भांडण दाबून टाकायला पळावे लागे. परवा पुण्याच्या हद्दीतल्या सांगवी गावात दोन मुसलमान, दोन हिंदू आणि एक शीख अशी पाच मुले लपंडाव खेळत होती. महादेवाच्या देवळात ते लपायला गेले. ते तसे तेथे नेहमीच लपतात. पण यावेळी ते गाभाऱ्यात लपले. बराच वेळ तिथे थांबल्याने त्या सगळ्यांनीच लघवी केली.

झाले. ही घटना आमच्याकडे रिपोर्ट होताच मी स्वतः गेलो. बातमी पसरणार नाही अशी व्यवस्था केली. पालकांच्या संमतीने त्या पोराची टेंपररिली रिमांड होममध्ये व्यवस्था केली. नाहीतर बातमी पसरायची की मुसलमान पोरांनी महादेवावर लघवी केली म्हणून !

¤

दंगल संपली.

दंगलीनंतर मुस्लीम नेतृत्वामध्ये काय बदल झाला आहे, ह्याची उत्सुकता होती. दोन बाबतीत. एक म्हणजे दंगलीबाबत, दुसरे सामाजिक, राजकीय विचारांबाबत.

मारुफखानांकडे गेलो.

मारूफखानांच्या बोलण्याचा गोषवारा असा : आम्हा मुसलमानांचा मतदानाचा हक्क तुम्ही काढून घेतला म्हणजे हे सर्व संपेल. पासष्टच्या दंगलीच्या वेळेस आम्ही काँग्रेस विरोधक होतो. म्हणून काँग्रेसने आम्हाला चोपले. मारूफखानकडे ट्रान्समिटर आहे म्हणून उठवले. त्याला इतकी वर्षे झाली. जर ट्रान्समिटर असता तर एव्हाना खटला व्हायला पाहिजे होता. मला शिक्षा व्हायला पाहिजे होती. अजून का झाली नाही ? यावेळेस आम्ही काँग्रेसच्या बाजूने आहोत तर हे शिवसेना, जनसंघवाले आम्हाला चोपत आहेत. एकूण काय आमच्याकडे मते आहेत म्हणूनच ना हा वाद ? मग हा हक्क काढूनच घ्या. म्हणजे तरी आम्हास सुख लागेल.

दंगलीवर बोलताना : तिथे जिथे आम्ही प्रतिकार केला तिथे तिथे आमची घरे वाचली. जिथे डिफेन्स नव्हता, तिथे जाळपोळ आणि लुटालूट.

पोलिससुद्धा सगळे त्या बाजूचेच.

आमचे लोक प्रतिकाराला जमले की पोलिस सांगायचे, तुम्ही घराघरात जा. आम्ही त्यांना बघतो. आम्ही घरात गेलो की दंगेखोर विना प्रतिकार जाळ-पोळ करून जायचे. पण रविवार पेठेत मुसलमानांनी आत जायला नकार दिला. ते पोलिसांना म्हणाले, आधी त्यांना आत जाऊ द्या. मग आम्ही जाऊ त्यामुळे तिथे सर्वात जास्त मुसलमान वस्ती असूनसुद्धा नुकसान काही झाले नाही.

तुम्ही जर घरे जाळू लागलात, आमच्या बायकापोरांना मारू लागलात, तर डिफेन्स करायचा आम्हाला हक्क आहे की नाही ? तुम्ही आम्हाला जसे धड वागवत नाही तसे बौद्धांना पण धड वागवत नाही. त्यांच्यावर उद्या आमच्यासारखीच पाळी येणार आहे हे विसरू नका.

आमच्यापुढे सध्यातरी सेल्फ डिफेन्स-शिवाय दुसरा मार्गच नाही.

¤

मुसलमानांच्या सामाजिक विचारांच्या बाबतीत बरीचशी चर्चा झाली आहे. एका नेत्याशी अचानक चांगले बोलणे झाले.

चाँदतारा चौकाजवळ काँग्रेसचे कॉर्पोरेटर अहमदखान राहतात. त्यांनी त्या चौकातली दंगलीची हकीगत सांगितली. ती सांगून झाल्यावर मी विचारले, आपले मुस्लिम सत्यशोधक मंडळाविषयी काय मत आहे ? त्यांनी मुस्लिम पर्सनल लॉ मधल्या काही गोष्टींविरुद्ध आंदोलन चालवले आहे, त्याविषयी आपले काय मत आहे ? अहमदखान म्हणाले : प्रत्येक धर्माने चांगल्या गोष्टी सांगितल्या आहेत. चोरी करू नका. दारू पिऊ नका, इत्यादी. पण तरी ते नियम मोडणारे लोक प्रत्येक धर्मात भेटतातच की नाही ? पण म्हणून तो मूळ धर्म काही खोटा ठरत नाही. तसेच इथे आहे. दुसरी बायको करायची असेल तर काही शर्ती आहेत. पहिलीपासून मूल होत नाही, ती आजारी आहे, इत्यादी. आता तल्लाक ही चीज अल्लाला आवडत नाही. या शर्ती न पाळणारेही लोक निघतातच. पण म्हणून तो कायदा वाईट कसा ?

मी म्हटले, चोरी करू नका ही धर्माची आज्ञा. ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. कायदा नाही. कायदा न पाळेल त्याला तो शासन करतो. तसे तलाकच्या या तुमच्या शर्ती न पाळणाऱ्या पुरुषाने तोंडी तल्लाक म्हटले तरी तल्लाक मिळतो.

अहमदखान म्हणाले, आहो, तल्लाकचे खूप फायदे आहेत. उदाहरणार्थ, आपण एरव्ही परस्त्रीशी संबंध ठेवतो, त्याऐवजी आम्ही म्हणतो तू तिला बायको म्हणून नांदव. म्हणजे तिची जबाबदारी घ्यावी लागते. ही पद्धत जर योग्य रीतीने अंमलात आली तर समाजातले खूप भ्रष्टाचार कमी होतील.

मी विचारले, मग स्त्रियांना हे हक्क का माहीत नाहीत ? ते म्हणाले, आहेत. जरूर आहेत. मी म्हटले, माझ्या माहिती-

प्रमाणे नाहीत. एका स्त्रीला चार नवरे आहेत, असे उदाहरण मी ऐकले नाही. यावर अहमदखान काही बोलले नाहीत.

शेवटी विचारले, तुमच्या या रिवाजांमुळे तुमची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शिवाय फॅमिली प्लॅनिंग-लाही तुमचा विरोध आहे. हे का ?

ते म्हणाले, लोकसंख्या वाढली तरी काय हरकत आहे ? आपल्या देशापाशी खूप जमीन आहे.

मी म्हटले, माणसांना नुसती राहायला जागा लागत नाही. त्यांना नोकऱ्या लागतात. शाळा, कॉलेजे, हॉस्पिटले लागतात. त्याचे काय ?

यावर लगेच ते म्हणाले, ते तर सरकारचे काम आहे. सरकारने कार-खाने काढले पाहिजेत. हॉस्पिटले काढली पाहिजेत. याबाबत आम्ही काय करू शकतो ?

मी म्हणालो, लोकसंख्या कमी करण्याचा सर्व सामान्य राष्ट्रीय प्रवाह आहे. त्याविरुद्ध तुम्ही कसे जाता ?

ते म्हणाले, जर एखादा माणूस दुसऱ्या माणसाला खड्डयात लोटत असेल तर त्या पडणाऱ्या माणसाला डिफेन्सचा हक्क आहे की नाही ?

मी म्हणाले, आहे.

त्यावर ते म्हणाले, पण लोकसंख्या वाढवणे हाच त्या माणसाचा डिफेन्स आहे.

बोलणे संपले.

नंतर कळले, अहमदखानना अकरा मुले आहेत.

¤

दंगल संपली.

कार्पोरेशन निवडणुका सहा महिने पुढे ढकलल्याची बातमी आली. नगर-पित्यांना वाटले, उगाचच आपण इतके घाबरलो.

हिंदुमहासभावाले नामदेव पवारकडे जाऊन, आम्हाला तुमचा शनवार-वाड्यावर सत्कार करायचाय असे म्हणू लागले. नामदेव म्हणाला, मी राज-कारणातला माणूस नाही. माझ्यामुळे येवढी दंगल झाली, हे मला बरे वाटले नाही.

मातंग, चांभार, भावसार, बलवार तांबट, भोई इत्यादी जाती परत आपा-पल्या व्यवसायाला लागल्या. एरवीच्या राजकारणात त्यांना भाव नसतो. तेव्हा अशाच वेळी त्यांना काही कार्य.

वर्तमानपत्रांनी आपला मोर्चा खुजगाव की नांदोली ऊर्फ बापू की दादा यावर केंद्रित केला आहे.

हसमतबाईने नवे लोटे आणून, वाचवलेल्या एका फुटक्या बरणीत सुपाऱ्या भरून धंदा परत सुरू केला आहे.

दंगलीनंतर उत्तर प्रदेशच्या निवड-णुकांची धामधूम सुरू झाली. प्रत्येक पक्ष मुसलमानांची गठ्ठा मते मिळवा-यच्या विवंचनेत पडला आहे. देशाच्या निरनिराळ्या कोपऱ्यातून अस्वस्थ करणाऱ्या बातम्या येत आहेत.

केरळमध्ये...

● ● ●

## मध्यंतर

# पुन्हा अवध्य

गेल्याच्या गेल्या वर्षी सरकारी नाट्य-स्पर्धेत गाजलेले चिं. त्र्यं. खानोलकरांचे 'अवध्य' हे नाटक नव्या नट-संचात व्यावसायिक रंगमंचावर आले आहे. सरकारी स्पर्धेत यशस्वी ठरलेली नाट्यकृती व्यावसायिक रंगभूमीवर येण्याचा हा काही पहिला प्रसंग नाही. परंतु 'अवध्य'च्या नव्या स्वरूपाविषयी या सदरात लिहिण्याचे कारण असे की मूळ प्रयोग सादर करणाऱ्या अमोल पालेकरांनीच व्यावसायिक रंगमंचावरील नवा प्रयोग सादर केला आहे. एका दिग्दर्शकाने एकाच नाट्यसंहितेची दोन वेगळी संकल्पने सादर करणे हे नेहमीच कुतुहलजनक असते. मूळ नाट्यप्रयोगात एकनाथ हट्टंगडी आणि दीपा श्रीराम यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या. तर नव्या प्रयोगात सतीश दुभाषी व सुलभा देशपांडे या नामवंत कलावंतांनी या भूमिका वठविल्या आहेत. त्यामुळे 'अवध्य'चा नवा प्रयोग पाहायला जाताना दिग्दर्शन व अभिनय या दोन्हीविषयी मनात कुतुहल होते.

'अवध्य' या नाट्यसंहितेचे स्वरूप स्वगतासारखे आहे. एकाच व्यक्तिमत्त्वाचे, नव्हे जीवनानुभव स्वीकारणाऱ्या मानवाचेच दोन चेहरे या नाट्यकृतीतून नाटककाराला व्यक्त करावयाचे होते. परंतु संहितेचेच स्वरूप असे आहे की ज्यामध्ये शब्द पुरेसा नाट्यात्म होत नाही; आणि नाटककाराने रंगमंचावर योजलेले नाट्य त्याच्या शब्दाच्या तुलनेने भरड वाटते. स्पर्धेसाठी पालेकरांनी सादर केलेला नाट्यप्रयोग पाहात असताही, भोकातून दिसणाऱ्या दृश्याला त्यांनी असमतोल महत्त्व दिले असे मला वाटले होते. तो प्रयोगही पालेकरांनी खास प्रायोगिक-शैलीने सादर केला असे वाटले नव्हते. परंतु त्या प्रयोगातील एकनाथ हट्टंगडी यांचा अभिनय आणि दीपा श्रीराम यांनी कांचनच्या भूमिकेत दिलेली साथ यामुळे तो प्रयोग लक्षात राहिला होता. एकनाथ हट्टंगडी या नटाला आवाजाचे आणि संयत अभिनयानेही प्रेक्षकांपर्यंत अर्थ पोचविण्याचे सामर्थ्य लाभले आहे. 'गिधाडे'मधील वडिलांची भूमिका त्यांनी ज्या तऱ्हेने वटविली होती वा 'शांतता कोर्ट चालू आहे' या चित्रपटात न्यायालयीन प्रक्रियेतील विनोद व गांभीर्य ज्या कौशल्याने पेलले होते त्यातून त्यांचे अभिनयसामर्थ्य व्यक्त झाले होते.

या नव्या प्रयोगात सतीश दुभाषी यांनी 'अवध्य'मधील लेखकाची भूमिका – त्याच्या व्यक्तिमत्त्वातील द्वंद्व – 'डबल रोल'च्या पद्धतीने मांडली

आहे. संवेदनाक्षम, हळवा लेखक व जीवनाविषयीच्या कटु अनुभवाने आशंकावादी (सिनिक्) झालेला माणूस यातला फरक दाखविण्यासाठी आवाज बदलण्याची कल्पना चांगली होती. विशेषत: दुभाषींचा संथ, समजुतदार आवाज सिनिकल दृष्टिकोन व्यक्त करू शकला नसता; म्हणून त्यांनी काहीसा घोगरा स्वर लावला आहे; तो आविष्कारणास अनुकूल ठरला आहे. परंतु त्या आवाजाबरोबर चेहरा वेडावाकडा करून दुसरे व्यक्तिमत्व दर्शविण्याचा यत्न अत्यंत बटबटीत वाटतो. किंबहुना एखादी अवघड भूमिका सादर करताना असे सुलभ उपाय शोधणे म्हणजे नटाने स्वत:च्या जबाबदारीतून मुक्त होण्यासारखे आहे. अलीकडे सतीश दुभाषी यांना विविध महत्त्वाच्या भूमिका लाभल्या; परंतु त्यांनी या भूमिकांना पुरेसा न्याय दिलेला नाही. एकनाथ हट्टगंडी या नटाच्या सखोल नाट्य जाणीवेच्या तुलनेने ही जाणीव विशेष जाणवली. सुलभा देशपांडे या अभिनेत्रीच्या अभिनयातही अलीकडे (विशेषत: 'चंपा' व 'कांचन' या दोन भूमिकात) कृत्रिमता – तोचतोचपणा जाणवू लागला आहे. खानोलकरांच्या 'अवध्य'मधील कांचन उभी करताना तर सुलभा देशपांडे ह्यांनी केलेला अभिनय त्यांच्या अनेक चहात्यांना धक्का देणारा होता. एका बाजूला अतिशय भडक अभिनय, अनावश्यक हातवारे करणाऱ्या या नटीचे मन या भूमिकेत नाही हे प्रेक्षकांना सतत जाणवत होते.

प्रेक्षकांना समजेल अशा पद्धतीने 'अवध्य' सादर करण्याच्या भरात अमोल पालेकर यांनी आपल्या मूळ प्रयोगाचे एक विकृत स्वरूप सादर केले आहे. या प्रयोगाच्या निमित्ताने जर एकाच प्रकारच्या भूमिकांमुळे साचेबंद झालेल्या दुभाषींच्या अभिनयाला मिळालेले नवे आव्हान त्यांनी स्वीकारले असते तरी नव्या प्रयोगाचे चीज झाले असते. पण 'डबल रोल'च्या भरीला पडून त्यांनी ही संधी गमावली आहे.

—पुष्पा भावे

## दोन एकांकिका

महाराष्ट्रीय कलोपासकांच्या 'प्रयोग'मध्ये जुलै महिन्यात दोन (संवादिका) एकांकिका सादर झाल्या 'एका मिठीची कथा' आणि 'आज तरी भांडशील ना?' दोन्हींचेही लेखक व. पु. काळे होते. व. पु. काळे यांनी काही संवादिकांचे एक पुस्तक काढले आहे. त्यामध्ये कथा आहेत. पण त्या पूर्णत: संवादाने आविष्कारित झाल्या आहेत. निवेदनाचा आश्रय न घेता. त्यामुळे त्या संवादिकांना रंगमंचावर सादर करणे सहज शक्य झाले आहे. दोन्ही एकांकिकांचा जीव अत्यंत थोडा आहे. त्यातल्या कुतुहलाचा औत्सुक्याचा ताण कथेच्या एकपदरी स्तरावरचाच आहे, त्याला नाट्यानुभवाच्या स्तरावर नेऊन

एकांकिका स्वरूप देण्यात लेखकाला अपयश आलेले आहे. 'आज तरी भांडशील ना?' मध्ये आपल्या बायकोशी भांडणाची पैज एकजण लावतो. पण तो ती हरतो. कारण न भांडण्याची पैज त्याच्या बायकोनेही लावलेली असते. ऑफिस, घर, मित्राचे घर, मोटारीतून जाणे इत्यादी काही प्रसंगातून एकांकिकेचे कुतुहल ताणण्याचा प्रयत्न आहे. धक्कास्पद शेवटासाठी प्रसंगाची भर (पॅडिंग) आहे. ते सारे कथा वाचताना बरे वाटते, पण त्याला एकांकी रूप कोठेच येत नाही. 'एका' मिठीची गोष्ट 'मध्ये आपल्या बायकोला आपण स्वत: मारलेली मिठी आपल्या मुलाने पाहिली की काय? या कल्पनेने पुरुष अस्वस्थ आहे. मुलाकडून कळवून घेण्यासाठी तो हरतऱ्हेचे प्रयत्न करतो आहे. तिथेही क्षीणजीवी कथा बीजाचा फुलोरा, मुलांवर होणारे वाईट संस्कार वगैरे गोष्टींच्या चर्चेने जवळ जवळ नाहीसा केला आहे. उरतात ते शाब्दिक विनोद, (तेही अत्यंत सामान्य पातळीवरचे), शाब्दिक कसरती. बस्स एवढेच!

पण अशा या संवादिका रंगमंचावर करण्याची कल्पना स्वागतार्ह आहे. मधुकर जोशी या दोन्ही एकांकिकांचे दिग्दर्शक होते. पुरुषोत्तम करंडक, कामगार नाट्यस्पर्धांच्यामधून त्यांनी काही चांगली दिग्दर्शने केलेली आहेत. त्यांच्या गाठी दिग्दर्शनाचा अनुभव विपुल असताना इतक्या हलक्या-फुलक्या एकांकिकांची पसंती त्यांनी का केली, ते समजू शकले नाही. याचा अर्थ सदैव गंभीर प्रकृतीच्याच एकांकिकांची निवड अभिप्रेत आहे, असे बिल्कुल नाही.

या एकांकिकांतून शरद चितळे,


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जें. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

शरद वर्तक, किरण लागू, वसंत खरे, श्रीकांत कुलकर्णी, श्रीकांत महाजन, स्मिता, ओक, शरश्चन्द्र कलावंत, संजीवनी अरगडे, नंदकुमार कार्किडे, मृदुल कुलकर्णी इत्यादी कलाकार होते. या सर्वांमध्ये अभिनयाच्या दृष्टीने विशेष लक्षात राहिले, ते म्हणजे शरद वर्तक ! नटाला आवश्यक असलेली मुद्राभिनयाची जाण, शरीरयष्टी इत्यादी काही चांगल्या गोष्टी त्यांच्याजवळ आहेत. त्याचा त्यांनी दोन्ही एकांकिकेत उत्तम रीतीने उपयोग केला. बदलत्या प्रसंगांनुसार, बदलते मुद्राभिनय करून एकांकिकेत रंग भरण्याचा प्रयत्न केला. स्मिता ओक आणि संजीवनी अरगडे यांच्या बाबतीत कोरा चेहरा आणि एकसुरी बोलणे ह्या घातक गोष्टी होत्या. त्यामुळे त्यांच्या कामाचा कोणताच प्रभाव पडू शकला नाही.

आशयदृष्ट्या क्षीणजीवी असलेल्या एकांकिकांना दिग्दर्शनाने खूपच आधार दिला. दिग्दर्शक जर अगदी अननुभवी असता तर सारेच अवघड होते. दिग्दर्शनाच्या संदर्भात काही गोष्टी खटकल्या त्या अशा, की 'माइम' पद्धतीने अभिनय करायचे ठरवल्यावर ऑफिसमध्ये एकाच माणसासमोर (खरे) टेबल कशासाठी ? तेच टेबल जेवतानाही कशासाठी ? त्याचप्रमाणे 'माइम' करताना अभिनयाची सुरुवात ठीक होत असे, पण त्याच्या तपशिलाकडे नट तितके अवधान ठेवतच होता, असे नाही. उदा. टायपिंग, पोळ्या करणे इत्यादी. रंगभूमीवरील सामूहिक (एकापेक्षा अधिक पात्रांचे) बोलणे किंवा हसणे हे तालमीत जरी यांत्रिक पद्धतीने बसवून घेतले, तरी रंगमंचावर मात्र ते जिवंतच वाटणे अगत्याचे आहे. तसे ते वाटले नाही. त्यातली कृत्रिमता जाणवली. 'ॲक्शन फ्रिजिंग' हा प्रकार आता रंगभूमीवर खूप वेळा वापरून झालेला आहे. त्याचा वापर करायला हरकत काहीच नाही. पण त्याचे प्रमाण किती ठेवायचे ? या एकांकिकेत त्याचा वापर अकारण अधिक वाटला. त्यामुळे त्या वापरात तोचतोचपणा आला. फ्लॅटच्याऐवजी फ्लायवूडचे तुकडे लावण्याची कल्पना चांगली वाटली. त्याचप्रमाणे एकांकिकेत काम करणारे कलावंत रंगमंचाच्या अवतीभोवती बसवण्याचीही कल्पना चांगली आहे. प्रेक्षक-कलावंत यांच्यातले अंतर कमी करण्याच्या दृष्टीने ती गोष्ट चांगली आहे, असे वाटते.

'सामना' एकांकिकेवर लिहिताना मी असे म्हटले होते, की प्रयोगाला लहान मुलांच्या प्रतिसादाचा (विशेषतः नको त्या ठिकाणी हसण्याचा वगैरे) त्रास होतो. तो संयोजकांनाही जाणवला असावा. तसे त्यांनी फलकही लावले आहेत. पण या प्रयोगांना पुन्हा मुले होतीच. दोष त्यांचा नसून आणणारांचा आहे. संयोजकांनी याबाबतीत प्रवेश देतानाच अधिक दक्षता घेतली तर इतर प्रेक्षकांची सोय चांगली होईल.

—वि. भा. देशपांडे

# विद्यार्थी आंदोलन

निळू दामले

चळवळ ही कल्पना बरीच व्यापक आहे. विद्यार्थि-जीवनाशी संबंधित सर्व प्रश्नांचा विचार, अभ्यास करणे, विधायक कामाची सवय त्यांना लावणे, ह्या गोष्टींसाठी संघटित स्वरूपात प्रयत्न करणे अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव 'चळवळ' ह्या कल्पनेत केला जातो. संघर्ष हाही चळवळीचा एक भाग असतो. स्वदेशीची चळवळ असा विचार आपण ज्या वेळी करतो त्या वेळी स्वावलंबन, लोकशिक्षण, लोकसंघटन, त्यासाठी सर्व आवश्यक प्रक्रिया असे सर्व घटक आपल्याला अभिप्रेत असतात. बहिष्कार हाही त्या सर्व चळवळीचा कल्पनेचा एक अंश असतो.

'चळवळ' ह्या व्यापक कल्पनेची विद्यार्थि-आंदोलन (संघर्ष) ह्याच भागापुरती मर्यादा मी ह्या लेखासाठी स्वीकारतो. आज तरी व्यापक अर्थाने विद्यार्थि-चळवळीची उभारणी महाराष्ट्रात होत नाही. चळवळ आणि आंदोलन हे दोन भिन्न छटांचे शब्द आज समानार्थी वापरले जातात. ह्याला कारण महाराष्ट्रात जे घडले ते विद्यार्थि-आंदोलन अशाच स्वरूपाचे राहिले आहे.

महाराष्ट्रात झालेल्या काही आंदोलनांचे अनुभव आणि काहींचा अभ्यास जमेस धरल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. जे दोष समाजात पूर्वापार चालत आले आहेत त्यांचाच वारसा विद्यार्थी व त्यांची आंदोलने चालवत आहेत. वाढ होत असेल तर ती फक्त दोषांची. त्यामुळे काही अपवाद वगळले तर जी गत सर्व सामाजिक आंदोलनांची आणि समाजाची झाली तीच गत विद्यार्थ्यांच्या आंदोलनांची आणि विद्यार्थि-समाजाची होणार अशी भीती वाटू लागते.

एखाद्या 'इझम'चा पाया घालण्यासाठी हा लेख नाही. एखाद्या 'इझम'च्या सूक्ष्मदर्शकाखाली आंदोलने तपासण्याचाही हा प्रयत्न नाही. 'इझम'च्या चर्चेत ज्यांना रस असेल त्यांनी मला पराभूतवाद, निराशावाद वा अन्य कोण्या वादात गुंतवायला माझी हरकत नाही. (कारण हरकतींचा त्यावर परिणाम होणार नाही.) मला जे दिसले ते मांडण्याचा हा मुक्त प्रयत्न.

'बियाँड फ्रेंडशिप' या पुण्याच्या विद्यार्थी साहाय्यक समितीद्वारा प्रकाशित होणाऱ्या षण्मासिकाच्या जुलै १९७३ अंकाचा विषय आहे 'विद्यार्थी चळवळी आणि विद्यार्थी संघटना.' 'माणूस'चे एक नेहमीचे लेखक निळू दामले यांचा वरील लेख या जुलै अंकात नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. तो विद्यार्थी चळवळी-वर थोडा वेगळा प्रकाश टाकणारा वाटल्यावरून येथे पुनर्मुद्रित केलेला आहे. 'बियाँड फ्रेंडशिप'च्या सौजन्याने.—सं.

नमनाला घडाभर तेल घालण्यालाही कारण आहे.

नागपूर व मराठवाड्यातल्या अनेक परीक्षास्थळांवर मी गेल्या वर्षी हिंडलो. कॉपी करण्याचे डोकेबाज व्यक्तिगत प्रकार आणि उर्मट सामूहिक प्रकार पाहायला मिळाले. मॅट्रिकची रेषा ओलांडून नुकत्याच कॉलेजात आलेल्या-पासून तर कायद्याच्या शेवटच्या वर्षाच्या 'पोचलेल्या' विद्यार्थ्यांपर्यंत सर्व थरां-तल्या विद्यार्थ्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. आजच्या लोकप्रिय भाषेत बोला-यचे झाले तर ज्यांना 'जनता' असे म्हणता येईल असे हे विद्यार्थी वेग-वेगळ्या मनःस्थितीत होते. कुणाला वाईट केल्याची जाणीव होती, कुणी अगतिक होता, कुणी शेवटचे वर्ष केव्हा एकदा संपवतो ह्या घाईत होता, "सर्वच गुन्हे करतात, मग आम्ही केला तर काय बिघडले" असेही प्रश्न काहींनी विचारले. मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी आपण गुन्हा केला आहे ह्याची जाणीव सर्वसाधारणपणे प्रत्येकाच्यात आढळून आली. उघड कबुली अर्थातच कुणी द्यायला तयार नव्हता.

विद्यार्थि-नेत्यांच्या बाबतीत वेगळा प्रकार. कॉपी करण्यातून कोणती पर्यायी मूल्ये उभारली जाणार आहेत ह्या माझ्या प्रश्नाला पुढाऱ्यांचे उत्तर, "तुम्ही जैसे थे वादी आहात" असे मिळते. एका सुप्रसिद्ध विद्यार्थि-नेत्याने मुंबईच्या सोमैया महाविद्यालयात झालेल्या सभेमध्ये जाहीर करून टाकले की, सामूहिक कॉपी हा विश्वविद्यालया-वरचा अविश्वासाचा प्रस्तावच आहे. हे एक समर्थनच उघडपणे करण्यात आले. जे कुणी कॉपीला विरोध करतात ते सर्व लोक पराभूत मनोवृत्तीवादी आहेत असा आरोप डाव्या-उजव्या—सर्वच धंदेवाईक विद्यार्थि-पुढाऱ्यांनी केला.

कॉपी करणे हा गुन्हा आहे की नाही हे नीतिमत्तेच्या कसोटीवर तपासणे दूरच राहू द्या. हजारो रुपयांची लाच देऊन, ओळखी-वशिल्याचा फायदा घेऊन, ज्ञान नसलेला डॉक्टर सार्वत्रिक झाला तर काय अवस्था होईल हाच प्रश्न गंभीर बनेल. कॉपीच्या जोरावर

पास झालेल्या इंजिनियरने बांधलेल्या धरणाचे पानशेतच होणार. एकंदर समाजाचा गाडाच चालणे मुश्किल होईल. हा अगदी साधा असा विचार आहे. वृत्तपत्रांतल्या दोनचार लेखांपलीकडे ह्या विचारांची मजल जाऊ शकली नाही. प्रसंगी विद्यार्थी दुखावले तरी चालतील पण आम्ही विद्यार्थ्यांना योग्य वळण लावूच हा विचार विद्यार्थी नेत्यांनी केल्याचे आढळत नाही.

ह्या प्रधान महत्त्वाच्या मुद्द्यांबरोबरच इतरही प्रश्नांची मालिका लगोलग निर्माण होते. विद्यार्थ्यांची आंदोलने कोणत्या प्रश्नांसाठी ? त्यांच्यासाठी आंदोलने करण्याची खरोखरच आवश्यकता आहे ?

उत्तरे कटू, आजची परिस्थिती पाहता व परंपरा जमेस धरता अशक्यप्राय व निराशाजनक अशीच आहेत.

कृषि विद्यापीठाच्या आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी बरेचसे सधन शेतकरी कुटुंबातले. 'करिअर' किंवा घरची भरपूर शेती त्यांना महत्त्वाची वाटत असते. समाजजीवनाच्या इतर अंगांशी व प्रश्नांशी त्यांना कर्तव्य नसते. इतर युवकांच्या तुलनेत हे लोक सुखवस्तू आहेत. त्यांचा स्वार्थ पुरवला गेल्यावर इतर ठिकाणच्या अन्यायाचा विचार करण्याची त्यांना जरूरी वाटत नाही. त्यांचे प्रश्न सुटले की ते हात झाडून मोकळे होतात. कृषि विद्यापीठाचे एवढे आंदोलन घडून गेल्यावर पुण्यामधले अन्याय थांबले होते काय ? किती कृषि विद्यार्थ्यांनी अन्याय होत असताना सामान्यांची बाजू घेऊन संघर्ष केला ? साधना-राजा ढाले प्रकरणात किती लोक साधनेच्या संरक्षणासाठी पाठिंबा देण्यासाठी आले ?

कृषि विद्यापीठाचे आंदोलन हातात घेणाऱ्या क्रांतिकारक संघटनांनी तसे संघटनात्मक प्रयत्न करून व्यापक प्रश्नांशी बांधिलकी निर्माण करण्याचे प्रयत्न झाल्याचे पाहायला मिळत नाहीत. (जाता जाता एक उदाहरण : आय. टी. आय. मधले विद्यार्थी नेमक्या उलट वर्गात मोडतात. पण त्यांच्या प्रश्नांवरचे आंदोलन यशस्वीपणे उभे राहू शकले नाही.)

आपला समाजच विरोधाभासांनी (contradiction) भरलेला आहे. कल्पनाही करता येणार नाही असे हितसंबंध असंख्य मार्गांनी एकमेकांत गुंतलेले आहेत. दर क्षणाला हजारो ठिकाणी अन्याय होतच असतो. अन्यायाविरूद्ध लढू म्हणणाऱ्याला कायम मैदान मोकळे असते. लोकांची नाडी ओळखणाऱ्यांना आणि थोडाफार सामाजिक कार्याचा व संबंधांचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीला किंवा गटाला अशा एखाद्या प्रश्नावर आरूढ होणे फारसे कठीण नसते. त्यामुळे आंदोलने होतच राहतात.

कामगार चळवळीत पाहायला मिळते की एका कंपनीचे कामगार सदस्य बनतात. प्रश्न सुटला किंवा युनियन अकार्यक्षम असली तर ते लोक युनियन सोडून जातात. पण ती युनियन मोकळी राहत नाही. दुसऱ्या कंपनीचे लोक येतातच. कामगारक्षेत्रच तसे आहे.

आर्थिक परिस्थितीच तशी आहे की, युनियनमधल्या कामगारांची एकूण संख्या कायम राहते. कामगार येतजात राहतात. संप होतच राहतात. पुढारी टिकून राहतात. युनियनचे संस्थान बनते. संघटना आणि कामगारांचे निश्चित तत्त्वांचे व काळाचे संबंध प्रस्थापित न झाल्याने कामगारांचे शिक्षण होत नाही, त्यांच्यात निश्चित तत्त्वांना बांधिलकी निर्माण होत नाही. परिणामतः समाजाच्या घडणीत कोणताही मूलभूत बदल घडवून आणायला कामगार चळवळ असमर्थ ठरते.

हाच प्रकार थोड्याफार फरकाने विद्यार्थी-चळवळीतही घडत चालला आहे. या कारणांसाठी संघटना प्रबळ करण्याचे कामगार पुढारी टाळतात. त्याच कारणांसाठी विद्यार्थी-नेते संघटनात्मक विकास न होईल ह्याची कळत, न कळत काळजी घेतात. किमान काही काळपर्यंत विद्यार्थ्यांशी निश्चित संबंध निर्माण करण्याचे, त्यांचे व्यापक शिक्षण करण्याचे प्रयत्न होत नाहीत, आंदोलन सातत्याचे (perpetual) होत नाही. आंदोलनाचा ठेका घेतल्यासारखे विद्यार्थी जात-येत राहतात. तो एक धंदाच बनून जातो, बनला आहे. कामगार संस्थानांसारखा! लातूर, नगर, सोलापूर, बार्शी, परभणी, अकोला, नागपूर, चिमूर,–बहुतेक ठिकाणचा असाच अनुभव आहे.

आंदोलने होऊ नयेत असे कुणीच म्हणणार नाही. पण त्यासाठी विद्यार्थ्यांचा अनुनय करण्याची काय आवश्यकता आहे?

मतांसाठी व अन्य स्वार्थासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून जसे मुसलमानांचे फाजील लाड झाले, नको त्या ठिकाणी पाठिंबा आणि आवश्यक त्या वेळी त्यांना वळण न लावणे हे प्रकार झाले. तसेच फाजील लाड आता विद्यार्थ्यांचे चालले आहेत.

लातूरला २६ जानेवारीला झेंडा उलटा लावल्यावरून दंगल होते. दंगलीत सामान्य फेरीवाल्यांचे अतोनात नुकसान होते. कुठे फॉकर फ्रेंडशिप जळते. पुन्हा लातुरातले विद्यार्थी लाठ्या सरसावून तयार, दंगलीच्या नुकसानीत गरिबाचा बळी! संगमनेर. एक कुठला करमणुकीचा कार्यक्रम तिकीट लावून ठेवण्यात आला. विद्यार्थ्यांची तुफान दगडफेक, पोलिसांना घेराव, पोलीस स्टेशनवर दगडफेक, इन्स्पेक्टला मारहाण, तासा-दोन तासांत सर्व विद्यार्थी एकत्र येतात. नेते मिळतात. मोर्चा तयार होतो. 'प्रेस स्टेटमेंट' तयार होते– क्रांती संगमनेरच्या वेशीवर येऊन ठेपते. विद्यार्थ्यांना समजावून सांगणाऱ्याचे हाल होतात. 'ते चमचे', 'प्रतिक्रांतिवादी' होतात. ही एक परंपराच बनत चालली आहे. हा प्रकार सार्वत्रिक झाला आहे. अज्ञानापोटी, जोषात, स्वार्थासाठी, स्वतःचे नेतृत्व मिरवण्याची व पुरवण्याची खाज़ जिरवण्यासाठी; आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या हितसंबंधस्वार्थाला धक्का लावला तर आपल्याला दूर सारले जाईल ह्या नेत्यांच्या सार्थ भीतीमुळेच विद्यार्थ्यांचा

अनुनय होतो आहे.

महाराष्ट्रातले विद्यार्थि-आंदोलन आपल्या समाजातल्या अनेक गंभीर उणिवांचाच वारसा चालवत आहे. क्रांतिकारक नावे धारण केली तरी 'मागल्या पानावरून पुढे चालू' ह्याच पद्धतीने संघटना काम करतात; आंदोलने चालवतात.

कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सामान्य माणसाला ह्या देशात सहभागी करून घेण्यात येत नाही. शतकानुशतके कुणीतरी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे, स्वार्थ सांभाळून जमेल तसे, जमेल तेव्हा, एवढेच 'कर्तव्य' सामान्य माणसाला करावे लागरे. निर्णय घेण्याबरोबरच जबाबदारीही उचलावी लागत असते. 'शोषण बंद करावे' हा निर्णय तिसऱ्याने घेणे वेगळे आणि स्वतः घेणे वेगळे. स्वतः निर्णय घेतल्यावर आपण आपल्या घरच्या नोकरांना कसे वागवतो ह्याचा विचार त्याला करावा लागतो. समाज त्याच्या वागण्याकडे पाहात असतो. जबाबदारी स्वीकारल्यावरच कटू वाटणाऱ्या कर्तव्यांची मालिकाही ओघाने येते. निर्णय–जबाबदारी–कर्तव्याच्या प्रक्रियेतून कोणत्या ना कोणत्या तरी पातळीवर माणूस गेला तरच एक जबाबदार व्यक्ती तयार होते. आपल्या देशात हे कमीच घडत आले आहे. राजकीय चळवळी ह्या दोषापासून मुक्त नाहीत. विशेष अभ्यास, पूर्वानुभव व काही विशेष गुणाच्या आवश्यकतेमुळे राष्ट्रीय पातळीवरच्या विचारप्रक्रियेत प्रत्येकाला सहभागी होणे कदाचित शक्य होत नाही पण ग्रामपंचातीच्या पातळीवर तरी निर्णय घेणाऱ्या नागरिकाने खऱ्या अर्थाने सहभाग घेतला पाहिजे.

विस्ताराने चर्चिलेल्या ह्या दोषाचा वारसा विद्यार्थीचळवळी चालवीत आहेत. सोलापूर आंदोलनात डावपेचाच्या नावाखाली काही लोकांनी निर्णय घ्यावा व इतरांनी तो पुरेशा आंधळेपणाने जसाच्या तसा अंमलात आणावा अशीच सवय लावण्यात आली होती. बरेच वेळा ह्या निर्णयात विद्यार्थ्यांपेक्षा इतर हितसंबंधियांचा प्रभाव जास्त असे. 'सीक्रेट सोसायटी' जसे निर्णय घेते तसेच गुप्तपणे. रोमँटिक कल्पनांत व वातावरणात निर्णय घेतले जात, नेते व त्यांच्या 'मर्जीतले' किंवा 'आश्रित' अशांचा गट प्रभावी ठरत होता. सोलापूरच नव्हे, इतर ठिकाणीही बराचसा असा प्रकार घडतो. आंदोलन कसेतरी पैलतीराला नेण्यासाठी सर्वांच्या हस्तक्षेपाने होणारा गोंधळ टाळून पुढे जायचे, की दूरगामी विचार करून, प्रसंगी आंदोलनाचा वेग कमी झाला तरी चालेल पण शक्य त्या स्तरावर विद्यार्थ्यांना निर्णयात सहभागी करून घ्यायचे ह्या दोन पर्यायांतला पहिलाच पर्याय नेते स्वीकारतात. परिणाम असा होतो की विद्यार्थी कायम एका बाजूला; आणि निर्णय घेऊन यशाकडे जाण्याचा राजरस्ता सापडलेले एका अर्थाने धंदेवाईक पुढारी दुसऱ्या बाजूला, अशी विभागणी होते. कायमची. समाजातही अशी विभागणी होत आली आहे.

आजचे शिक्षण धड ज्ञानदायी नाही, धड अन्नदायी नाही, हे सर्वांनाच मान्य आहे. ह्या परिस्थितीला जबाबदार व्यक्ती व संस्थांना शासन करण्यासाठी उग्र आंदोलने आवश्यक ठरतात, अपरिहार्य ठरतात. परंतु हे शिक्षण मुळात वाईट का आहे ? त्यात कोणते बदल घडवून आणावे लागतील ? कोणती पर्यायी रचना करावी लागेल ? ह्याचा विचार सर्व विद्यार्थ्यांनी करायला नको का ? नेते नेहमीच 'सर्वज्ञ' असतात. पण सामान्य बहुसंख्य विद्यार्थ्यांसाठी चर्चा, परिसंवाद, वाचन, शिबिरे हे मार्ग सातत्याने चोखाळायला हवेत. पर्याय सापडला किंवा नाही हे अनिश्चित असले तरी वाटचालीची तयारी करणे आवश्यक असते. क्रांतीच्या एका क्षणी समाजातले सर्व बुढ्ढे, जुनी मूल्ये, जुनी व्यवस्था सर्व संपले आहे असे गृहीत धरले तर त्याच क्षणी पुढे काय हा प्रश्न आ वासून उभा राहील. पर्याय तर नाहीच, पण सावळागोंधळ मात्र निर्माण होईल. अशीच शक्यता जास्त. विद्यार्थि-आंदोलनात ह्या गोष्टीचा विचार टाळला जातो.

समाजाच्या आणखी एका गंभीर दोषाचाही वारसा विद्यार्थी घेत आहेत. किंमत मोजायची त्यांची तयारी नाही. भ्रष्ट व्हायचे नसेल, भ्रष्ट अशा शिक्षण-व्यवस्थेविरुद्ध लढा द्यायचा असेल तर मग व्यवहारात नुकसान सोसावे लागेल. डिग्री न मिळाल्याने हालात राहावे लागेल. डॉक्टरेट, प्राध्यापकीच्या बिरुदावल्या मिरवता येणार नाहीत, समाजाच्या प्रतिष्ठितांच्या यादीत नाव राहणार नाही. विजनवास स्वीकारावा लागेल. त्याग आणि स्वार्थाच्या दोन तलवारी एकाच म्यानात ठेवता येणार नाहीत. 'हीरो' होण्यासाठी आंदोलन नसते, हे विद्यार्थ्यांना सांगावे लागेल. पण असे काही सांगितले तर विद्यार्थी जवळ यायला तयार होत नाहीत ही 'नेतृत्वा'ला समजलेली खरी अडचण आहे. परिणामतः किंमत मोजण्याची सवय, बेजबाबदारपणा विद्यार्थि-आंदोलनात मुरू लागला आहे.

विद्यार्थि-आंदोलनाचा ढोबळ ताळेबंद तयार केला तर त्यात जमेच्या बाजूला फारसे काही आढळत नाही. खर्चाच्या बाजूला वाढ होत आहे. काही वाईट सवयी वाढत जाताहेत. लेनिनच्या नावाखाली 'हिंसा' अपरिहार्य असते हा विचार रुजवला जातो आहे. आंदोलनाचे उद्दिष्ट महत्त्वाचे, माणसे ही साधनभूत आहेत. हत्यारांप्रमाणे ती वापरायची, बोथट झाल्यास फेकून द्यायची, हे क्रांतिशास्त्र रुजवले जात आहे. केवळ जनताच नव्हे तर सहकारीही 'साधनभूत' मानायचे व त्यांनाही सोयीस्कर वेळेनुसार बाजूला सारायचे हा विचारही त्या क्रांतिशास्त्रातच असतो. कोणतीच संघटना ह्याला अपवाद नाही. शक्ती असेल तिथे व शक्तीप्रमाणेच निर्णय होतील हे सनातन सत्यच संघटना व आंदोलनात वरचढ, प्रभावी ठरले आहे. सर्वच ठिकाणचा हा अनुभव.

'विचारवंतां'नी 'इझम'च्या चौकटींच्या मोजमापांना सुरुवात करायला माझी काहीच हरकत नाही. जे जाणवले ते लिहिले. ● ● ●

## गुरुजींनंतरचा रा. स्व. संघ

पृष्ठ ७ वरून

वण्याचे काम जनसंघावर सोपविले आहे आणि 'दंड' ते स्वत: शाखा-शाखांवर तयार करत आहेत. मते आणि दंड मिळूनच सत्ता होत असते.

पण समजा सत्तेपासून संघाला अलिप्त रहायचे आहे असे गृहित धरू. संघ श्री. ग. म्हणतात तशी समाजक्रांती कधीतरी करू शकेल का? आमच्या मते हे अशक्य आहे. याला दोन कारणे आहेत ती खाली सविस्तर मांडली आहेत.

### राजसत्तेच्या प्रश्नाचे महत्व

एक तर मुळातच दंडहीन, सत्ता-निरपेक्ष समाजक्रांती असे काही अशक्यच आहे. ती शक्य आहे असे मानणारी गांधीजी वा. श्री. गं. सारखी मंडळी एक चूक करत असतात. शासन-सत्ता ही समाजाच्या वर, पलीकडे अशी काही आहे ही त्यांची समजूत असते. त्यामुळे तिला टाळून, तिची पाठ फिरलेली असताना वा तिच्या नजरेसमोर, 'समाजातल्या समाजात' बदल घडवून आणता येईल असे त्यांना वाटते. पण हे बरोबर नाही. आज आपल्या देशात कोणते क्षेत्र असे आहे की जेथे शासनाचा संबंध येत नाही? शेती तुम्ही शासनाला टाळून सुधारू शकता का? एक-दोन गावात वा तालुक्यात शकालही. पण देशभरची शेती सुधारण्याकरता ट्रॅक्टर, खते, कर्ज, पाणी ह्या गोष्टी पुरवायच्या तर त्याचा संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंध नाही का? आणि अर्थव्यवस्थेमध्ये बदल करायचा तर तिची सर्व सूत्रे तुमच्याकडे नकोत का? देशात पोलाद किती व्हावे हे शासन ठरवणार नाही तर कोण ठरवणार? परिवर्तनाच्या कार्यक्रमात प्रस्थापित हितसंबंध असलेले सधन वर्ग मोडता घालतात तेव्हा त्यांच्या डोक्यात घालायला 'दंड' तुमच्याकडे नको काय?

शासन हे समाजातंर्गत चालणाऱ्या प्रक्रियांमध्येच गुंफलेले असते. चालू व्यवस्था तगवण्याचे ते एक हत्यार असते; ती तुम्हाला बदलायची असेल तर या हत्याराविषयी उदासीन राहून चालणार नाही. वरिष्ठ वर्गाचे हे हत्यार मोडून टाकून, नव्या व्यवस्थेला साजेसे असे हत्यार पाहिजे. कामगार-शेतकऱ्यांचे शासन आले पाहिजे.

गांधीजींची लोकसेवादलाची कल्पना फसली ती यामुळे. केवळ काँग्रेसवाले स्वार्थी व सत्तालोभी होते म्हणून नव्हे, तर वर्गहीन समाजच फक्त शासनरहित असू शकतो यामुळे. स्वातंत्र्याच्या वेळी भारतात वर्ग होते, आणि भांडवलदार व जमीनदार वर्ग सामाजिक व राजकीय दृष्ट्या प्रबळ होते. म्हणून त्यांचे शासन काँग्रेसद्वारा आले. हे अटळ होते. ज्या आर्थिक सामाजिक परिस्थितीत शासनाची गरज उरत नाही, लोकसेवा-दल खरोखरी व्यवहारात येऊ शकते ती परिस्थिती आजही आलेली नाही. ती फक्त पिळवणूकरहित, पिळवणूक

करणारे व पिळले जाणारे वेगवेगळे वर्ग नसलेल्या समाजवादी समाजातच येऊ शकेल.

दंडहीन समाजक्रांती हे स्वप्न आहे. गांधीजींचे होते, त्याच्या ठिकऱ्या झाल्या; श्री. ग. असेच अव्यावहारिक व अशक्य काहीतरी सांगत आहेत. डाव्या चळवळींपासून ते इतर गोष्टी शिकले, पण राज्यसत्तेच्या प्रश्नाबाबत ते काहीच शिकले नाहीत.

दुसरा मुद्दा हा की सरसंघचालक प. पू. बाळासाहेब देवरसांनी कितीही म्हटले तरी सामाजिक समस्या सोडवण्याची क्षमता संघात आहे का व येऊ शकेल का ? तीन गोष्टी येथे विचारात घ्यायला पाहिजेत.

## विचारसरणी

संघाची विचारसरणी आजच्या सामाजिक समस्या सोडवायला पुरेशी आहे का ? राष्ट्रवाद, सैनिकी शिस्तबद्ध संघटनेचे सामर्थ्य, हिंदू धर्माशी व मुसलमानद्वेषाशी निष्ठा, समाजवादी वा साम्यवादी चळवळींना विरोध ही संघाच्या विचारातली मुख्य सूत्रे आहेत. आजच्या सामाजिक समस्या सोडवणे दूरच राहो, त्या समजावून घेण्यासाठी अतिशय प्रगल्भ अशा शास्त्रशुद्ध विचारांची गरज आहे. तो संघाकडे नाही. देशातले दलित न्यायासाठी उठत आहेत – त्यांची समस्या म्हणजे जातीव्यवस्थेची, हिंदू धर्माच्या मूळ स्वरूपाची समस्या आहे. ती संघवाले समजावून घेतात की चातुर्वर्ण्याचा आंधळा पुरस्कार करतात ? दारिद्र्य नष्ट करण्याचा मार्ग आजची भांडवली अर्थरचना मोडून विज्ञानसिद्ध ढाच्यात आर्थिक जीवन नव्याने रचणे हा आहे. भ्रष्टाचार थांबवणे व नेकीने आपापले काम करणे यापलिकडे संघाच्या आर्थिक विचारांची धाव जात नाही. ते कसे गरीबांचे प्रश्न सोडवणार ? मुसलमान द्वेषाने भरलेल्या व 'हिंदू सारा एक' या पोकळ घोषणेने भारून गेलेल्या एकारल्या बुद्धीला विविध भाषा, धर्म, जाती, प्रांत असलेल्या या खंडप्राय देशाचे प्रश्न सोडवता येणे अशक्य आहे. संघाच्या विचारप्रणालीचा आवाका फार तोटका आहे; आधुनिक विज्ञान व तंत्रशास्त्र, राष्ट्रप्रेम व नेकी आणि सैनिकी संघटना यांनी केवळ विसाव्या शतकाचे प्रश्न सुटत नसतात, ते सोडवण्याकरता समाजाचे विज्ञान व मानवीपणाचा नवा, खराखुरा अर्थ वाहणारी मूल्ये व ध्येये आवश्यक असतात, ही गोष्ट संघाच्या मंडळींना कधीच लक्षात आली नाही व येईल असे दिसत नाही.

## संघटनेचे स्थितीवादी स्वरूप

दुसरी गोष्ट संघटना ही एखाद्या यंत्रासारखी असते. हे यंत्र कसे आहे व कशाकरता आहे या दोन गोष्टी वेगळ्या काढता येत नाहीत. त्याचा हेतू त्याच्या रचनेशी अविभाज्यपणे बांधलेला असतो. संघाची विचारप्रणालीच नव्हे, सबंध संघटनाच मुळात समाजक्रांतीसाठी बांधली गेली नव्हती व ती तशी बदलणारही नाही. काही आडमुठ्या बंदिस्त मनाच्या हिंदू-राष्ट्राच्या कल्पनेने भारलेल्या तरुणांना एकत्र आणून, ठाकून

ठोकून कडवेपणा आणून, बांधलेली संघटना म्हणजे संघ. समाजापासून अलग पाडून, जनतेच्या विविध व बदलत्या जीवनाचे रंग त्यांना अजिबात लागू न देता संघस्थानावर आणल्या गेलेल्या तरुणांची संघटना संकुचित होऊन साचून गेली नाही तरच आश्चर्य. कामगारलढे लढवणे, दलितांच्या चळवळी उभारणे, खेडयापाडयातल्या शेतकऱ्यांना संघटित करून सामूहिक कृतीत आणणे ह्या गोष्टींशिवाय समाज परिवर्तन आज अशक्य आहे. मूठभर निष्ठावंत युवकांनी क्रांती होत नसते हे आता स्पष्ट आहे. संघाची संघटना या गोष्टी करायला असमर्थ आहे. या गोष्टी संघ करू बघेल तर त्यांच्या संघटनेला चिरा जातील, ढिलाई येईल व संघ आजचा संघ उरणार नाही.

'संघशक्तीचा विनियोग सामाजिक समस्या सोडवण्याकरता केला तर संघशक्तीचा व्यय होईल, मूळ संघटना दुर्बल होईल ही काही स्वयंसेवकाची भीती व्यर्थ आहे.' असे प. पू. देवरस म्हणाले. पण त्यांच्या दुर्दैवाने हेच खरे आहे! जितका जनतेशी, तिच्या जीवनाशी व झगडयांशी स्वयंसेवकांचा संबंध येईल तितका त्यांचा कडवेपणा, अडमुठेपणा व अंधश्रद्धा नष्ट होईलच!

### संघाचे वर्गीय स्वरूप

तिसरी गोष्ट, समाजशास्त्राच्या दृष्टीने जर आपण आजच्या भारतीय समाजाचे विश्लेषण केले तर कोणते वर्ग वा गट समाजक्रांती करू शकतील असे दिसते? संघाचा पाया समाजाच्या कुठल्या थरात रुजलेला आहे? महाराष्ट्रापुरते बोलायचे तर संघ हा नागपूर-पुण्याच्या, व इतर काही ठिकाणच्या ब्राह्मण, मध्यम व कनिष्ठ मध्यमवर्गातल्या लोकांचा आहे. संघाला पैसे व पाठिंबा पुरवणारे लोक व्यापारी, जमिनदार व भांडवलदार आहेत. सर्व देशातले चित्रही हेच साधारणपणे आहे.

मध्यमवर्गीय, ब्राह्मण, शिक्षित तरुणांच्या थरापुढे आज भवितव्य काय आहे? एकांडेपणे तो काहीच करू शकत नाही. कारण तो अल्पसंख्य आहे; तसेच मुख्यतः पांढरपेशा नोकरदार असल्याने आर्थिक-सामाजिकदृष्टयाही समाजजीवनाच्या नाडयावर त्याची फारशी पकड नाही. जातीयवादी, बुरसटलेल्या सरंजामी विचारांनिशी तो इतर जाती व कामगार-शेतकऱ्यांशी नाते जोडून वाढूही शकत नाही. हा वर्ग एकतर सधनांबरोबर, जुनाट सरंजामी व भांडवलदार वर्गाबरोबर जाऊन स्वतःचा नाश करून घेऊ शकतो, किंवा कामगार-शेतकऱ्यांबरोबर (म्हणजे ९० टक्के भारतीय राष्ट्राबरोबर!) जाऊन डाव्या चळवळीद्वारा क्रांतीच्या तेजाकडे जाऊ शकतो. पहिला पर्याय स्वीकारणारे तरुणच संघात गेलेले आहेत, भविष्याकडे पाठ फिरवून भूतकाळाकडे वळले आहेत.

जर समाजाच्या विकासाचे काही शास्त्र असेल तर ते संघाच्या विरूद्ध आहे!

थोडक्यात, जर संघाने आपली विचाप्रणाली विज्ञानावर व नव्या मूल्यांवर आधारली, समाजाच्या परि-

वर्तनाचा शास्त्रशुद्ध कार्यक्रम आखून त्यानुसार संघटना बदलली व कामगार-शेतकऱ्यांशी जुळते घेणारी केली, जर संघाचे वर्गीय स्वरूप बदलून ती एक कष्टकऱ्यांची संघटना झाली तर व तरच! संघ सामाजिक समस्या सोडवू शकेल. पण मग तो संघ उरणार नाही ! तो एक क्रांतिकारक पक्ष होईल व कदाचित आम्हीही संघात जाऊ !

पण हे होणार नाही आणि म्हणजेच आजच्याप्रमाणे उद्याही संघ ही एक वर-वर सांस्कृतिक पण छुपेपणाने विशिष्ट गट सत्तेवर बसवणारी राजकीय शक्ती असणार आहे. लोकशाही न मानणारी, हिंसा व कटबाजीवर विश्वास ठेवणारी हुकुमशाही तऱ्हेची संघटना असेल. सामाजिक व सांस्कृतिक सुधारणेला ती विरोध करेल, चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करेल व मुस्लिमद्वेषाने लोकांचा असंतोष भलतीकडे वळवून कष्टकऱ्यांच्या एकीमध्ये बिब्बा घालत राहील. राष्ट्राच्या नावाने वरिष्ठ वर्गाचे व मूठभरांचे हित साधेल व नव्वद टक्के राष्ट्राच्या क्रांतिकारक चळवळींना राष्ट्रद्रोही म्हणून विरोध करेल.

प. पू. देवरसांनी स्वयंसेवकांना किती प्रामाणिकपणे आत्मटीका करायला सांगितली ते त्यांचे तेच जाणोत. पण श्री. गं. ना. अजूनही संघ सुधारेल अशी आशा वाटत असली तर त्यांनी, व संघाच्या सर्व प्रामाणिक व खऱ्या देशप्रेमी स्वयंसेवकांनी आणि हितचिंतकांनी ती सोडून द्यावी हे बरे. इतिहासाच्या रणांगणावर ज्यांचा पराभव अटळ आहे त्यांच्या रथाचे चिखलात रुतलेले चाक वर काढण्याचा शक्तीव्यय कशाकरता !

● ● ●

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ ५ वरून

काढून घेत असत. वर्षाने टेंपररी म्हणून त्यांना काढून टाकण्यात आले तेव्हा त्यांची सक्तीची ठेव मिळविण्यास २ वर्षे खर्च करावी लागली.

३ : उमराणीकर नावाच्या बाईंनी डोनेशन नाकारली म्हणून त्यांचा १ महिन्याचा पगार बुडविला व S. S. C. सुपरव्हिजनचे पैसेच अद्यापपर्यंत दिले नाहीत.

४ : डोळे व चित्रे नावाच्या बाई नियमानुसार मॅटर्निटी लिव्हला गेल्या तर त्या का गेल्या म्हणून महाजन मास्तरांनी ससेमिरा लावला. प्रकरण न्यायप्रविष्ट होऊन शेवटी बाईंच्या बाजूने निकाल लागला. हा इतिहास ताजा आहे.

५ : महाराष्ट्र हायस्कूल सोडून एक शिक्षिका टिळकनगर हायस्कूलमध्ये गेली. तिला डिस्चार्ज सर्टिफिकेट हवे होते. तर हेडमास्तर महाजनांचे म्हणणे या बाई आमच्या शाळेत नोकरीला नव्हत्याच.

ह्या व आणि इतर गोष्टी महाजन मास्तर – चौधरी हायस्कूल यांच्याबद्दल सांगता येतील. पण कोळसा उगाळावा तितका काळाच ! ही सत्य गोष्ट आहे. डोंबिवलीत शैक्षणिक संस्था चालविणे ह्यात कुठलीही राजकीय चुरस नाही. पण मंत्र्यांच्या आशिर्वादाने पुनीत झालेल्या चौधरी हायस्कूलमध्ये

गरीब शिक्षकांना नाडून ब्राह्मणद्वेषाने जे राजकारण खेळले जाते ही गोष्ट मात्र त्रिकालाबाधीत सत्य आहे. मग राम भिसे आणि सहकारी व पालक रामचंद्र इनामदार काहीही म्हणोत. कर्मवीर भाऊराव पाटलांचे नाव सांगण्यासाठी एका कामगाराने स्वकष्टाने घाटकोपर येथे एक आदर्श हायस्कूल व कॉलेज चालविले आहे त्याचा हवाला ह्या लोकांनी दिला तर ते योग्य ठरू शकेल.

**शरद दिघे, रमेश कुलकर्णी,** डोंबिवली

[ या विषयावरील दोन्ही उलटसुलट बाजू आता वाचकांसमोर आलेल्या असल्याने हा पत्रव्यवहार येथे थांबविण्यात येत आहे. —सं. ]


खून एका डॉक्टरने केला होता.
डॉक्टर एक प्रख्यात सर्जन होता.
आणि म्हणूनच हे गूढ वाढत चालले होते....

अॅड. माधव कानिटकर
सादर करीत आहेत
एक खून—कथा

# दैव जाणिले कुणी ?

माणूस

# चित्र, वार्ता पुस्तक

प्रसिद्धी : १ ऑगस्ट
किंमत : एक रुपया

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649




# प्रसिद्ध झाली

# किंमत : रुपया

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**